रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८९ ▌अंक ९८ ▌पृष्ठे १० ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in




रायगड, रविवार, दि.१४ सप्टेंबर २०२५

# कृषीवल

किंमत ४ ₹

**अलिबाग-नागाव प्रॉपर्टी विकणे आहे**

अलिबाग नागाव हायवे टच, लक्झरीयस् प्रॉपर्टीज, ३१ गुंठे रेडी टू बिल्ड प्लॉट Suitable for फार्महाऊस/रिसॉर्ट/ हॉटेल/ स्विमिंग पूल, नागाव बीच १.२ कि.मी., प्राईम लोकेशन, इलेक्ट्रिसीटी, भरपूर पाणी, ५०+ नारळ, सुपारी आणि हापूस आंब्याची झाडे, उत्तम कनेक्टिव्हिटी, परमंट कंपाऊंड, क्लिअर टायटल, एंजन्ट सुद्धा चालेल.

मालक : ९७६९१०८१७०

**महागावात जमिनीला तीव्र धक्के**

**सहा महिन्यांमधील दुसरी घटना**

**ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण**

# पाली हादरलं

**। पाली/वाघोशी । प्रतिनिधी ।**

सुधागड तालुक्यातील महागाव परिसर पुन्हा एकदा हादरला असून, शुक्रवारी दि. १२ सप्टेंबर रोजी रात्री उशिरापासून पहाटेपर्यंत विविध वेळांना मोठमोठ्या आवाजासह जमिनीला हादरे बसले. महागाव, भोप्याची वाडी, देऊळवाडी, चंदरगाव व कोंडप या गावांमध्ये सलग बसलेल्या या धक्क्यांमुळे ग्रामस्थ घाबरून गेले आहेत. मागील सहा महिन्यांनंतर हादरे बसण्याची ही दुसरी वेळ आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रात्री दहा वाजता, मध्यरात्री बारा, पहाटे तीन वाजता, साडेतीन वाजता तसेच सकाळी साडेपाच वाजता हे हादरे बसले. गावकऱ्यांना घरातून बाहेर पडावे लागले असून, परिसरात भीतीचे वातावरण आहे.



याआधीही सहा महिन्यांपूर्वी १९ फेब्रुवारी रोजी महागाव पंचक्रोशीत असेच हादरे जाणवले होते. त्यावेळी तज्ज्ञांनी हे धक्के भूगर्भातील हालचालीमुळे झाल्याची शक्यता व्यक्त केली होती. वारंवार अशा घटना घडत असल्याने ग्रामस्थ सातत्याने दहशतीच्या वातावरणात जगत असून, प्रशासनाकडे योग्य तपासणी व मार्गदर्शन करण्याची मागणी होत आहे.

महागाव पंचक्रोशीतील युवा नेते भास्कर पार्टे यांनी सांगितले की, याआधीही आम्ही जिल्हाधिकारी कार्यालय व संबंधित खात्यांना पत्रव्यवहार करून हा प्रश्न मांडला होता. त्या वेळेला हे भूगर्भातील धक्के असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, आता पुन्हा एकदा धक्के बसल्याने आम्हाला पुन्हा प्रशासनाकडे धाव घ्यावी लागेल.

दरम्यान, सुधागड तहसील कार्यालयाकडून पान २ वर

**प्रशासन सज्ज**

**जिल्ह्यातील हेटवणे धरणापासून काही अंतरावर असणाऱ्या महागाव परिसरात रात्रीपासून जमिनीतून सौम्य धक्के जाणवले. शुक्रवारी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास पहिला धक्का जाणवला. त्यानंतरही काही सौम्य धक्के जाणवल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. या धक्क्यांनी अनेकांच्या घरातील भांडी पडली, अनेक वस्तू अस्ताव्यस्त झाल्या. परंतु, कोणतेही मोठे नुकसान झाल्याची माहिती नाही. तालुका प्रशासन सज्ज झाले असून, अधिक माहिती घेण्यात येत आहे.**

**स्व. मीनाक्षीताई पाटील वक्तृत्व करंडक**

## प्रार्थना बेटकर ठरल्या मानकरी



(छायाचित्र : समीर मालोदे)

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

पुरोगामी विद्यार्थी संघटना रायगड, पुरोगामी युवक संघटना अलिबाग व सांस्कृतिक सेल अलिबागच्या वतीने जिल्हास्तरीय खुली वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेच्या अंतिम विजेत्या रोहामधील कोलाड येथील प्रार्थना प्रसन्न बेटकर ठरल्या असून, त्यांना स्व. मीनाक्षीताई पाटील वक्तृत्व करंडक व १७ हजार पाचशे रुपये रोख रक्कम पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. सार्वजनिक वाचनालय व जिल्हा ग्रंथालयाच्या कार्याध्यक्षा शैला पाटील यांच्या हस्ते विजेत्या स्पर्धकाचा सन्मान करण्यात आला.

यावेळी शेकाप राज्य कामगार आघाडीचे प्रमुख प्रदीप नाईक, ॲड. परेश देशमुख, नागेश कुलकर्णी, शरद वरसोलकर, नंदकुमार तळकर, दत्ता ढवळे, शरद कोरडे, अनिल चोपडा आदी मान्यवर, पुरोगामी विद्यार्थी संघटनेचे जिल्हा प्रमुख हर्ष ढवळे, पुरोगामी युवक संघटना अलिबागचे प्रमुख विक्रांत वार्डे, पुरोगामी विद्यार्थी संघटना अलिबाचे प्रमुख वेदांत कंटक, सांस्कृतिक सेलचे

(अधिकचे वृत्त, छायाचित्रे पान १० वर)




## चित्रलेखा पाटील यांच्याकडून रस्त्याच्या कामाची पाहणी



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

शेकापच्या महाराष्ट्र राज्य प्रवक्त्या व मीडिया सेल अध्यक्षा चित्रलेखा पाटील आणि महाराष्ट्र राज्य महिला आघाडीच्या प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे यांनी शनिवारी अलिबाग-वडखळ रस्ता दुरुस्तीच्या सुरु असलेल्या कामाची पाहणी केली. याप्रसंगी त्यांच्यासोबत स्थानिक शेकाप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी चित्रलेखा पाटील यांनी नागरिकांकडून या रस्त्यावरील वाहतूक कोंडी, खड्डे, अपघातांचा धोका आणि अपूर्ण कामामुळे होणाऱ्या अडचणींबाबत माहिती घेतली.

याप्रसंगी चित्रलेखा पाटील यांनी सांगितले की, अलिबाग-वडखळ रस्ता हा रायगड जिल्ह्यातील महत्त्वाचा मार्ग आहे. या रस्त्याच्या दुरवस्थेमुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. शासन व संबंधित विभागाने तातडीने कामाचा वेग वाढवून हा रस्ता दर्जेदार पद्धतीने पूर्ण करावा, अशी आमची ठाम मागणी आहे.

तसेच ॲड. मानसी म्हात्रे म्हणाल्या की, या रस्त्यावर वाहतुकीच्या अडचणींमुळे रात्री प्रवास करणाऱ्या महिला व विद्यार्थ्यांना मोठा धोका निर्माण होतो. तातडीने लक्ष देऊन हा प्रश्न निकाली काढावा.

दरम्यान, अलिबाग रस्ते संघर्ष समितीने दिलेल्या इशाऱ्यानंतरच या कामाला सुरुवात झाली असल्याचा उल्लेख करण्यात आला. समितीच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे प्रशासन जागे झाले असून, स्थानिक नागरिकांनी या हालचालीचे स्वागत केले आहे.






## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१४ सप्टेंबर

१) श्री. जनार्दन टिल्लू
कोळावाडा,थळ-बाजार
१४-०९-१९५१

२)श्रीम जयश्री गांधी
अरुणा कॉम्प्लेक्स, अलिबाग
१४-०९-१९५८

३)सदाशिव तुकाराम पाटील
कोळीवाडा, अलिबाग
१४-०९-१९५९

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

# तळा बसस्थानकात जीवघेणे खड्डे

## दुरुस्तीचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याची मागणी

**। तळा । प्रतिनिधी ।**

तळा बसस्थानकाच्या उघड्या खड्ड्यांमुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला असून, बसस्थानकाचे उर्वरित काम लवकरात लवकर पूर्ण करण्याची मागणी येथील नागरिकांकडून केली जात आहे. बसस्थानकासमोरील काँक्रिटीकरण, संरक्षक भिंत, शौचालय व त्यावरती विश्रांती खोली असे बसस्थानकाच्या कामाचे स्वरूप असून, गणेशोत्सवापूर्वी काँक्रिटीकरणाचे काम पूर्ण करण्यात येऊन याठिकाणी एसटीची वाहतूक सुरू झाली. मात्र, बाजूलाच शौचालयासाठी एक मोठा खड्डा व संरक्षक भिंतीसाठी सहा मोठे खड्डे खोदण्यात आले आहेत.



गणेशोत्सवानंतर उर्वरित कामाला सुरुवात करण्यात येईल, असे संबंधित ठेकेदाराकडून सांगण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्षात कामाला सुरुवात न झाल्याने या खड्ड्यांमधून पाणी, प्लास्टिक पिशव्या, बॉटल्स विविध प्रकारचा कचरा साचून घाणीचे साम्राज्य पसरले आहे. यामुळे डासांची पैदास होऊन साथीचे आजार पसरण्याची शक्यता आहे. तसेच हे खड्डे उघड्या अवस्थेत असून, आजूबाजूला लोखंडी सळ्या पसरल्या असल्याने रात्रीच्या वेळी याठिकाणी अपघात घडून जीवितास धोका संभावण्याची शक्यता नाकारता येत नाही. शौचालयाचे काम अपूर्ण असल्याने येथील प्रवाशांचीदेखील मोठी गैरसोय होत आहे. शिवाय, अपुऱ्या कामामुळे बसचालकाला बस लावताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. अपुऱ्या कामामुळे अशा अनेक समस्या भेडसावत असल्याने संबंधित ठेकेदाराने तळा बसस्थानकाचे उर्वरित काम लवकरात लवकर पूर्ण करावे, अशी मागणी तळावासीयांकडून केली जात आहे.

## महावितरणचा सावळागोंधळ

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

चौक परिसरातील वीज पुरवठा यांचा सावळागोंधळ संपण्याचे नाव घेत नाही, त्यामुळे चौक हद्दीतील हातनोली ग्रामस्थ यांनी चौक कार्यालयात निवेदन दिले. गेले अनेक दिवस चौक परिसरातील गावांत वीज पुरवठा गोंधळ सुरू आहे, अनेक पक्षांच्या नेत्यांनी मोर्चे काढले, निवेदन दिले, बैठका झाल्या, पण वीज मंडळाचा सावळागोंधळ संपत नाही. आ. महेश बालदी यांनीही बैठक घेतली होती.

हातनोली गावात वारंवार वीजपुरवठा खंडित होत आहे, त्यामुळे पाणीपुरवठा, पिठाची गिरणी, विद्यार्थी यांचा अभ्यास, गृहिणी यांना होणारा त्रास सुरूच आहे, त्यामुळे येथील ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते प्रदीप गोंधळी, प्रदीप देशमुख, मयूर सक्सेना, काशीनाथ घनसोलकर, ज्येष्ठ नागरिक रघुनाथ ठोंबरे व चंद्रकांत मते यांनी निवेदन दिले.

# परप्रांतीय भाडेकरूच्या वादात एकाचा खून

**■ देवन्हावे गावातील घटनेने सर्वत्र खळबळ**

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

देवन्हावे गावातील खासगी एका रूममध्ये राहात असलेल्या दोघा परप्रांतियांमध्ये अज्ञात कारणावरून वाद झाला. या वादात अकत्तर हबिद (मूळ रा. बैठा मधूवणी बिहार) याने पारस हरिहर सिंह (५०) याच्या डोक्यात मारल्याने त्याचा मृत्यू झाल्याची घटना गुरूवार, दि.११ सप्टेंबर रोजी घडली आहे. या घटनेनंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाला असून, खोपोली पोलीस शोध घेत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, पारस हरिहर सिंह (५०, मूळ रा. खैरावा बिहार) हा मॅक्स स्पेअर कंपनीत कामावर होता. काही महिन्यांपूर्वीच त्याने कंपनीतील काम सोडले होते आणि दुसऱ्या कंपनीत काम करत होते. तो देवन्हावे गावात खासगी रूमवर राहात होता. गावाला जाण्यासाठी दोघांनीही आठवड्यापासून कंपनीत रजा काढली होती आणि ते रूमवर राहात होते. दरम्यान, अकत्तर हबिद याच्यासोबत वाद झाले आणि या वादात अकत्तरने पारस हरिहर सिंह यांच्या डोक्यावर गंभीर दुखापत केल्यामुळे गंभीर जखमी झाले.उपचारासाठी खोपोली नगरपालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर रूग्णालयात आणले असता डॉक्टरांनी मृत असल्याचे घोषित केले. या घटनेनंतर आरोपी पसार झाला आहे.

या घटनेची बातमी खोपोली पोलीस ठाण्यात कळविताच पोलीस निरीक्षक सचिन हिरे घटनास्थळी पोहोचून माहिती घेऊन गुन्हा दाखल केला आहे.

## शिक्षक पतपेढीचा आज शतक महोत्सव

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. अलिबाग या संस्थेचा शतक महोत्सव रविवारी (दि.१४) अलिबागमध्ये साजरा करण्यात येणार आहे. शालेय शिक्षण व सहकार राज्यमंत्री पंकज भोयर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडणार आहे.

यावेळी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन तथा माजी आ. जयंत पाटील, खासदार धैर्यशील पाटील, खासदार सुनील तटकरे, महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे, रोजगार हमीमंत्री भरत गोगावले आदी मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा सकाळी अकरा वाजता कुरुळ येथील क्षात्रैक्य समाज हॉल येथे साजरा करण्यात येणार आहे. सहकार भारतीचे महामंत्री विवेक जुगादे हे प्रमुख मार्गदर्शक असणार आहेत. या कार्यक्रमाच्या निमित्ताने माजी संचालक, विद्यमान संचालक, प्रत्येक तालुक्यातून दोन आदर्श शिक्षकांचा सन्मान करण्यात येणार आहे. पाककला व रांगोळी स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस देऊन गौरविण्यात येणार आहे. संस्थेचे आतापर्यंत एक हजार ३०० हून अधिक सभासद असून, संस्थेची वार्षिक उलाढाल ११८ कोटी रुपये इतकी आहे.

# अवैध वाहनांवर पोलिसांची धडक कारवाई

**■ साडेआठ लाखांची वाहने जप्त**

**। महाड । प्रतिनिधी ।**

एमआयडीसी पोलिसांनी बेकायदेशीरपणे वाहने बाळगणाऱ्यांवर धडक कारवाई करत सुमारे आठ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलीस ठाण्यातील कर्मचारी जीवन बाबू पवार यांच्या खबरीनुसार ही कारवाई करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महपुस मजीदुल्हा खान (३८, धंदा-भंगार, रा. नांगलवाडी, ता. महाड, जि. रायगड) याच्याकडे कोणतेही परवाने नसताना विविध वाहने संशयास्पद स्थितीत मिळून आली.

यामध्ये पिवळ्या रंगाची आयशर स्कूल बस (एमएच ०४ जी ७६३४), पिवळा टाटा छोटा हत्ती (एमएच ०९ डीए ९९२१), सिल्व्हर होंडा सिटी कार (एमएच ४३ एन ६८६८), मॅट डोअर (एमएच ०६ बीजी १६३६) व पांढरी मारुती स्विफ्ट (एमएच ०२ बीजे ८६९४) यांचा समावेश असून त्याची एकूण किंमत सुमारे ८.५० लाख रुपये आहे. ही कारवाई ११ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास नडगाव हद्दीत काळभैरव मंदिराजवळ करण्यात आली. महपुस मजीदुल्हा खान याने त्याच्या ताब्यातील वाहनांबाबत कोणतेही समाधानकारक स्पष्टीकरण न दिल्याने संशयावरून ही कारवाई करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी पुढील तपास पोहवा पवार करत असून, कारवाईदरम्यान महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सपोनि जे.एच. माने उपस्थित होते.

# विद्यार्थिनींना सॅनिटरी पॅडचे वाटप

**। खांब । प्रतिनिधी ।**

दीपक नायट्राईट कं. धाटाव आणि दीपक फाऊंडेशन रोहा व मैत्री प्रतिष्ठान सामाजिक संस्था रोहा यांच्या संयुक्त विद्यमाने सानेगाव येथील आश्रमशाळा येथे किशोरवयीन विद्यार्थिनींसाठी आरोग्यविषयक मार्गदर्शन शिबीर व सॅनिटरी पॅडचे मोफत वितरण करण्यात आले. या कार्यक्रमासाठी मैत्री प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष निलेश वारंगे, उपाध्यक्ष महेश खांडेकर, खजिनदार नारायण चितळकर, सचिव राजेश काफरे, सदस्य भारत वाकचौरे तसेच दीपक फाऊंडेशनच्या प्रकल्प समन्वयक प्रीती कापसे आणि प्रकल्प स्टेमच्या विषय शिक्षक प्राजक्ता धुमाळ, प्राची शिर्के आणि अमोल जाधव व सानेगाव आश्रमशाळेचे एम. पी. पाटील, मिलिंद पाटील, दिलीप सकपाल, निलेश म्हात्रे, अधीक्षिका प्रेरणा मेंगळ, मनिषा ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते.



या उपक्रमाचा उद्देश म्हणजे शाळांमधील सर्व मुलींना मोफत सॅनिटरी पॅड उपलब्ध करून, स्त्रियांना होणारा त्रास कसा टाळता येईल हा होता. तसेच, या कार्यक्रमामध्ये मासिक पाळीदरम्यान घ्यावयाची काळजी आणि सॅनिटरी पॅडचा उपयोग न केल्यामुळे होणारे दुष्परिणाम याची माहिती देऊन जनजागृती करण्यात आली. सानेगाव आश्रमशाळेमध्ये सुमारे १५० आदिवासी किशोरवयीन विद्यार्थिनी शिकत आहेत, त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आणि त्यांना येणाऱ्या अडचणी व कोणत्याही चांगल्या प्रतीच्या सुखसोयी उपलब्ध नसताना त्या मुलींना आपले शिक्षण सुरू ठेवता यावे यासाठी मैत्री प्रतिष्ठान सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष निलेश वारंगे यांनी हातभार लावून आपले सामाजिक कार्य सुरू ठेवले. या त्यांचा उपक्रमात समाजातील अनेक सामाजिक संस्था यांनी सहभागी होऊन निःस्वार्थ मदत केली पाहिजे, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# नवरात्रोत्सवासाठी मंडळांची लगबग

**। तळा । प्रतिनिधी ।**

तालुक्यात गणेशोत्सवानंतर सर्वत्र नवरात्रोत्सवासाठी मंडळांकडून लगबग सुरू झाली आहे. अवघ्या नऊ दिवसांवर नवरात्र उत्सव येऊन ठेपला असल्याने नवरात्र उत्सव मंडळ तयारीला लागले आहे. नवरात्र म्हटले की, तरुण-तरुणी या दिवसांची आतुरतेने वाट पाहात असतात. यामध्ये देवीच्या आराधनेसोबतच नृत्यकला ही मोठ्या प्रमाणात सादर केली जाते. तरुणाई नऊ दिवस नऊ रंगांचे कपडे परिधान करतात. देवीची पूजा, आरती करून रात्री गरबा रासचा आनंद लुटला जातो.



नवरात्र उत्सव काही दिवसांवर येऊन ठेपला असल्याने तालुक्यातील नवरात्रोत्सव मंडळांनी आपल्या आवडीची मूर्ती बुकिंग करण्यास सुरुवात केली आहे. देवीसाठी लागणारे मंडप, साऊंड सिस्टीम, हार, वेणी, फुले यांसह नऊ दिवस घेण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात देवीभक्त मग्न झाले आहेत. मूर्तींच्या कारखान्यात रंगकाम करणारे कारागीर देवीच्या मूर्तीवर शेवटचा हात फिरविण्यात व्यस्त आहेत. यंदा डिझाईन व हिरेजडित देवी मूर्तींना पसंती असल्याने मंडळाच्या मागणीप्रमाणे देवीची मूर्ती सजविण्यात येत आहे. एकंदरीत, तळा तालुक्यात नवरात्रोत्सवाची लगबग सुरु झाल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.

## जिद्दीने साथ दिली, पण नशीब रुसले

# उपअभियंता श्रुती गायकवाडचे निधन

**। महाड । प्रतिनिधी ।**

किल्ले रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या ऐतिहासिक पाचाड गावातील सिद्धार्थ भागुराम गायकवाड यांची कन्या श्रुती हिने जिद्दीच्या जोरावर प्रशासकीय परीक्षा दिली आणि श्रुती हिला महाट्रान्सकोमध्ये उपअभियंतापदावर नेमणूकदेखील झाली. मात्र, नियतीला हे भावले नाही आणि अल्पशा आजारामध्ये तिचे निधन झाले.

बौद्धजन उत्कर्ष मंडळ मुंबई पाचाड या मंडळाचे कार्याअध्यक्ष सिद्धार्थ भागुराम गायकवाड नोकरी व्यवसायनिमित्त मुंबई येथे आहेत. त्यांची द्वितीय कन्या श्रुती जिने



जीवाची बाजी लावून अथक परिश्रम घेऊन प्रशासकीय परीक्षा दिली होती. उत्तम यश संपादन करत महाराष्ट्र शासनाच्या महाट्रान्सको या कंपनीमध्ये उपअभियंता या पदावर नुकतीच रुजू झाली होती. एकीकडे तिच्या यशाचे गोड कौतुक सर्वत्र सुरू होते. जन्मगाव असलेल्या पाचाडमध्येदेखील तिचा नुकताच सत्कार झाला होता. तर, महाडमध्येदेखील समाजाच्या वतीने सत्कार केला जाणार होता. मात्र, नियतीच्या मनात काही वेगळेच होते. श्रुतीला अचानक ताप आल्याने अपोलो रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. या अल्पशा आजारातच मृत्यूशी झुंज देत असताना वयाच्या अवघ्या २८ व्या वर्षी दिनांक १२ सप्टेंबर रोजी दुपारी १.३० वाजता तिचे आकस्मिक निधन झाले.

# मुरुडच्या 'बाजारपेठ राजा'ला निरोप

**■ महिलांचे पारंपरिक नृत्य**



**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड बाजारपेठ मित्र मंडळाच्या वतीने मुरुड बाजारपेठेतील भाजी मार्केटजवळ भव्य मंडपात साखरचौथ गणपती प्रतिष्ठापना करण्यात आली होती. यावेळी दीड दिवसात मुरुड शहरासह पंचक्रोशी भागातील हजारो गणेशभक्तांनी दर्शन घेतले. यावेळी भाविकांनी महाप्रसाचा आस्वाद घेतला. गुरुवारी विसर्जनाच्या आधी गणेशाच्या मूर्तीची उत्तर पूजा पुरोहित नरेंद्र सिंह कछवाह यांच्याकडून करण्यात आली.

तद्नंतर बाप्पाची आरती करून मिरवणूक काढण्यात आली. डिजेच्या तालावर फटक्यांची आतषबाजी करत शेकडो महिलांनी पारंपरिक फुगडी नृत्य सादर केले.

रात्री उशिरा समुद्रकिनारी महाआरती करुन 'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया'चा जयघोष करीत विसर्जन सोहळा पार पडला. यावेळी मुरुड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# नांदगाव विद्यालयात पासवर्ड वाचन अभियान

**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

युनिक फिचर संस्था पुणे व बल्लाळेश्वर देवस्थान पाली यांच्या संयुक्त विद्यमाने संत नामदेव माध्यमिक विद्यालय कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव येथे नुकताच वाचन मेळावा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना वृषाली जोगळेकर, स्नेहल भिडे, वसुधा बोरकर यांनी आपल्या कौशल्याच्या आधारे हसत खेळत विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधला. पासवर्ड वाचन अभियानाच्या माध्यमातून धोकेबाज मुलांसाठी भन्नाट खुराकांचा समावेश या पुस्तकात करण्यात आला आहे. या पुस्तकात भन्नाट कथा, भारी अनुभव, थोडी माहिती थोड्या गमती, हे नक्की वाचा, फोटोमधून वाचू शिकू यांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच आनंदी वाचन संस्थेच्यावतीने शाळेस सहा हजारांची पुस्तके भेट देण्यात आली.



या कार्यक्रमासाठी वृषाली जोगळेकर उपक्रम प्रमुख, स्नेहल भिडे, वसुधा बोरकर, प्राचार्य बबन पालवे, बल्लाळेश्वर देवस्थान विश्वस्त अरुण गद्रे, व्यवस्थापक पद्माकर फाटक, विद्यालयातील शिक्षक वृंद आदी मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमाचे सर्वांनी कौतुक केले.

## नवरात्रोत्सवाचे वेध

**अलिबाग :** तालुक्यातील विविध ठिकाणच्या बाजारपेठा नवरात्र उत्सवासाठी लागणाऱ्या साहित्यांनी फुलल्याचे दिसून येत आहे. विविध रंगीबेरंगी टिपऱ्या, वेगवेगळ्या आकाराचे रेडिमेड कपडे, पूजा साहित्य आदी साहित्य व्यावसायिकांनी विक्रीसाठी आणल्याचे दिसून येत आहे. नवरात्र उत्सवाला आठ दिवस बाकी असल्याने ग्राहकांची खरेदीसाठी आतापासून लगबग दिसून येत आहे.

**पान १ वरून**

## पाली हादरलं

तलाठी व सर्कल यांना तातडीने महागाव पंचक्रोशीत पाहणीसाठी रवाना करण्यात आले असल्याचे समजते. या घटनेमुळे प्रशासन कोणती भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. याबाबत भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभाग, पुणे यांच्याशी संपर्क साधला असून, त्यांच्यामार्फत सर्वेक्षण करण्यात येणार असल्याचे तहसीलदार उत्तम कुंभार यांनी सांगितले. तरी, नागरिकांनी घाबरुन न जाता सतर्क राहावे, असे आवाहन श्री. कुंभार यांनी केले आहे.

# ॲड. परेश जाधव पुरस्काराने सन्मानित



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुक्यातील इंदापूर गावचे ज्येष्ठ विधिज्ञ तथा सामाजिक कार्यकर्ते ॲड.परेश मारुती जाधव यांच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात केलेल्या विशेष उल्लेखनीय कार्याची दखल घेत राष्ट्रीय दर्पण शिक्षक गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नाशिक येथे रविवार, दि. ७ सप्टेंबर रोजी झालेल्या कार्यक्रमात त्यांचा पुरस्कार प्रदान करुन गौरव करण्यात आला.

दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संस्था नाशिक यांच्यावतीने नाशिक येथे रोटरी क्लब सभागृहात गंजमाल येथे रविवार, दि.७ सप्टेंबर २०२५ रोजी एका विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. महेंद्र देशपांडे, जिल्हा न्यायाधीश दीपक धोलकीया, मंदार भारदे, पद्मश्री चैत्राम पवार, डॉ. लीना भट, अनिल नहार आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार ॲड. जाधव यांना प्रदान करण्यात आला.

# मोकाट गुरांचे रस्त्यावर अतिक्रमण



**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यात मोकाट गुरे ही वाहन चालकांची मोठी समस्या निर्माण झाली आहे.ही मोकाट गुरे सरळ रस्त्याच्या मधोमध बसण्याचा मार्ग अवलंबतात. परिणामी, वाहतूक कोंडीची समस्या डोके वर काढत आहे. त्याचबरोबर वाहन चालकास अपघाताला सामोरे जावे लागत आहे. ही वस्तुस्थिती सध्या निर्माण झाली आहे. यामध्ये मोकाट गुरे आणि शेतकऱ्यांच्या गुरांचा मोठ्या प्रमाणात समावेश आहे.

रात्रीच्या वेळी सावरोली-खारपाडा या रस्त्यावर अवजड वाहनांची रेलचेल असल्यामुळे ह्या गुरांना अपघाताला सामोरे जावे लागते. यामध्ये प्रामुख्याने गाय, बैल, वासरे यांचा मोठ्या प्रमाणात समावेश असतो. त्याचबरोबर गुरेचोरीचे प्रमाण वाढले आहे. रात्रीच्या वाहन चालकाच्या समोर अचानक मोकाट गुरे आल्यास अपघात होण्यास वेळ लागत नाही.

प्रामुख्याने खालापूर, खोपोली, आपटा, मोहपाडा, रसायनी या परिसरात ह्या मोकाट गुरांनी रस्त्यावर आपला मोर्चा रस्त्यावर वळविला आहे. परिणामी, वाहतुकीची कोंडी, अपघात आदी समस्या भेडसावत आहेत. या सर्व कारणावरून अपघाताचे प्रमाणत वाढत चालले आहे. यामुळे दिवसा-रात्री वाहन चालकास मोठ्या हुशारीने वाहन चालवावे लागते. अशा परिस्थितीत एखादे जनावर समोर आल्यास अपघाताला सामोरे जावे लागते. वाहन चालकास रात्रीच्या वेळी वाहन चालवणे ही एक मोकाट गुरांमुळे मोठी समस्या निर्माण झाली आहे.

# पत्रकारिता प्रमाणपत्र कार्यशाळा

**। खरोशी । प्रतिनिधी ।**

जन शिक्षण संस्था रायगड केंद्रातून भारत सरकार मान्यताप्राप्त विविध योजनांचे प्रशिक्षण दिले जाते. यात महत्त्वाचे म्हणजे, महिला सक्षमीकरण, कौशल्य दीक्षांत, शिवणकाम, फॅशन डिझायनिंग, कुकिंग, रांगोळी, मेहंदी, अशी ४० हून अधिक उपक्रमांचे प्रशिक्षण या संस्थेच्या माध्यमातून दिले जातात.

संपादक मिलिंद खारपाटील यांच्या प्रयत्नांनी आवाज महामुंबई चॅनलच्या माध्यमातून १५ पत्रकारांना जन शिक्षण संस्था रायगडद्वारे दोन दिवसीय कार्यशाळेत अनुभवी तज्ज्ञांकडून प्रशिक्षणाखेरीज मार्गदर्शन देण्यात आले.

पत्रकारिता म्हणजे काय? ती कशी करावी व त्यातून सामाजिक बांधिलकी कशी जपावी, हे शिकवण्यात आले.

संस्थेच्या सर्वेसर्वा संस्थापक अध्यक्ष डॉ. मेधा किरीट सोमय्या यांनी पत्रकारांशी परिसंवाद साधला आणि त्यांच्या अनेक प्रश्नांची उत्तरे दिली.

यावेळी विविध पत्रकारांनी आपली ओळख देऊन आपला उद्देश तसेच काम करताना समाजात आलेले कटू अनुभव व्यक्त केले. डॉ. मेधा सोमय्या यांनी पत्रकारांना उद्देशून विविध क्षेत्रातून आपले अनुभव सांगून मोलाचे मार्गदर्शन केले.



# दास्तान फाटा येथे अपघातांच्या प्रमाणात वाढ

## • सिग्नल बसविण्याची शेकापची मागणी

| उरण | प्रतिनिधी |

**उरण तालुक्यातील दास्तान फाटा येथे अपघाताचे तसेच वाहतूक कोंडीच्या प्रमाणात वाढ होत आहेत. त्यामुळे भविष्यातील होणारे अपघात टाळण्यासाठी दास्तान फाटा येथे सिग्नल बसविण्यात यावे, अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाचे उरण विधानसभा अध्यक्ष मयूर सुतार यांनी वाहतूक प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी तिरुपती काकडे यांच्याकडे केली आहे. या मागणीला काकडे यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद देखील मिळाला आहे.**



उरण तालुक्यातील दास्तान फाटा, जासई पुलाजवळ आणि परिसरात आतापर्यंत एकूण १७ अपघात झाले आहेत. त्यापैकी काही किरकोळ तर काही गंभीर स्वरूपाचे अपघात झाले आहेत. तसेच, काही जणांना मृत्यूला देखील समोर जावे लागले आहे. तसेच, याठिकाणी वाहतुककोंडीची समस्या देखील प्रचंड प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे भविष्यातील होणारे अपघात टाळण्यासाठी दास्तान फाटा येथे सिग्नल बसविणे गरजेचे असल्याचे स्थानिकांसह प्रवासी वर्गातून बोलले जात आहे. दरम्यान याबाबतची मागणी शेतकरी कामगार पक्षाचे उरण विधानसभा अध्यक्ष मयूर सुतार यांनी वाहतूक प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी तिरुपती काकडे यांच्याकडे केली आहे.

भविष्यात जेएनपीटी नोड देखील नव्याने होणार आहे. अशावेळी रहदारी देखील वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून कोणत्याही निष्पाप लोकांचे जीव धोक्यात जाऊ नये, कोणाचेही अपघात होऊ नये, म्हणून यावर लवकरच याबाबत निर्णय घेऊ, असे आश्वासन डीसीपी तिरुपती काकडे यांनी मयूर सुतार यांना दिले आहेत. तसेच, मयूर सुतार यांनी जेएनपीटी व्यवस्थापक मनीषा जाधव यांच्याशी पत्रव्यवहार केला असता त्यांनीही या मागणीस सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. त्याचबरोबर ही बाब जेएनपीटीचे मुख्य महा प्रबंधक डॉ. जी वैद्यनाथन यांच्याही निदर्शनास आणून दिली असता त्यांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

## मुरूडकरांना लागले नवरात्रौत्सवाचे वेध

**आगरदांडा :** गणेशोत्सवानंतर भाविकांना आता नवरात्रौत्सवाचे वैध लागले आहेत. येत्या २२ सप्टेंबर रोजी देवीची घटस्थापना करण्यात येणार आहे. त्यामुळे मुरूड तालुक्यातील सर्वच ठिकाणी गणेश कला मंदिरात देवी बनवण्याचे काम जोरदार सुरू आहे. त्यात आशिष खोत यांच्या सुबक आणि सुप्रसिद्ध देवींच्या मूर्तीकडे भक्त आपोआपच आकर्षिले जातात. मुरूड बाजारपेठेतील चंद्रकांत खोत यांनी ७० वर्षांपुर्वी गणेश कला मंदिराची स्थापना केली होती. यंदा मूरूड पोलीस ठाणे हद्दीत सार्वजनिक ६३ व खासगी १३अशा देवींच्या मूर्तींची स्थापना होणार असून १५ घट तर ८ देवींच्या प्रतिमेची घरगुती प्रमाणे स्थापना करून पारंपरिक पद्धतीने पूजा केली जाणार आहे, अशी माहिती पोलीस मकरंद पाटील यांनी दिली आहे.

## स्व. मिनाक्षी पाटील यांना अभिवादन



| अलिबाग | प्रतिनिधी |

प्रभाकर पाटील सार्वजनिक वाचनालयाच्या रामनारायण सभागृहात शनिवार (दि.१३) माजी राज्यमंत्री तथ रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या माजी अध्यक्षा स्व.मिनाक्षी पाटील यांना त्यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. हा कार्यक्रमाचे आयोजन प्रभाकर पाटील सार्वजनिक वाचनालय आणि स्व. प्रभाकर पाटील सांस्कृतिक मंच यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आला होता. यावेळी स्व. मिनाक्षी पाटील यांच्या प्रतिमेला रायगड पत्रकार संघाचे उपाध्यक्ष तसेच ग्रंथमित्र पुरस्कार प्राप्त नागेश कुळकर्णी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान स्व. मिनाक्षी पाटील यांच्या आठवणींना उजाळा देण्यात आला.

यावेळी ज्येष्ठ नाट्यकर्मी शरद कोरडे, माजी नगरसेवक आर.के. घरत, कोमसापचे जिल्हा प्रतिनिधी नंदू तळकर, विनोद टेंबुलकर, जिल्हा पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष विकास पाटील, अलिबाग सार्वजनिक वाचनालयाचे कार्यवाह संतोष बोंद्रे, चारुशीला कोरडे, सार्वजनिक वाचनालयाच्या ग्रंथपाल ज्योती म्हात्रे, हेमकांत सोनार, झेबा कुरेशी आदी उपस्थित होते.

## पालीत बनावट पोलिसांचा थरार

**पाली/वाघोशी :** पाली शहरात बनावट पोलिसांच्या नावाखाली गुन्हेगारी थैमान वाढले असून, नुकत्याच घडलेल्या धक्कादायक घटनेने नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. राम आळी येथील प्रांजली कुलकर्णी (६९) या १० सप्टेंबर रोजी सकाळी पायी चालत असताना काळ्या मोटारसायकलवर व्यक्ती त्या ठिकाणी आले. त्यातील एकाने पांढरा शर्ट व काळी पॅन्ट, तर दुसऱ्याने खाकी कपडे घालून पोलीस असल्याचा आव आणला. यावेळी 'दागिने घालून फिरू नका, चोरी होईल', असे सांगून त्यांनी महिलेचा विश्वास संपादन केला. तसेच, दागिने पिशवीत ठेवण्यास भाग पाडले आणि तेथून दागिने घेऊन फरार झाले. या प्रकारात महिलेचे दीड तोळ्याची सोन्याची चेन व दोन बेंटेक्स बांगड्या असा अंदाजे ५० हजार रुपयांचा ऐवज लंपास झाला आहे.

## चाकूचा धाक दाखवणाऱ्याचा अपघात

| कोर्लई | प्रतिनिधी |

मुरुड-साळाव रस्त्यावर मजगाव ते नांदगावदरम्यान शाळेतील काही विद्यार्थिनींना चाकू दाखवून अनुचित प्रकार करुन पळणारा माथेफिरू बुलेटस्वाराचा शुक्रवारी दुपारच्या सुमारास बारशिव खिंडीत अपघात झाला. या अपघातात बुलेटस्वार गंभीर जखमी झाला आहे. कल्पेश देवधरे (३७) असे या माथेफिरू बुलेटस्वाराचे नाव असून तो श्रीवर्धन तालुक्यातील दिघी-सर्वा येथील रहिवाशी आहे.



मुरुड तालुक्यातील बारशिव गावाजवळ शुक्रवारी दुपारी साडेबाराच्या सुमारास एक अनुचित प्रकार घडला. दिघी सर्वे येथील कल्पेश देवधरे या माथेफिरूने नांदगाव शाळेतील काही मुलींना चाकू दाखवून छेडछाड करीत अशांतता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्या मुलींनी त्यावेळी आरडाओरड केल्याने आजूबाजूचे रहिवाशांना तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. दरम्यान, तिथून पळ काढणाऱ्या आरोपीचा पाठलाग केला असता बारशिव खिंडीतील वळणावर भरधाव वेगाने जाणाऱ्या बुलेटचे नियंत्रण सुटल्याने मुरुडकडे जाणाऱ्या एका एसटी बसला जोरदार धडक दिली. या धडकेने तो रस्त्याच्या बाजूला असलेल्या कुंपणात फेकला गेला. त्यामध्ये तो गंभीर जखमी झाला आहे. या घटनेचे वृत्त समजताच रेवदंडा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन जखमी बुलेटस्वाराला नजीकच्या बोर्ली मांडला प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. त्यानंतर त्याला अधिकच्या उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात व तेथून मुंबईला हलविण्यात आले आहे. या घटनेचा पुढील तपास रेवदंडा पोलीस ठाण्याचे निरीक्षक श्रीकांत किरवले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस शीला ठाकूर करीत आहेत.

## उरणमधील रस्त्यांवर धुळीचे साम्राज्य

| उरण | प्रतिनिधी |

उरण तालुक्यातील खोपटा पुल ते कोप्रोली आणि चिर्ले ते दिघोडे रस्त्यावर सध्या धुळीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणारे नागरीक हैराण झाले असून त्यांच्या आरोग्याला देखील धोका निर्माण झाला आहे. सध्या उरण तालुक्याचा विकास झपाट्याने होत आहे. परंतु, विकास कामांना भ्रष्ट राजकारण्यांची किड लागल्याने त्यांचा सामना हा सर्व सामान्य माणसाला सहन करावा लागत आहे. त्यात खोपटा पुल ते कोप्रोली आणि चिर्ले ते दिघोडे रस्त्यावर खड्ड्यांचे विघ्न दुर करण्यासाठी चिखल मिश्रित रेती पसरल्याने सध्या या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात धुळीचे लोट उचलल्याचे चित्र आहे. अशा रस्त्यातून मार्गक्रमण करणाऱ्या प्रवासी नागरीकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे.







# दामिनी पथकाला दुचाकीची प्रतीक्षा

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

**सार्वजनिक ठिकाणी महिला आणि मुलींचे छेडछाडीपासून संरक्षण व्हावे यासाठी दामिनी पथकाची निर्मिती करण्यात आली आहे. मात्र, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांच्या मतदारसंघात दामिनी पथकाला दुचाकी नसल्याचे समोर आले आहे. सध्या श्रीवर्धन पोलीस ठाणे येथील दामिनी पथकातील अंमलदाराना गस्तीसाठी खासगी दुचाकीचा वापर करावा लागत आहे.**

## गस्तीसाठी खासगी वाहनाचा वापर



तरुणी आणि महिलांची सार्वजनिक ठिकाणी होणारी छेडछाड, शाळा, कॉलेज, बसस्थानक अशा ठिकाणी विद्यार्थीनींना तरुणांकडून होणारा त्रास, अत्याचारा सारख्या घडणाऱ्या घटना पासून महिलांना समाजात वावरता यावं यासाठी दामिनी पथकाची स्थापना करण्यात आली. श्रीवर्धन पोलीस ठाण्यातही २०१५ सालात दामिनी पथक तैनात करण्यात आले.

दामिनी पथक हे दोन टप्प्यांत काम करत आहे. पहिला टप्पा म्हणजे पोलीस गणवेशात दुचाकी वरून शहरात गस्त घालण्याचे काम तर दुसरे काम म्हणजे दुचाकी वरून पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालणे. दामिनी पथकाची श्रीवर्धन पोलीस ठाणे येथे स्थापना झाल्यानंतर काही दिवसातच दुचाकी देण्यात आली. दामिनी पथकातील अंमलदार श्रीवर्धन पोलीस ठाणे हद्दीत दुचाकी वरून गस्त घालत असल्याने विद्यार्थीनी, महिलांत सुरक्षेततेची भावना निर्माण झाली होती. श्रीवर्धन पोलीस ठाणे हद्दीत ४८ गावं येत असून क्षेत्रफळ ६२८.३४ चौरस किलोमीटर आहे तर लोकसंख्या ४६,९३९ इतकी आहे.यामध्ये अंदाजे २२,१४३ महिलांच्या सुरक्षेची जबाबदारी दामिनी पथकातील अंमलदार सांभाळत आहेत. २०१५ साली दामिनी पथकाला देण्यात आलेली दुचाकी सध्या बंद अवस्थेत आहे. दामिनी पथकासाठी अद्यापही नवीन दुचाकी देण्यात आल्या नसल्याने या पथकातील अंमलदार खासगी दुचाकीचा वापर करत आहेत.

> **दामिनी पथका साठी एक दुचाकी मिळण्या करिता वाहतूक नियंत्रक अधिकारी,अलिबाग यांचे कडे विनंती करण्यात आली आहे.**
> **– उमेश पाटील**
> **पोलीस निरीक्षक,**
> **श्रीवर्धन पोलीस ठाणे**

## दास्तान फाटा परिसरात आढळला मृतदेह

। पनवेल । प्रतिनिधी ।

दास्तान फाटा परिसरात एका अज्ञात इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकाचा शोध उरण पोलीस करीत आहेत. सदर अनोळखी इसम पुरूष वय अंदाजे ३५ वर्ष, अंगाने सडपातळ, उंची साधारण ५ फुट ३ इंच, रंग सावळा, चेहरा उभट, डोक्यास पाठीमागुन जखम, केस काळे पांढरे, वाढलेली, डोळे बंद, अंगात नेसुस निळ्या रंगाची जीन्स व निळया रंगाचा फुल शर्ट त्यावर पांढरे रंगाचे पट्टे असलेला, इंग्रजीत लिहिलेले निळया रंगाची अंडरवेअर अशा वर्णन आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास उरण पोलीस ठाणे यांच्याशी संपर्क साधावा.

## निवडक

### गतीरोधकावर पांढरे पट्टे बसविण्याची मागणी

**अलिबाग :** अलिबाग - रोहा मार्गासह अलिबाग - रेवदंडा, अलिबाग रेवस आणि अलिबाग पेण मार्गावरील अनेक रस्त्यांवर गतिरोधक बसविण्यात आले आहे. या गतिरोधकांवर पांढरे पट्टे नाहीत त्यामुळे वाहन चालकांना अपघाताला सामोरे जावे लागत आहे. अपघात रोखण्यासाठी गतिरोधकावर पांढरे पट्टे बसविण्यात यावे अशी मागणी चालकांसह जनतेकडून केली जात आहे. अलिबाग रोहा, अलिबाग रेवदंडा, अलिबाग रेवस अलिबाग पेण या मार्गावर वाहनांची वर्दळ कायमच असते. अलिबाग हे जिल्ह्याचे ठिकाण असल्याने या ठिकाणी नोकरी व्यवसायानिमित्त तसेच शिक्षणासाठी येणाऱ्यांची संख्या प्रचंड आहे. काही जण एसटी बसने तर काही जण त्यांच्या खासगी चारचाकी, तीन चाकी आणि दुचाकीने ये-जा करतात. या मार्गावरील खड्ड्यांच अवस्था बिकट असताना यातून मार्ग काढताना चालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. परंतु, या मार्गावर ठिकठिकाणी गतिरोधक बसविण्यात आले आहेत. या ठिकाणी काही गतिरोधकांवर पांढरे पट्टे बसविण्यास सार्वजनिक बांधकाम विभाग व राष्ट्रीय महामार्ग विभाग उदासीन ठरले आहे. त्याचा फटका चालकांना कायमच बसत आहे. गतिरोधकांवर पांढरे पट्टे बसविले नसल्याने वाहन चालविताना चालकांना गतिरोधक लक्षात येत नाही. त्यामुळे अनेक वेळा वाहनांचा अपघात होत आहेत. विशेष म्हणजे दुचाकी वाहने घसरून पडण्याची भिती अधिक निर्माण झाली आहे. त्यामुळे चालक व प्रवाशांच्या सुरक्षेसाठी गतिरोधकांवर पांढरे पट्टे बसवण्यात यावेत अशी मागणी चालकांकडून होत आहे.



### पंचायतराज अभियानामुळे ग्रामीण भागाची समृध्दीकडे वाटचाल

**रसायनी :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान याची सुरुवात १७ सप्टेंबर २०२५ पासून होणार आहे. त्यासाठी खालापूर पंचायत समितीच्या सभागृहात गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी सरपंच, सदस्य, पालक अधिकारी, ग्राम पंचायत अधिकारी, केंद्र प्रमुख, अभियान संपर्क प्रमुख यांची कार्यशाळा आयोजित केली होती. लोकसहभागातून मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान सकारात्मक स्पर्धा निर्माण करेल. या अभियानामुळे ग्रामीण भागात आर्थिक समृद्धी पोहोचेल, गावोगावी विकासाची नवी उर्जा मिळेल आणि ग्रामीण भागाची समृध्दीकडे वाटचाल होईल.कोकण विभाग अप्पर आयुक्त माणिक दिवे यांनी सांगितले. प्रमुख मार्गदर्शक व रायगड जिल्हा अभियान प्रमुख म्हणून कोकण अप्पर आयुक्त माणिक दिवे बोलत होते. सुशासनयुक्त पंचायत, सक्षम पंचायत, जल समृद्ध पंचायत, स्वच्छ व हरित गाव, व इतर योजनांची सांगड, गावपातळीवरील संस्थांचे सक्षमीकरण, उपजिविका विकास व सामाजिक न्याय, लोकसहभाग व श्रमदान माध्यमातून लोकचळवळ अशा घटकांचा समावेश करण्यात आला असून याच्यासाठी लोक सहभाग अत्यंत महत्त्वाचा वाटा आहे. खालापूर तालुक्यातील ४५ ग्राम पंचायत असून सर्वांनी त्यात मोठा सहभाग नोंदवला आहे. यावेळी सहायक गटविकास अधिकारी प्रदीप कांबळे, महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी विशाल कोतागडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. कल्याणी हिंगोले, विस्तार अधिकारी शैलेंद्र तांडेल, विनोद चांदोरकर, अर्जुन कदम, अभियंता जाधव, गटविकास अधिकारी संदीप कराड, सहाय्यक आयुक्त प्रदीप घोरपडे, सरपंच, सदस्य, पालक अधिकारी, ग्राम पंचायत अधिकारी, तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### इको गाडीची चोरी

**पनवेल :** पनवेल शहरातील अशियना सोसायटीच्या गेट जवळील झाडा खाली रस्त्यावर उभी करून ठेवलेली इको गाडी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. सुनील बोर्डे यांची एक लाख रुपये किमतीची इको गाडी क्र.एम एच ४६ एक्स ९६२२ ही वरील ठिकाणी उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### 'रस्त्यांची डागडुजी करा'



**पनवेल :** पनवेल शहरातील रस्त्यांची पाहणी करून डागडुजी करण्यात यावी अशी मागणी माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी मनपा आयुक्त मंगेश चितळे यांना निवेदन दिले आहे. नवीन पनवेल तसेच जुने पनवेल परिसरातील रस्त्यांच्या समस्या गंभीर आहेत. जवळपास सर्वच रस्ते खड्डेमय झालेले आहेत. त्यावरून चालताना किंवा दुचाकी, चारचाकी वाहने घेऊन जाताना किरकोळ आणि गंभीर अपघात होण्याचा धोका वाढलेला आहे. ज्या कंत्राटदाराला रस्त्यांचे कंत्राट मिळाले आहे त्यांचे नाव, मोबाईल नंबर हे त्या रस्त्यांच्या एका बाजुला ठळक अक्षरात प्रसिध्द करावे अशी विनंती वजा सुचना अशी त्यांनी केली आहे.



## वंचितच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली नवनियुक्त पोलीस निरीक्षकांची भेट

। उरण । प्रतिनिधी ।

उरण पोलिस ठाण्यात वरिष्ठ पोलिस निरीक्षक एच. डी. मुलाणी यांची नियुक्ती झाली आहे. त्यांनी उरण पोलीस ठाण्यात पदभार स्विकारला आहे. यानिमित्त उरण तालुका वंचित बहुजन आघाडीच्या वतीने उरण पोलीस ठाणे कार्यालयात वरिष्ठ पोलीस निरीक्षक एच. डी. मूलानी यांचा उरण पोलीस ठाण्यामध्ये त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आले. याप्रसंगी वंचित बहुजन आघाडी उरण तालुका पदाधिकारी अध्यक्ष तुकाराम खंडागळे, साहेबराव ओहोळ, तुषार गायकवाड, ईश्वर ढोले उपस्थित होते.

## शैक्षणिक साहित्याचे वाटप

। अलिबाग । प्रतिनिधी ।

सुरभी स्वयंसेवी संस्था अलिबाग रायगड व उज्वल भविष्य सामाजिक संस्था यांच्या सहयोगाने, शांता नारायण एज्युकेशनल चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई यांच्या मार्फत अलिबागमधील सिग्रल स्कूल येथे रस्त्यावर शिकणाऱ्या मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी सुप्रिया जेधे, डॉ. राजाराम हुलवान, उज्वल चंदनशिव, रेखा पाटील,सचिन बारवेकर, डॉ. नितीन गांधी, ॲड. रक्षा कोसमकर, काजल पटेल, नितीनकुमार राऊत, सुनिता पवार, आनंद पवार, कांचन शिंदे, शशांक सोनवणे, जीवन पोटफोडे उपस्थित होते.

## अंत्यविधीसाठी गोवऱ्यांचा वापर

। रेवदंडा । प्रतिनिधी ।

शहरीकरण औद्योगिकीकरण आणि विकासकामांच्या नावाखाली कोकणातील हिरवाई निर्दयपणे नष्ट होत आहे. जर ही बेफिकिरी थांबवली नाही तर उद्या सह्याद्रीच्या रांगांतून हिरवाईचा पट्टा नाहीसा होईल. अशा भीषण संकटाच्या छायेत चौल-रेवदंडा ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून एक धाडसी निर्णय घेतला आहे.



अंत्यविधीसाठी लागणाऱ्या लाकडाचा अपव्यय थांबवण्यासाठी गाईच्या शेणापासून बनवलेल्या गोवऱ्यांचा वापर करण्याचा पर्यावरणपूरक प्रयोग रेवदंडा स्मशानभूमीत सुरू करण्यात आला आहे. पारंपरिक पद्धतीने अंत्यसंस्कार करताना जंगलातील मोठ्या प्रमाणावर लाकूड खर्ची पडते. मात्र, ग्रामस्थांच्या या उपक्रमामुळे लाकडाची बचत होत असल्याचे प्रत्यक्ष सिद्ध झाले आहे.

वृक्ष तोड थांबवली नाही तर पुढच्या पिढ्यांना श्वास घेण्यासाठी ऑक्सिजन घेण्यासाठी पैसे द्यावे लागतील. त्यामुळे गोवऱ्यांचा वापर करणे ही आजची खरी गरज आहे. हा प्रयोग यशस्वी झाल्यास जंगलतोड मोठ्या प्रमाणात रोखता येईल, असे मत निसर्ग पर्यावरण व कोकणमित्र संस्थेचे शैलेश राईलकर यांनी व्यक्त केले. या उपक्रमाचे ग्रामस्थांकडून स्वागत केले असून, भविष्यात तांत्रिक अडचणी दूर करून लाकडाचा वापर कमी आहे असे बोलले जाते.

## प्राथमिक विभागात शिक्षक दिन साजरा

। तळा । प्रतिनिधी ।



भारताचे माजी राष्ट्रपती डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस ५ सप्टेंबर हा सर्वत्र शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. त्या अनुषंगाने तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या प्राथमिक विभागाअंतर्गत शिक्षक दिन साजरा करण्यात आला. यामध्ये इ. ४ थीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकाची भूमिका उत्तम प्रकारे पार पाडली असून इ १ ली, इ.२ री, इ ३ रीच्या विद्यार्थ्यांना या छोट्या शिक्षकांनी उत्तम प्रकारे शिकविण्याची काम केले.

यामध्ये मुख्याध्यापक म्हणून वैष्णवी शिंदे, उप मुख्याध्यापक योग पाटील यांनी काम केले असून सूची चव्हाण, ईश्वरी भगत, रिद्धी वारगुडे, नव्या साबळे, लावण्या केतकर, रिद्धी मुंढे, दीक्षिता चौधरी, शनया फोंडल, विनीत मुर्तुंगे, प्रेम शिर्के, ओम कीर्तने, सलमान माटवणकर, हुसेक रहाटविलकर, अब्दुल्ला गोठेकर, अरफान गोठेकर, रिझन तिसेकर, अथर्व मोरे, भावेश हिरवे, दक्ष गोठेकर यांनी शिक्षकांच्या भूमिका पार पाडल्या. यानंतर पंचायत समिती तळा शिक्षण विभागातर्फे घेण्यात आलेल्या बालचित्र कला स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीसे देण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुरुषोत्तम मुळे हे होते तर शारदा केतकर, सचिन भाटे, निलेश साबळे, दिपाली पाटील, पार्वती वारगुडे, प्रज्ञा जाधव, करुणा पातेरे, मानसी चिले आदी उपस्थित होते.




## विनोबा भावे यांना अभिवादन

। चिरनेर । प्रतिनिधी ।

भूदान चळवळीचे प्रणेते आणि भूदान चळवळीद्वारे भूमिहीनांना जमिनी देणारे, मभारतरत्नफ विनोबा भावे यांची जयंती पेण येथील त्यांच्या जन्मगावी गागोदे बुद्रुक येथे साजरी करण्यात आली. यावेळी महेंद्र घरत यांनी विनोबा भावे यांना अभिवादन केले. यावेळी बापूसाहेब नेने, शिवाजीदादा कागणीकर, डॉ. श्रीराम जाधव, मिलिंद पाडगावकर, श्रद्धा ठाकूर, वैभव पाटील, मार्तंड नाखवा उपस्थित होते.



## नागांव येथे कम्युनिटी हॉलचे उद्घाटन

। रेवदंडा । प्रतिनिधी ।

नागांव येथे कम्युनिटी हॉलचे उद्घाटन सरपंच हर्षदा मयेकर यांच्या हस्ते पार पडले. ग्रामपंचायतीच्या निधीतून गावकऱ्यांना नवी सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागांव बुरुडआळी येथे अनेक वर्षांपासून जिर्ण अवस्थेत पडीक असलेली इमारत आता नूतनीकरण करून एक आकर्षक व सुसज्ज समाजमंदिर म्हणून ग्रामस्थांच्या उपयोगासाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे.

या हॉलमुळे गावातील सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक कार्यक्रमांसाठी कायमस्वरूपी व सोयीस्कर जागा उपलब्ध झाली आहे असे सरपंच हर्षदा मयेकर यांनी या प्रसंगी सांगितले. या सभागृहाचे लोकार्पण ग्रामपंचायतीच्या सरपंच हर्षदा मयेकर यांच्या हस्ते पार पडले. याप्रसंगी माजी सरपंच नंदकुमार मयेकर, मंगल नागे, प्रियांका काठे, आदेश मोरे, बुरूड समाज अध्यक्ष नागे, रविंद्र नागे आदी मान्यवर उपस्थित होते.

## वाहनाच्या धडकेने स्कुटी चालकाचा मृत्यू

। पनवेल । प्रतिनिधी ।

अज्ञात वाहनाच्या धडकेने स्कुटी चालकाचा मृत्यू झाल्याची घटना पनवेल जवळील जंगल कट गव्हाण फाटा येथे घडली आहे. मयत इसम मयुरेश म्हात्रे वय २४ रा उरण हे त्यांच्या ताब्यातील एक्टीव्हा स्कुटीवरून पनवेल येथील आपल्या राहत्या घरी मुळेखंड येथे जात असताना जंगल कट, गव्हाण फाटा येथे आल्यावेळी त्यांच्या गाडीला कोणत्यातरी अज्ञात वाहनाने ठोकर दिल्याने झालेल्या अपघातात ते गंभीर रित्या जखमी होऊन मयत झाले आहेत. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. यासंदर्भात पोलीस अधिक तपास करत आहेत.

## ओजाळे पाखाडी परिसरात खड्डे बुजवण्याची सुरुवात

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

दरवर्षी दहीहंडी, गणेशोत्सव या सणांच्या अगोदर शहरातील सर्वच रस्त्यांवरील खड्डे बुजवण्याचे काम नगर परिषदेकडून करण्यात येते. परंतु यावर्षी दहीहंडी गणेशोत्सव हे सण होऊन काही दिवस उलटून गेले. त्यानंतर श्रीवर्धन नगर परिषदेच्या प्रशासनाला शहाणपण सुचले आहे व खड्डे भरण्याचे राहून गेलेल्या रस्त्यांवरील खड्डे भरण्यासाठी नगरपरिषदेने नुकतीच सुरुवात केली आहे. यावेळी फक्त गणेश विसर्जन मार्गावरील खड्डे तातडीने बुजविण्यात आले होते. शहरातील ओजाळे पाखाडी परिसरात नगर परिषदेने पावसाळी केमिकल डांबर वापरून खड्डे वाजवण्याचे काम सुरू केले.



सदर खड्ड्यांमध्ये केमिकलयुक्त डांबर व खडी टाकल्यानंतर त्यावरती पाणी टाकणे आवश्यक असते. परंतु खड्डे भरल्यानंतर त्या भरलेल्या खड्ड्यांवरती कोणत्याही प्रकारे पाणी टाकण्यात आले नाही. सध्या पाऊस देखील थांबलेला असल्यामुळे कडक ऊन पडत आहे. त्यामुळे हे भरलेले खड्डे किती काळ टिकतील याबाबत साशंकता व्यक्त करण्यात येत आहे. नगरपरिषदेच्या अभियंत्यांनी खड्डे बुजवताना त्यावरती पाणी मारावे असे संबंधित ठेकेदाराला सूचना द्याव्यात अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

महसूल विभागाचा कानाडोळा | परराज्यातील येणाऱ्यांवर मेहरबानी

## जमीन खरेदीत खोट्या दाखल्यांचा वापर

। उरण । प्रतिनिधी ।

**तिसरी महामुंबई म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रायगड जिल्ह्यातील उरण, पेण आणि पनवेल या ९५ गावांच्या जमिनीवर सध्या गब्बर लोकांचा डोळा असताना या परिसरामध्ये एक गुंठा एक प्लॉट अशा जाहिरातींना बळी पडून परराज्यातील आणि काही बांगलादेशी नागरिकांचे उरण पूर्व विभागामध्ये मोठ्या प्रमाणात जमिनीचे व्यवहार सुरू आहेत.**




महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उरण तालुका अध्यक्ष ॲड. सत्यवान भगत यांनी मागितलेल्या माहितीनुसार बऱ्याच खरेदी झालेल्या दस्त नोंदणीमध्ये राजस्थान राज्यातील वाळवंट भागातील भूमी प्रमाणपत्र एडिटिंग करून खोटे शेतकरी असल्याचे दाखले जोडून नोंद केल्या जात आहेत. याकडे महसूल विभागाचा सुद्धा कानाडोळा असल्याची चर्चा सर्वसामान्य नागरिकांमध्ये होत आहे.

नोंद करण्यासाठी तलाठी, सर्कल मोठ्या प्रमाणात रसद घेत असल्याची चर्चा जोरात सुरू आहे. सर्वसामान्य जनतेला जमीन घ्यायचे असेल तर त्याला शेतकरी असल्याचा दाखला लागतो. मग परराज्यातील येणाऱ्यांवर एवढी मेहरबानी का केली असा सवाल सत्यवान भगत यांनी उपस्थित केला आहे.

या संदर्भात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शिष्ट मंडळातील जिल्हा अध्यक्ष संदेश ठाकूर, उरण तालुका अध्यक्ष ॲड. सत्यवान भगत यांनी दुय्यम निबंधक यांच्याशी चर्चा करून त्यांनी मिळवलेल्या माहितीच्या अधिकाऱ्याखाली माहितीचे प्रत कसे खोटे दाखले आहेत हे समोरासमोर दाखवून दिले.

> **जमिनी खरेदी विक्री संदर्भात होणाऱ्या चुकीच्या गोष्टी तातडीने थांबवण्यात याव्यात. अन्यथा आम्हाला हायकोर्टामध्ये जनहितासाठी याचिका दाखल करावी लागेल.**
> **– ॲड.सत्यवान भगत**
> **मनसे उरण तालुका अध्यक्ष**

## मार्केटमधुन मोटार सायकलची चोरी

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल शहरातील कर्नाळा भाजी मार्केट परिसरात उभी करून ठेवलेली मोटार सायकल अज्ञात चोराने चोरून नेल्याची घटना घडली आहे. दत्तात्रय येवले यांच्या नावे असलेली ४० हजार रुपये किमतीची होंडा शाईन मोटार सायकल क्र.एम एच ४६ बीएस २७४६ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. दरम्यान, या चोरीचा तपास पोलीस अधिकारी करत आहेत. तसेच अशा घटना संदर्भात नागरिकांनी पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- सर्वप्रकारचे आजार, लठ्ठपणा, संतानप्राप्ती, व्यसनमुक्ती, विवाह/सोनेतारण बिनव्याजी/लाखस दर महा ५०००/- घरबसल्या पिढ्यांपिढ्या लाखो कमविण्याची डॉ.नथुराम शिहू (नागोठणा-पोयनाड)रायगड ७५०७१६६०१५
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. वेटर, मोरी सहाय्यक (Helper) १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल : ७५५९१८४६१२
- नागावमधील होम स्टे/वाडी सांभाळण्यासाठी पर्मनंट जोडपे हवे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क- ९८२०६०९४५०.
- ''जन्नावर हॉस्पीटल'' अलिबाग-मध्ये कामसाठी मावशी व नर्सची जागा आहे. (Vacancy) Contact No 7798034509

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# बोधकथा
## भगवान श्रीकृष्ण अनन्यसाधारण भक्त अर्जुन

ब्रह्मश्री श्री नारद भगवद भक्त होते.नारद भक्ती सूत्र ही त्यांनीच लिहिली आहे. त्यांना प्रपंच मुळीच नव्हता.केवळ नारायणाचे नाम संकीर्तन करीत एवढे च त्यांचे काम. कोणी वाटे त साधक भेटले तर त्यांना उपदेश करून भक्ती मार्गाला लावणे हाच त्यांचा तरी त्रिखंडात फिरण्याचा हेतू होता. एकदा सहज त्यांच्या मनात कल्पना आली की त्यांच्यासारखा भगवत भक्त सापडणे विरळा. त्या क्षणी श्री भगवंताच्या हृदयात त्या अहंकाराची अहंकार नव्हेच तो लहानसा अहंकाराचा वारा होता त्याची संवेदना निर्माण झाली. नारद फिरत फिरत असेच एक दिवस श्रीकृष्णाकडे आले आणि श्रीकृष्णाला वंदन करून स्थानापन्न झाले. बोलण्यावरून बोलणे निघाले तेव्हा श्रीकृष्ण सहज त्यांना म्हणाले, नारदा! तू माझी जी भक्ती करतोस त्याला तोड नाही खरोखरच तू धन्य आहेस. पण आज मला अर्जुनाकडे जावेसे वाटत आहे.

तू ही माझ्याबरोबर चल. आणि ते दोघेजण अर्जुनाकडे आले. ज्या वेळेला ते अर्जुनाच्या महालात आले. त्यावेळी सुभद्रे च्या मांडीवर डोके ठेवून अर्जुन झोपला होता आणि सुभद्रा .त्याच्या डोक्याला तेल लावत होती. ब्रह्मश्री श्री नारद आणि भगवंत आत आलेले पाहताच सूभ द्रेच्या ठिकाणी संतोष निर्माण झाला. पतीच्या डोक्या खालचा पाय काढून घ्यावा तर पती निद्रा मोडेल आणि न घ्यावा तर आपला दादा आणि नारद मुनी हे आले असताना त्यांना अभिवादन करता येणार नाही अशा धर्म संकटात सुभद्रा गोंधळली. ते लक्षात येऊन श्रीकृष्ण तिच्या मदतीला धावून गेले. त्यांनी आपली मांडी हळूहळू अर्जुनाच्या डोक्याखाली सरकवली. आणि सुभद्रेला हळूहळू आपली मांडी काढून घ्यायला सांगितली. शुभद्रेने आपली मांडी हळूच काढून घेतली आणि ती जेवणाच्या तयारीसाठी गेली.

श्री कृष्णाचे वागणे पाहून श्री नारद मुनी म्हणाले, देवा तू भक्तांचे कौतुक करण्यात अगदी वेडा आहेस असे म्हणतात. आता तुला अर्जुनाच्या डोक्याखाली मांडी घालण्याची काय जरुरी होती? त्यावेळेस श्रीकृष्ण काही न बोलता थोडेसे हसले आणि खू ण करून त्यांनी नारदाला जवळ बोलाविले नारद जवळ गेले तेव्हा श्रीकृष्ण त्यांना म्हणाले. , नारदा अर्जुनच्या केसांना कान लाव म्हणजे कळेल मी का कौतुक करतो ते. नारद यांनी अर्जुनाच्या केसांना कान लावला आणि त्यांच्या केसा केसा मधून. कृष्ण कृष्ण श्री कृष्ण असे नामस्मरण ऐकायला मिळाले.

### सद्गुरू स्वामी बोध

देवाच्या नामस्मरणाने आपण कृष्णरूप झालो तर आपले अंतकरण श्रीकृष्ण रूपच नाही का होणार? आणि असं झाल्यावर संकल्परुप अंगणात रिद्धी सिद्धी हात जोडून उभ्या राहतील. आपण सत्य संकल्प होऊ. आपल्या मनात आणू ते पूर्ण होईल. भगवान श्रीकृष्णाचा भक्त झालेला श्री अर्जुन हा भक्त श्रेष्ठ होता. त्याच्या रोमा रोमा तून अखंड नामस्मरण होत होते. भगवान कृष्णा विषयी निस्सीम प्रेम अर्जुनाच्या ठिकाणी वास करीत होते. ही महत्त्वाची गोष्ट सर्व शिष्यगणानी लक्षात ठेवायला हवी.

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम, दातार आळी, पेण.**

# सेवा पंधरवड्यात शिवार फेरी
## • रस्ते खुले करण्याची शेतकऱ्यांची मागणी



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील कळंब महसूल मंडळातील मौजे वारे येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत सुरू झाले आहे. या सेवा पंधरवड्याच्यानिमित्ताने शिवार फेरी आयोजित करण्यात आली. या फेरीत कळंब मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी तसेच स्थानिक पदाधिकारी व ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला.

यावेळी ग्रामस्थ अशोक जोशी यांनी पिढीजात शेतीसाठी जाणारा रस्ता फार्म हाऊस मालकांनी अडविला असून शासनाने तो पुर्ववत खुला करण्याची मागणी केली. तर ग्रामस्थ सुनील म्हसे यांनी शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज राजस्वी अभियान अंतर्गत वारे गावातील शेतकऱ्यांच्या वहीवटीचे रस्ते महसूल विभागाने पाहणी केली. शासनाने हा उपक्रम हाती घेण्यात आल्याने शेतकऱ्यांच्या समस्या पुढील काळात दूर होणार असा विश्वास निर्माण झाला आहे.

या शिवार फेरी दरम्यान स्थानिक ग्रामस्थांनी यावेळी त्यांच्या दैनंदिन आयुष्यातील अडचणी, शिवारातील अडथळे व रस्त्यांच्या समस्या अधिकारी वर्गासमोर मांडल्या. या शिवार फेरीच्यानिमित्ताने वारे गावातील पिढीजात शेतकऱ्यांचा रस्ता काही फार्महाऊस मालकांनी अडवून टाकले आहेत. ते सर्व शेतकऱ्यांना शिवारात जाण्यास मोठा अडथळा निर्माण होत आहे. तसेच शेतीकामासाठी लागणारे वाहने, साधने तसेच जनावरांना ने-आण करण्यास ग्रामस्थांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. याची अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली.

सेवा पंधरवड्याच्या उपक्रमामुळे ग्रामस्थांशी प्रशासनाचा थेट संपर्क वाढत असून गावकऱ्यांच्या दैनंदिन अडचणी मार्गी लावण्यासाठी हा उपक्रम खऱ्या अर्थाने उपयोगी ठरत असल्याचे चित्र वारे गावातील शिवार फेरीमधून समोर आले आहे. या शिवार फेरीमुळे ग्रामस्थांचा प्रशासनावरचा विश्वास वाढला असून, गावकऱ्यांच्या दैनंदिन समस्यांकडे शासन गांभीर्याने लक्ष देत असल्याचे समाधान ग्रामस्थांनी व्यक्त केले.



# नाईक-अंतुले महाविद्यालयात उर्दू गझल

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

म्हसळा येथील वसंतराव नाईक कला, वाणिज्य आणि बॅरिस्टर ए. आर. अंतुले विज्ञान महाविद्यालयात उर्दू विभाग आणि हिंदी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने उर्दू गझल गायन आणि हिंदी कविता वाचन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमात 'दिल लगता नहीं उजेडे दयारों में', 'जिंदगी एक किताब है' यांसारख्या अनेक गझल आणि कविता सादर करण्यात आल्या. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळावा या उद्देशाने महाविद्यालयातील हिंदी विभाग प्रमुख डॉ. सिद्दीकी एम. एच. आणि उर्दू विभाग प्रमुख प्राध्यापिका समिना शहापुरी व प्राध्यापिका उमैमा दफेदार यांच्या संकल्पनेतून या स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य दिगंबर टेकळे होते.

एकुण २१ विद्यार्थ्यांनी स्पर्धक म्हणून सहभाग घेतला. स्पर्धेचे परीक्षण सलमा नजिरी, प्रा.अतिका नजिरी, प्रा. सॉलिया मुकादम यांनी केले.रईसा हळदे, साजिदा अन्सारी, रिम हुर्जुक, नोमन नजिरी, अबझर कौचाली या विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

# उरण मेडिकल वेल्फेअर असोसिएशनतर्फे वैद्यकीय अधिवेशन




**। कर्जत । प्रतिनिधी ।**

उरण मेडिकल वेल्फेअर असोसिएशनतर्फे शुक्रवार (दि.१२) सप्टेंबर रोजी उरण येथे झोनल वैद्यकीय अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले होतो. या कार्यक्रमास वैद्यकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर डॉक्टरांची उपस्थिती लाभली होती.

कार्यक्रमाचे उद्घाटन रायगड मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. आशुतोष कुलकर्णी यांनी केले. तर डॉ. घनश्याम पाटील यांनी स्वागतपर भाषण केले. डॉ. सत्य ठाकरे व डॉ. सचिन गवंड यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते. वैद्यकीय शैक्षणिक सत्रामध्ये डॉ. अनिकेत पाटील यांनी मधुमेह या विषयावर मार्गदर्शन केले, तर डॉ. विकास मोरे यांनी रेबिज या विषयावर माहितीपूर्ण व्याख्यान दिले. या प्रसंगी डॉ. रमेश पटेल, डॉ. राजेश सपकाळ, डॉ. कुमार ओसवाल, डॉ. दिलीप सावळे, डॉ. लक्ष्मण आवटे, डॉ. मिलिंद घरत, डॉ सुरेश पाटील उपस्थित होते. डॉ संजीव म्हात्रे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# टेमपालेत रक्तदान शिबिराचे आयोजन

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुक्यातील जमातुल मुस्लिमीन टेमपाले यांच्या वतीने ईद-ए मिलाद -उन -नबीनिमित्ताने शासकीय रुग्णालय अलिबाग रक्तपेढी यांच्या विशेष सहकार्याने बुधवार (दि.१७) सप्टेंबर रोजी सकाळी ९ : ३० ते दुपारी २ या वेळेत टेमपाले या ठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात जास्तीत जास्त रक्त दात्यांनी सहभाग घेऊन रक्तदान करावे असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे. या शिबिराची जोरदार तयारी आयोजकांतर्फे करण्यात आली आहे.

# डॉ.देशमुख नाट्यगृहचे लोकार्पण



**। चणेर । प्रतिनिधी ।**

भारताचे पहिले भारतीय रिझर्व्ह बँक गव्हर्नर, माजी केंद्रीय वित्तमंत्री, पद्मविभूषण डॉ. चिंतामणराव देशमुख यांच्या नावाने उभारण्यात आलेल्या नाट्यगृहाचे लोकार्पण रोहा अष्टमी नगर परिषदेच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

या भव्य वास्तूच्या लोकार्पण सोहळ्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देशमुखांच्या कर्तृत्वाचा गौरव करताना त्यांचे कार्य भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे नमूद केले.

लोकार्पणानंतर पहिला नाट्यप्रयोग सुप्रसिद्ध अभिनेते भरत जाधव यांच्या नाटकाचा रंगमंचावर सादर झाला. रसिक प्रेक्षकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने नाट्यगृहाची पहिली रात्र अविस्मरणीय ठरली. डॉ. चिंतामणराव देशमुख यांच्या शताब्दी वर्षानिमित्त साकारलेले हे नाट्यगृह रोह्याच्या सांस्कृतिक इतिहासात नवा अध्याय लिहिणारे ठरेल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला

या सोहळ्यास आ. अदिती तटकरे, माजी आ. अनिकेत तटकरे, ज्येष्ठ अभिनेते भरत जाधव, सयाजी शिंदे, रायगड जिल्ह्यातील मान्यवर अधिकारी, आणि रोहेकर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# साप्ताहिक राशिभविष्य १४ ते २० सप्टेंबर २०२५

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

## नवीन वस्तूची खरेदी कराल

**मेष :** राशीधारकांनी या सप्ताहाचे आपले ग्रहमान पाहता एकट राहण्याने आपल्याला आंतरिक बल ही मिळणार आहे. ताजे तवाने होऊन आपण पुन्हा कामाला लागू शकाल. आपल्या सुदैवाने हा साप्ताह ढगाळवातावरण बदलवणारा ठरणार आहे. फक्त निराश असाल तर त्या अस्वस्थेतून बाहेर पडा. यश आपल्या जवळ आहे. आपल्या मार्गातील अडचणी दूर होतील. आपल्या प्रयत्नांना विरोधक ही अडवू शकणार नाहीत. आपण निर्णय घेऊ शकाल त्या निर्णयाचे पडसाद सकारत्मक असतील. मन प्रसन्न करणाऱ्या घटना घडतील. वाद विवादात यश मिळेल. महत्वाच्या नवीन वस्तूची खरेदी कराल. कामात थोडे कमी जास्त होऊ शकते त्यामुळे महेनतीला प्राधान्य ध्या. आपल्या श्रमाचे चीज होणार आहे. कोणतीही गोष्ट फुकट जात नाही त्यासाठी वेळ यावी लागते. आपली कोणतीही मेहनत वाया जाणार नाही. विद्यार्थीवर्गाने थोडी अधिक मेहनत घेण्याची आवश्यकता आहे. **महिलांना :** मनावर दडपण न घेता कार्य करत रहा उधारी बाबत योग्य काळजी घेणे गरजेचे आहे पैशाच्या व्यवहारात सावध राहणे महत्वाचे आहे. मुलांना मार्गदर्शन करावे लागेल. **शुभ दिनांक : १५,१६.**

## धनलाभ होण्याची शक्यता

**वृषभ :** राशीसाठी या सप्ताहात भौतिक सुख सुविधांचा लाभ देणारा आहे. आपले विरोधक हि विचारात पडतील अस कार्य आपल्याकडून घडणार आहे. आपले कौतूक होण्याचा कालावधी आहे, आपल्या नातेवाईकांचे आपल्याला साह्य मिळेल. नवीन जागा घेण्या बाबत हालचाल करण्यास हरकत नाही त्याला चांगले रूप देऊ शकाल. फक्त देईल हरी खाटल्यावरी असे धोरण टाळा. ससंर्गजन्य आजारापासून काळजी घेण्याची गरज आहे. थोड तापासारखे वाटेल घाबरून जाऊ नका. व्हायरल असणार आहे. जेवणखान वेळेवर करत जा. विद्यार्थीवर्गाचे मन पुन्हा अभ्यासाकडे वळेल. व्यवसाईकांनी नवीन प्रस्ताव स्वीकारण्यास हरकत नाही. आठडवड्याच्या शेवटी धनलाभ संभवतो आहे. फक्त लॉटरीचा मार्ग मात्र टाळा. घरात खास मेजवानीचा बेत केला जाईल. अडकलेले काम मार्गी लागेल, प्रवासाचा बेत सध्या टाळा. आपल्या मनमोकळ्या स्वभावाला थोडा मुरड घालण्याचे मानसिक पथ्य आपल्याला यावेळी फायदा देणार ठरू शकते. **महिलांना :** घरात एखादी किमती वस्तु येईल, छोटे दुखणे अंगावर काढू नयेत, नाहीतर मोठे दुखणे होऊ शकते. **शुभ दिनांक : १४,१७**

## चर्चेने प्रश्न सोडवा

**मिथुन :** राशीसाठी या सप्ताहाचे सुरुवातीच्या दिवसात आपणास दैनंदिन काम काजात येणारे प्रश्न वादविवाद न करता चर्चेने सोडविणे अधिक हितकारक ठरेल. नोकरदारांना काहीसा दिलासा मिळेल. नको त्या प्रलोभनात अडकू नका. आपल्या प्रकृतीस्वास्थ्याबाबत अधिक दक्ष राहा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये, उष्णतेचे विकार याबाबत सावध राहा. धार्मिक कार्याला वेळ द्याल. सरकारी कामात अधिक लक्ष द्या. वैवाहिक जोडीदाराची अपेक्षित साथ मिळेल. प्रलंबित कामे वेग घेतील. आपली कोणत्याही कारणांनी मानसिकता बिघडणार नाही याची खबरदारी घ्या. नातलग, मित्रमंडळी यांच्या वागण्याने व बोलण्याने आपली मानसिकता बिघडणार नाही याची दक्षता घेतल्यास हा आठवडा चांगला जाऊ शकेल. आपल्या हुशारीने, प्रसंगानुरूप वागण्याचा प्रयत्न केल्यास सारे काही साध्य करता येईल. काही भाग्यवंतांना विवाहबाबतचे प्रस्ताव येऊ शकतील. **महिलांना :** हातात धन येणार आहे त्याचा वापर व्यवस्थित करण्याची गरज आहे. एखादी जुनी उधारी आपल्याला परत मिळेल प्रयत्न करा. **शुभ दिनांक : १५,१६.**

## धार्मिक कार्याला वेळ द्या

**कर्क :** राशीधारकास या सप्ताहाचे आपले ग्रहमान पाहता आपण स्वकर्तृत्वावर लक्ष केंद्रीत केल्यास पुष्कळशा गोष्टी मनासारख्या होऊ शकतील. घरातील प्रत्येकाला जबाबदारी सोपविण्याची कामगिरी पार पडावी लागेल, एखादा महत्वाचा कार्यक्रम विसरू नका. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. आर्थिक गुंतवणूक सध्या टाळा. प्रकृतीस्वास्थ्याकडे अधिक लक्ष द्या. विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये, उष्णतेचे विकार सांभाळा. कष्टाशिवाय यश मिळविता येत नाही हे लक्षात ठेवा. धार्मिक कार्याला वेळ द्याल. सरकारी कामात अधिक लक्ष द्या. दुसऱ्यावर कामे सोपविण्याआधी स्वयंसिद्ध व्हा व स्वकर्तृत्वावर भर द्या. आपण आपल्या कामावर अधिक लक्ष दिल्यास आपला यशाचा मार्ग अधिक सुकर होईल. आपले इतरांशी मतभेद होणार नाही याची खबरदारी घ्या. जेथे शक्य आहे तेथे तडजोडीचे धोरण स्वीकारणे योग्य होईल. त्यात आपला फायदा होईल. **महिलांना :** कुठल्याही मोहाला बळी पडू नका. आपल्या हित शत्रूंना संधी देऊ नका. घराबाबतच्या प्रश्नांना चालना मिळेल. मुलांनी अध्ययनात अधिक लक्ष द्यावे. वादविवादापासून दूर राहा. **शुभ दिनांक : १७,१८.**

## कामाचे नियोजन करा

**सिंह :** राशीसाठी या सप्ताहाचे आपले ग्रहमान पाहता या कालावधीत आपण एकट राहणे पसंद करणार आहात, कामाचे नियोजन केल्यास कामाचा भार कमी होऊ शकेल. खरेदीचे बेत साध्य होतील. खरेदीच्या निमिताने फिरणे ही होईल. मात्र मित्र परिवारात शाब्दीक चकमकी कटाक्षाने टाळा. नोकरदारांना दिलासा मिळेल. मनासारखी बढती मिळू शकेल फक्त बदली लांब वर होण्याची शक्यता राहील त्यासाठी ओळख लावावी लागेल, आर्थिक गुंतवणूक मात्र, तज्ञांच्या सल्ल्या शिवाय करू नका. प्रकृतीस्वास्थ्याबाबत अधिक सावध राहा, विशेषतः उष्णतेचे विकार व अपचन विकार. आपला दृष्टिकोन नेहमी सकारात्मक ठेवा. कोणालाही शब्द अथवा आश्वासने देण्याचे टाळल्यास हा आठवडा बऱ्यापैकी चांगला जाईल. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करावा. घरघुती कामकाजांना प्राधान्य द्या व ते हातावेगळे करण्याचा प्रयत्न करा. **महिलांना :** या आठवड्यात आपल्याला भेट मिळेल, जिवलगा बरोबर बाहेर जाण्याचा बेत तडीस जाईल. **शुभ दिनांक : १६,१९.**

## उधारी करणे टाळा

**कन्या :** राशीसाठी या सप्ताहात आपले कामकाजात घाई गडबड टाळा. विचारपूर्वक निर्णय घ्या. महिलांना अंगभूत कलागुणांना चांगले प्रोत्साहन मिळेल. आपला प्रभाव इतरांवर पाडू शकाल. व्यावसायिक व व्यक्तिगत संबंधांच्या बाबतीत आपण अधिक उत्साह दाखवाल. आपल्यात कितीही उत्साह असला तरी तो इतरांसाठी त्रासदायी ठरणार नाही ह्याची आपणास काळजी घ्यावी लागेल. आपण जर जीवनातील काही तथ्य समजून घेऊन ते अमलात आणलेत तर हे दिवस आनंदात घालवू शकाल. आपल्या भिन्नलिंगी संबंधातील जवळीक वाढेल. दरम्यान, वस्त्रालंकार, हौसमौज करण्याच्या वस्तू इत्यादीसाठी खर्चाची किंवा खरेदीची शक्यता आहे. आपल्या जवळ आर्थिक सुबत्ता असली तरी खर्चावर नियंत्रण ठेवल्यास उर्वरित रक्कम गुंतवणूक करून किंवा अन्य मार्गाने खर्च करून आपल्या फायद्यात वाढ करू शकाल, शक्य असल्यास कर्ज किंवा उधारी करणे टाळावे. **महिलांना :** महिलांना आरोग्याच्या बाबत्तीत उत्तम कालावधी आहे. स्पर्धेत बाजी मारू शकाल, शत्रूना त्यांची जागा दखवून द्याल, काही अनपेक्षित खर्च उदभवल्याने आपणास कर्ज किंवा उधारी करावी लागण्याची शक्यता आहे. **शुभ दिनांक : १८,२०.**

## वादाचे प्रसंग टाळा

**तुळ :** राशीसाठी या सप्ताहात आपणास कामाच्या ठिकाणी किंवा सरकारी विभागात शक्यतो अधिकारी वर्गाशी व प्रतिष्ठित व्यक्तींशी वाद टाळावेत. हातात पैसे येतील बचत करू शकाल. आपण करीत असलेल्या कार्याला प्रयत्नांची जोड दिल्यास आपण आपले उद्दिष्ट गाठू शकाल. आपले कौटुंबिक वातावरण बिघडणार नाही याची दक्षता घ्या. कायद्या विरुद्ध असलेली कामे टाळावीत वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. विद्यार्थ्यांनी आपल्या अध्ययनात अधिक लक्ष द्यावे. हितशत्रूंच्या कारवायांवर नजर ठेवा, त्यांना संधी मिळणार नाही याची दखल घ्या. नको त्या प्रलोभनात अडकू नका. ग्रहमान पाहता ते बऱ्यापैकी आहे. नोकरदारांना दिलासा मिळेल. महिलांना त्यांच्या अंगभूत कलागुणांना उत्तम प्रोत्साहन मिळेल. मित्रमंडळी, आप्तेष्टांशी सामंजस्याने वागणे इष्ट राहील. गैरसमज होणार नाहीत याची दक्षता घ्या. कौटुंबिक वातावरण बिघडणार नाही याची दखल घ्या. **महिलांना :** एखादी चांगली बातमी कानावर पडणार आहे. मुलांची प्रगती अनुभवायला येईल, धनलाभ होईल. **शुभ दिनांक : १४,२०.**

## अनावश्यक खर्च टाळा

**वृश्चिक :** राशीसाठी या सप्ताहात आर्थिक बजेट वाढणार असल्याने आपण प्रथमपासून अनावश्यक खर्च टाळावेत. त्याचप्रमाणे सरकारी नियम व कायदा यांचे कटाक्षाने पालन करावे. नोकरदारांना काहीसा दिलासा मिळेल. व्यापार-उद्योगात प्रगती करण्याची संधी मिळेल. प्रकृतीबाबत अधिक खबरदारी घ्यावी. आपल्या बोलण्याने इतरांची मने दुखावणार नाही याची दक्षता घ्या. प्रवासात सावधानता बाळगा. वाहनांच्या वेगावर योग्य नियंत्रण ठेवा. आपल्या कामात वेळीच स्वतः लक्ष द्या दुसऱ्यास ढवळाढवळ करण्यास वाव देऊ नका. आजारच्या बाबतीत विशेषतः मोसमी आजार होणार नाहीत याची काळजी घ्या. आपल्या बोलण्याने गैरसमज होणार नाही याची दक्षता घ्या. नको त्या प्रलोभनात अडकू नका. आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल. चुकीचा मार्ग स्वीकारणे कटाक्षाने टाळा. लांबवर प्रवास करण्याचा बेत आखाल. आपले परगावी असलेले नातलग घरी येतील त्यांच्याकडून लाभ संभवतो आहे. **महिलांना :** वड्याचे तेल वांग्यावर काढू नका आपला राग आपल्या ताब्यात ठेवलात तर आपल्याला कोणीच जिंकू शकणार नाही. आपली वेळ आली की आपल्या परड्यात भरभरून दान पडणार आहे त्यासाठी संयम आवश्यक आहे. **शुभ दिनांक :१५,१९.**

## उधारी घेऊ नका

**धनु :** राशीसाठी या सप्ताहात मिळणारा फुरसतीचा वेळ आपण निःस्वार्थी कामासाठी दिल्यास आपणास कृतकृत्य झाल्याचे समाधान मिळू शकेल. एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीची भेट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आपली अडकलेली कामे पूर्ण होतील. नवीन नोकरीसाठी प्रयत्न केल्यास यश मिळेल. आपण इतरांना ऊर्जा देण्याचा प्रयत्न करा. आर्थिक बाजू ठीक राहील. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. कोणताही निर्णय घेताना अतिशय विचारपूर्वक घ्या. नोकरदारांना चांगला दिलासा मिळेल. कलाक्षेत्राला उत्तम प्रोत्साहन मिळेल. आर्थिक गुंतवणूक करण्याआधी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेणे हितकारक ठरेल. ओळखीचा लाभ घेता येईल. मोठी गुंतवणूक करण्यास हरकत नाही बोलण्यावर योग्य नियत्रण ठेवावे. त्यामुळे होणारी भानगड टाळता येईल. शक्यतो रात्रीचे जागरण टाळावे. प्रकृतीस्वास्थ्य जपा. **महिलांना :** उधारी घेऊ नका देऊ नका डोक्यावर ताण यणारे काम करू नका हवी तर योग्य विश्रांती घ्या त्यामुळे कामाला हुरूप येईल. आपल्यावरील जबाबदाऱ्या पूर्ण करण्याचा प्रयत्न केल्यास मोठा लाभ होईल. **शुभ दिनांक : १६,१८.**

## सकारात्मक दृष्टिकोन ठेवा

**मकर :** राशीसाठी या सप्ताहात आपण कोणतीही, कसलीही चिंता न करणे आपणास हितकारक ठरू शकते. चिंता करून प्रश्न सुटत नाही, पण त्याचा परिणाम आपल्या शरीरावर होत असतो. तेव्हा मनात येईल तसे वागण्याचा प्रयत्न करा. घरच्या समस्या सोडविता येतील. महत्त्वाचे निर्णय ज्येष्ठांशी सल्लामसलत करूनच सोडविण्याचा प्रयत्न करावा. वैवाहिक जीवनात सामंजस्याने वागणे योग्य राहील. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवा त्यामुळे गैरसमज होण्याची शक्यता असते. प्रकृतीची पथ्ये पाळा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. सरकारी नियमांचे पालन करा, आपण आपले अस्तित्व शाबूत ठेवण्यास हा काळ उत्तम आहे, पर्यायाने आपण योग्य वेळी त्याचा योग्य उपयोग करून घ्या. आपल्या कार्यक्षेत्रात वरिष्ठांची उत्तम साथ मिळू शकेल. सकारात्मक दृष्टिकोनातून वागल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. **महिलांना :** वैद्यकीय क्षेत्रातील व्यक्तिना हा कळवधी अत्यंत शुभ आहे, घर, गाडी, बंगला या बाबत केलेली हालचाल सत्कारणी लागेल. आपले खिसा पाकीट भरलेले राहील फक्त ते सांभाळून ठेवणे गरजेचे आहे. **शुभ दिनांक : १६, १७**

## प्रलोभनात अडकू नका

**कुंभ :** राशीसाठी या सप्ताहात विरोधकांबाबत चिंता करू नका, त्यांच्यावर अंकुश ठेवता येईल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळते जुळते घेण्याचे धोरण स्वीकारणे हितकारक ठरेल. माणूस पारखण्याचे सूत्र पाळल्यास पश्चात्ताप करण्याची वेळ येणार नाही. व्यवसायातील मतभेद टाळण्याचा प्रयत्न करा. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. आपण आपल्या प्रकृतीबाबत अधिक काळजी घेणे आवश्यक आहे. विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये, मोसमी आजारापासून सावध राहा. नियमित आहार, व्यायाम, योगाचा अवलंब करा. संघर्षाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. मेहनतीला पर्याय नाही. नको त्या प्रलोभनात अडकू पडण्याचा प्रसंग आला तरी सावध राहून वागा, कला क्रीडा यात आपले मन रमणार आहे, खेळाडून सुवर्ण संधी मिळण्याचे योग आहेत अडकलेली कामे यावेळी पूर्ण करू शकणार आहात. विशेषता पासपोर्ट बाबतचे काम पूर्ण होऊ शकेल. **महिलांना :** आपण तीर्थयात्रेचा बेत केला असेल तर त्याला पूर्ण रूप देण्यास हरकत नाही बऱ्याच दिवसांनी पर्स गरम राहील, सोने खरेदी करू शकाल. मुलांकडे नीट लक्ष द्यावे लागेल. **शुभ दिनांक : १४, १७**

## ध्येयाकडे वाटचाल करा

**मीन :** राशीसाठी या सप्ताहात कामाचा ओघ वाढवणारा आहे. घेतलेले कार्य पूर्ण करू शकाल. या कालावधीत आपले एखादे खास काम होणार आहे. आपल्या सुखसुविधानमध्ये वाढ होईल. मित्रामध्ये सोलोखा वाढेल. घरातील वातवरण आनंदी राहील. आपलेले अडकलेले पैसे मिळण्यासाठी या कलावधीत विशेष प्रयत्न करा यश मिळेल. कर्जेघेण्यापासून जामीन राहण्यापासून लांब राहा. विद्यार्थीवर्गाने जास्त मेहनत घेण्याची गरज आहे. मेहनतीमुळे आपल्यात ऊर्जा वाढणार आहे तिचा योग्य वापर करा. अविवाहितान साठी एखादा चांगला प्रस्ताब येईल तो विचारपूर्वक स्वीकारण्यास हरकत नाही, तरूणांनि तब्बेतीची काळजी घ्यावी चरबी वाढणारे पदार्थ घाऊ नये. नोकरीत आनंद मिळेल, प्रवासात काळजी घेण्याची गरज आहे, तसेच दुकानदारांनी साठेबाजीच्या भानगडीपासून लांब राहवे. **महिलांना :** येणाऱ्या समस्यांवर आपण त्यांचे निराकरण करू शकाल व आपल्या ध्येयाकडे वाटचाल कराल. घराकडे अधिक लक्ष द्यावे लागेल. बचत करू शकाल आपण एकट राहून स्वताबद्दल केलेला विचार आपल्या प्रगतीसाठी उपयोगी पडणार आहे. **शुभ दिनांक : १५,२०.**

# ‘ओबीसीच्या आरक्षणात मराठ्यांची घुसखोरी सहन करणार नाही’

। उरण । प्रतिनिधी।

राज्यात मराठा विरुद्ध ओबीसी आरक्षण वाद पेटला आहे. मराठा समाजाला कुणबी म्हणून प्रमाणपत्र मिळणार आहेत. व शासनाच्या शासन निर्णय प्रमाणे मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसी प्रवर्गात समाविष्ट केला जाणार आहे. त्यामुळे ओबीसी प्रवर्गात असलेल्या विविध जाती उपजाती यांच्यावर खूप मोठा परिणाम होणार आहे. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात प्रवेश दिल्याने ओबीसी प्रवर्गातील नागरिकांना शिक्षण, नोकरी उद्योगधंदे आदी क्षेत्रात मिळणारे आरक्षण संपुष्टात येईल. पर्यायाने ओबीसी समाजाचे सर्वच क्षेत्रात पीछेहाट होईल. ओबीसी समाज विकासापासून लांब राहिल.मराठ्यांना ओबीसी मध्ये आरक्षण दिल्याने ओबीसी समाजाचे अस्तित्व धोक्यात आले आहे. समाजाला न्याय मिळावा, समाजाचे अस्तित्व टीकावे, ओबीसी समाजात न्याय हवका संबधी जनजागृती व्हावी या अनुषंगाने हेमंत ठाकूर यांनी (दि. १२) सप्टेंबर रोजी श्री रत्नेश्वरी मंदिर, जसखार, तालुका उरण, जिल्हा रायगड येथे एका महत्वाच्या बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीला ओबीसी चळवळीचे नेते राजाराम पाटील यांनी मार्गदर्शन केले.



आपल्या न्याय हक्कासाठी जागरूक राहिले पाहिजे असे राजाराम पाटील यांनी बैठकीत उपस्थितांना मार्गदर्शन केले. या बैठकीस काशीबाई ठाकूर, प्रणाली म्हात्रे, रमाकांत म्हात्रे, सुरेश म्हात्रे, आशुतोष म्हात्रे, मेघनाथ ठाकूर, सुनिल ठाकूर, सचिन ठाकूर, उमेश पारवे, सुभाष तांडेल, सूर्यकांत ठाकूर, गोरख घरत, संतोष पाटील, जगदीश घरत, अमोल तांडेल, केतन तांडेल, पंढरीनाथ म्हात्रे, वैष्णव ठाकूर, निलेश तांडेल, जगदीश ठाकूर, गणेश ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते.

## शशिकांत ठाकूर यांचे निधन

**चिरनेर** : आपल्या अभिनयाने ग्रामीण रंगभूमीवर आपला आगळा वेगळा ठसा उमटविणारे उरण तालुक्यातील चिरनेर येथील चतुरस्त्र रंगकर्मी शशिकांत वसंत ठाकूर (वय ५५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. खारघर येथील हॉस्पिटलमध्ये त्यांनी रात्री अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनामुळे ग्रामीण रंगभूमीवर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पार्थिवावर चिरनेर येथील मुक्तीधाम स्मशानभूमीत शनिवारी (दि.१३) सप्टेंबर रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले. ऐतिहासिक नाटकांबरोबर सामाजिक नाटकातही त्यांनी भुमिका साकारल्या होत्या. पश्चात पत्नी, मुलगा, आई वडील, भाऊ, बहिण असा परिवार आहे. अशी माहिती त्यांचे भाऊ संतोष ठाकूर यांनी दिली.



# शेतकऱ्यांना मत्स्यपालन प्रशिक्षण

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील तालुक्यातील अतिशय दुर्गम भाग असलेल्या खांडस आणि नांदगाव या दोन ग्रामपंचायतीमध्ये युनायटेड वे संस्था जलसंजीवनी अभियान राबवत आहे. खांडस, नांदगाव ग्रामपंचायतीमधील आदिवासी लाभार्थी यांच्यासाठी युनायटेड वे या संस्थेने मत्स्य पालन प्रशिक्षण शिबीर आयोजित केले होते. खांडस, नांदगाव, चेवने, गावंडवाडी, इष्टे जांभूळवाडी, अंभेरपाडा या आदिवासी बहुल गावातील शेतकयांना दोन दिवसाचे प्रशिक्षण आयोजित केले होते. या सर्व शेतकऱ्यांना छत्रपती संभाजीनगर येथे नेण्यात आले होते.



छत्रपती संभाजी नगर येथील कृषी फिशरीज ॲग्रो प्रा.ली.चे संचालक राजेंद्र काळे यांनी मासेपालन संदर्भातील मुलभूत आणि तांत्रिक मार्गदर्शन केले. तसेच मत्स्य तज्ज्ञ आणि प्रगतीशील शेतकरी परमेश्वर कांबळे यांनी त्यांच्या १४ वर्षाचे संघर्षपूर्ण परंतु यशस्वी असलेले अनुभव शेतकऱ्यांसमोर मांडून शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले.

शेततळ्यातील मासेपालन करण्यासाठी युनायटेड वे मुंबई संस्थेद्वारा कार्यान्वयित जल संजीवनी प्रकल्प अंतर्गत याप्रशिक्षणात मासेपालन करतांना मत्स्यबीज निवड करणे, शेततळ्यात सोडतांना घ्यावयाची काळजी, माशांचे खाद्य व्यवस्थापन, शेततळ्यातील ऑक्सिजन व्यवस्थापन, माशांना होणारे आजार आणि त्यावरील उपाय, पाणी तपासणीचे महत्त्व विविध शासकीय योजना, किरकोळ आणि ठोक मासे विक्री विषयांचा समावेश होता.

या शेतकऱ्यांसोबत युनायटेड वे मुंबई कार्यरत जल संजीवनी कर्जत प्रकल्पाचे विवेक कोळी, वरिष्ठ कृषी तज्ज्ञ जोएब दाऊदी आणि प्रमोद धादवड आदी देखील सहभागी झाले होते.

# हृदय तपासणी शिबिराला प्रतिसाद

। सुकेळी । प्रतिनिधी ।

नागोठणे जवळच असलेल्या ऐनघर ग्रामपंचायत हद्दीमधिल बि. सि जिंदल रुग्णालय सुकेळी यांच्या वतीने आमडोशी गावामध्ये बुधवार ( दि.१०) रोजी मोफत हृदय तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये जवळपास ८२ नागरीकांनी लाभ घेतला. या शिबिराला नागरीकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एकुण ८२ नागरीकांची मोफत तपासणी, जिंदाल रुग्णालयातील डॉ. मनिष रायकवार यांच्यातर्फे औषधौपचार करण्यात आले.



या शिबिराला जिंदल रुग्णालयाचे व्यवस्थापक सर्वेश पांचोली, डॉ. मनिष रायकवार, संजय भोसले, दिनेश ठमके, शरन्या श्रीजीत, प्रफुल्ल चौधरी, सुरेश पल्लंई, सुनिता जांबेकर, संदिप चाळके, यशवंत वारगुडे, प्रमोद भोसले, मंगेश जांबेकर, प्रविण जांबेकर, निखिल जाधव, जयेश भोसले, गणेश भोसले, अनिरुद्ध जाधव, गोपाळ जांबेकर, प्रविण जांबेकर, सागर दळवी, कल्पेश जाधव, दिनेश जाधव, प्रसाद जाधव, योगेश ठमके, ऋषिकेश भोसले, प्रलय जांबेकर, सुनिल सुतार, शुभम भोसले, राजेश कामथे, अनिकेत जाधव, विनोद जांबेकर, निधी जांबेकर, तसेच आमडोशी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वडवलीत मोफत आरोग्य शिबीर

। कोर्लई । प्रतिनिधी ।

अदानी फाउंडेशन दिघी पोर्ट लिमिटेड यांच्यातर्फे ग्रुप ग्रामपंचायत वडवलीतर्फे आगरी समाज मंदिर सभागृहात मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये अलिबाग येथील त्वचारोग तज्ञ, महिला रोग तज्ञ तसेच जनरल फिजिशियन डॉक्टरांनी ग्रामस्थांची मोफत तपासणी केली. या शिबिराचा ३१८ जणांनी लाभ घेतला. याप्रसंगी सिद्धाली नागवेकर, डॉ. सिद्धेश शिंदे, तनिषा भायदे, निलेश पाटील मान्यवर यावेळी उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वीतेसाठी गोविंद वासले, अरुंधती पिळणकर, प्राजक्ता आडुळकर व नम्रता दिघीकर यांनी विशेष परिश्रम घेतले. तर श्याम धुमाळ संतोष भायदे यांनी आभार मानले.

# लायन्स क्लबतर्फे आरोग्य शिबीर

। भाकरवड । वार्ताहर ।

अलिबाग तालुक्यातील पोयनाड आठवडा बाजार येथील ज्येष्ठ नागरिक संघाच्या कार्यालयात माधवबाग मल्टी डीसी प्लेनरी हॉस्पिटल खालापूर यांच्या सहकार्याने ज्येष्ठ नागरिक संघ पोयनाड विभाग आणि लायन्स क्लब अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने (दि. ११) सप्टेंबर रोजी आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामध्ये इसीजी, ब्लड शुगर, ब्लड प्रेशर, हार्ट रेट, ऑक्सिजन लेवल अशा अनेक तपासणी करण्यात आल्या. कार्यक्रमासाठी तुषार पाटील व डॉ. श्रद्धा सातपुते टीमनी सहभाग घेतला होता. याप्रसंगी नारायण म्हात्रे, राजाराम पाटील, विकास पाटील, विद्याधर पाटील, प्रदीप सिनकर, सूर्यकांत पाटील, उपस्थित होते. सदरचा उपक्रम यशस्वी करण्याकरिता दिलीप भायदे, शैलेश चवरकर, सुरेखा जाधव, वनिता पिंगळे, मधुकर राऊत, गंगाधर पाटील, रमेश पाटील, शुभांगी पाटील, शारदा पाटील आदींनी अथक मेहनत घेतली.

अलिबाग गोंधळपाडा येथे ऑफीस कामासाठी अर्जंट कॉम्प्युटर ज्ञान असणारी मुलगी हवी आहे तसेच तीला मराठी/इंग्रजी टायपिंग येणे आवश्यक आणि हिंदी बोलता आले पाहिजे तसेच ग्राहकांचे कॉल रिसीव्ह करता आले पाहिजे. ऑफीस टाईम ९.३० ते ५.३० पगार ८ ते १० हजार पर्यंत मिळेल.
**ऑफीस पत्ता :** बेवूड गोंधळपाडा शॉप नं ५ स्वरीन अलिबाग **फोन नं ८४३३८७७४४९**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस याद्वारे असे कळविण्यात येत आहे की, जिल्हा रायगड, तालुका अलिबाग पैकी, गांव नागांव येथील आजचा गट क्रमांक ६७ असणारी मूळची गट क्रमांक ५५५/७ ही मिळकत अन्य काही मिळकतींसह आमचे अशिल श्रीधर मधुकर लोंढे वगैरे यांचे सहमालकीची आहे. सदर मिळकतीमध्ये नागांव ग्रामपंचायत घर क्रमांक १६२ चे घर देखील आहे. सदर मिळकतींलगत गोविंद जोगळेकर यांचे मालकीची मूळचा सर्व्हे नंबर ५५५, हिस्सा नंबर १० ही मिळकत आहे. आजमितीस तिचे वर्णन गट क्रमांक ६८ असे आहे.

वर नमूद गट क्रमांक ६७ ही जमिन व घर मिळकतींबाबत लगतच्या गट क्रमांक ६८ या मिळकतीचे मालक जोगळेकर यांनी अतिक्रमण केले असल्याचे ठरावाकरिता आमचे अशिलांनी रेग्युलर मुकदमा ११७/२०१२ या क्रमांकाचा दावा अलिबाग येथील दिवाणी कोर्टामध्ये ठरावाकरिता, ताब्याकरिता, निरंतर ताकिदीकरिता व अन्य अनुषंगिक मागण्यांकरिता दाखल केला असून, सदर दावा प्रलंबित आहे.

आमच्या अशिलांस असे समजले आहे की, सदर जमिनींबाबत कोर्टामध्ये प्रकरण प्रलंबित असूनही वर नमूद जमिनींची विक्री करण्याचा दाव्यातील मूळ प्रतिवादी गोविंद जोगळेकर यांचे वारसांचा विचार आहे. वर नमूद केल्यानुसार वाद प्रलंबित असल्यामुळे अशाप्रकारे विक्री व्यवहार होण्यास आमच्या अशिलांची सक्त हरकत आहे व अशाप्रकारे विक्री करणे मूलतः बेकायदेशीर आहे.

तरी, या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना असे कळविण्यात येते की, वर नमूद जमीन व घर मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार गोविंद जोगळेकर यांचे वारसांबरोबर करू नये. याउपर कोणी असा व्यवहार केल्यास सदर खरेदीदार यांना देखील दाव्याचे कामी पक्षकार करणेत येईल आणि खरेदीदाराविरुद्ध देखील आमचे अशील योग्य ती कायदेशीर कारवाई करतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

तारीख :१३/०९/२०२५

सही/-
**ॲड. राजेंद्र मधुसूदन कुंटे**
शांतादुर्गा को.ऑप.हौसिंग सोसायटी,
मारुती नाका, अलिबाग, रायगड.
मोबाईल: ९२७०९६२९२९

# कळंब-वांगणी एसटी सेवा लवकरच होणार सुरू

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत एसटी आगार यांच्या माध्यमातून रस्त्याच्या कारणामुळे बंद असलेली कळंब वांगणी एसटी पुन्हा सुरू करण्याची मागणी आरपीआयने केली होती. त्यानुसार राज्य परिवहन विभागाने कळंब ते वांगणी या भागातील एसटीची चाचणी घेतली. पाच वर्षापूर्वी रस्ता खराब झाल्याने एसटी बंद करण्यात आली होती. सदर गाडी सुरू व्हावी यासाठी आरपीआयच्या माध्यमातून आवाज उठवण्यात आला होता.



सदर एसटी स्थानिकविद्यार्थी आणि नोकरदारांसाठी सुलभ पर्याय असताना कर्जत आगाराकडून फायद्यात चालणारी एसटी बंद होती. ती पुन्हा सुरू करण्याची मागणी केली होती. अनेक निवेदन देऊन देखील एसटी पुन्हा सुरू करण्यात येत नव्हत्या. शेवटी आरपीआय आठवले पक्षाने जोरदार आवाज उठवला, त्यानंतर कर्जत आगाराकडून कळंब वांगणी मार्गावर एसटी गाडीची चाचणी घेण्यात आली. त्यावेळी जिल्हा वाहतूक निरीक्षक जोतीराव ठोंबरे, कर्जत आगार प्रमुख देवानंद मोरे, पोलीस उप निरीक्षक आर. एल. वसावे. निलेश कोंडार या प्रमुख यांच्या उपस्थितीत अधिकारी वर्गाने कळंब ते वांगणी असा प्रवास केला. एम एच २० बी एल २४३२ या एसटी गाडीमधुन अधिकारी वर्गाने चाचणी केली. त्यानंतर वांगणी येथे एसटी गाडी उभी करण्यासाठी जागा निश्चित करण्यात आली. त्यानंतर कर्जत एसटी आगार आणि वाहतूक निरीक्षक यांच्याकडून लवकरच कळंब वांगणी मार्गावर गाडी सुरू करण्यात येतील असे अश्वासन आरपीआय आठवले पक्षाच्या कार्यकर्त्यांना देण्यात आले. याप्रसंगी मारुती गायकवाड, सुनील सोनवणे, किशोर गायकवाड, राजू जगताप, रवींद्र गायकवाड, अशोक गायकवाड, संतोष जाधव, भालचंद गायकवाड, दीपक गायकवाड, स्वप्निल काकडे उपस्थित होते.

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे टेंभरे, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| २७/१३ | ०.०९.०० | ०.०९ | श्रीमती ताराबाई हरिश्चंद्र घरत, वैगेरे. |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या ११(अकरा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- १४/०९/२०२५.

सही /-
**ॲड.उषा जे. कांबळे.**
कर्जत,''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे.
मो.नं.७३८५००४८०६.

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे वरई तर्फे निड, ता.कर्जत, जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकती आमचे अशिलांनी तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे वरई तर्फे निड, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| मोरेश्वर वामन कोळी | ४७ | २३ | ०-०६-०० | ०.०५ |
| | ४७ | २१ | ०-०७-०० | ०.१० |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पूराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकतीची निर्वेध बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीची खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक : १४/०९/२०२५

**ॲड. साहिल राजेंद्र निगुडकर**
पत्ताः कोर्ट व्ह्यु को.ऑप.हौ.सोसायटी,
शॉप नं.१, कर्जत सिव्हील कोर्ट समोर,
कर्जत रायगड
मो.:९५९५३२४२३४/९५६१५७५६२६

**ॲड. राजेंद्र पी. निगुडकर**
पत्ताः कोर्ट व्ह्यु को.ऑप.हौ.सोसायटी,
शॉप नं.१, कर्जत सिव्हील कोर्ट समोर,
कर्जत रायगड
मो.:९८२२७७४०७५/८४८४९६५६२६

# वाहतूक पोलिसांचा दणका

## जिल्ह्यातील बेशिस्त चालकांकडून सात लाखाचा दंड वसूल

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

वाहतूक नियम मोडणाऱ्या चालकांना रायगड पोलिसांनी दणका दिला आहे. आतापर्यंत ७००हून अधिक चालकांविरोधात कारवाई करून त्यांच्याकडून सहा-लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. या कारवाईतून बेशिस्त चालकांना शिस्त लावण्याचा प्रयत्न वाहतूक पोलिसांनी केला आहे.



जिल्हा पर्यटन व औद्योगिकीकरणाच्या दृष्टीने महत्वाचा ठरत आहे. त्यामुळे जिल्हयात नोकरी व्यवसायाबरोबरच पर्यटनासाठी येणाऱ्यांची संख्या प्रचंड वाढली आहे. जिल्ह्यात नागरीकरण झपाट्याने वाढत असताना वाहनांनादेखील दिवसेंदिवस मागणी वाढू लागली आहे. दुचाकी वाहनांसह चारचाकी, तीन चाकी वाहने जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आहे. त्यात बाजारात वेगवेगळ्या रंगाच्या आकाराच्या स्पोर्ट्स बाईक घेण्यावर अधिक पसंती दिसून येत आहे. वर्षाला २५ हजारहून अधिक दुचाकी जिल्हयात खरेदी केल्या जातात. परंतु काहीजण हेल्मेट न वापरता, तर काहीजण मोबाईलवर संवाद साधत वाहन चालवितात. काहीजण अतिवेगाने वाहन चालवितात. त्यामुळे अपघाताचा धोका कायमच असतो. महामार्गासह जिल्हा व तालुका रस्त्यांवरील अपघात रोखण्यासाठी रायगड पोलीस दलाच्या ताफ्यात स्वतंत्र जिल्हा वाहतूक शाखा आहे. पोलीस निरीक्षकांसह ९० वाहतूक पोलीस कर्मचारी जिल्हयातील वाहतूकीचे नियोजन करण्याचे काम करतात.

जिल्हा वाहतूक शाखेमार्फत महामार्गासह ठिकठिकाणी वाहतूकीच्या नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले जाते. वेगवेगळ्या शाळा महाविद्यालयात कार्यशाळा घेण्याबरोबरच फलकांव्दारे जनजागृती करण्याचे काम वाहतूक शाखेमार्फत होत असते. वाहतूकीचे नियम मोडणाऱ्यांवर कारवाईदेखील वाहतूक पोलिसांव्दारे केली जाते. जिल्ह्यातील नाक्यानाक्या वाहतूक पोलीस तैनात करून नियम मोडणाऱ्या चालकांना शिस्त लावण्याचे काम केले जाते. जिल्हामध्ये गेल्या आठ दिवसांमध्ये ७१७ चालकांविरोधात कारवाई करण्यात आली. या कारवाईत सहा लाख २८ हजार ९०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. काहींविरोधात ई चलनाद्वारे कारवाई केली. जिल्ह्यातील मुंबई - पुणे, मुंबई - गोवा महामार्गासह जिल्हा मार्गावर धावणाऱ्या वाहन चालकांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये हेल्मेट नसणे, वाहन वेगात चालविणे अशा अनेक वाहतूकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालकांना दणका देण्याचे काम वाहतूक पोलिसांनी केले. सात ते १२ सप्टेंबर या कालावधीत ही कारवाई झाल्याची माहिती वाहतूक पोलिसांकडून देण्यात आली.

## मच्छी मार्केटमध्ये खवय्यांची झुंबड

**कुडाळ** : गणेशोत्सव काळात व्रतस्थ राहिलेल्या चाकरमान्यांसह स्थानिक नागरिकांनी बुधवारी मोठ्या प्रमाणावर मासळी खरेदी केली. गणेशोत्सव काळात सर्वसाधारणपणे मासाहार वर्ज्य केला जातो. या व्रतपूर्तीमुळे मासे खाण्याची उत्सुकता अधिक होती. विशेषतः गावी आलेले चाकरमानी आणि घरगुती बाप्पांचे विसर्जन करून मोकळे झालेले अनेकजण थेट मच्छी मार्केटमध्ये दाखल झाले. सकाळपासूनच मच्छी मार्केटमध्ये मासे खरेदीसाठी ग्राहकांची वर्दळ वाढत गेली. सुरमई, पापलेट, बांगडा, कोळंबी, बोंबील, सरंगा, पेडवा, मोरी, सौदाळा, यांसारख्या विविध प्रकारची ताजी मासळी मोठ्या प्रमाणात मार्केटमध्ये उपलब्ध होती. माशांचा दरही समाधानकारक होता. चिकन व मटण खरेदीलाही खवय्यांची पसंती होती. काही जणांनी फॅमिलीसह तर हॉटेलमध्ये जाऊन जेवणाचा बेत आखला होता. वाढलेल्या मागणीमुळे मच्छी विक्रेत्यांची चांगली कमाई झाली. कुडाळसह जिल्ह्यातील बहुतांश मच्छी मार्केटमध्ये खवय्यांची मोठी झुंबड उसळली होती.

### जाहीर सूचना

जनतेस याद्वारे **सूचना** देण्यात येते की, आम्ही (अ) (१) **साकिब रशिद मस्कती** आणि (२)**मार्क जोसेफ सेल्विन** यांच्या याखाली लिहिलेल्या **पहिल्या अनुसूची**मध्ये अधिक तपशिलवारपणे वर्णन केलेल्या मालमत्ता (**“पहिली मालमत्ता”**) आणि (ब) (१) **साकिब रशिद मस्कती** आणि (२) **तनाझ मार्क सेल्विन** यांच्या याखाली लिहिलेल्या **दुसऱ्या अनुसूची**मध्ये अधिक तपशिलवारपणे व्रणन केलेल्या मालमत्ता (**“दुसरी मालमत्ता”**) च्या शीर्षकाची तपासणी करीत आहोत. (पहिली मालमत्ता आणि दुसरी मालमत्ता यापश्चात एकत्रितरित्या **“मालमत्ता”** असे उल्लेखित)

मालमत्ता आणि/किंवा तिच्या कोणत्याही भाग किंवा खंडाच्या संदर्भात संपादन, नियुक्ती, अभिहस्तांकन, जप्ती, अधिकार, निवाडा, वाटप, लाभार्थी हक्क/जिंदगी किंवा इतर हितसंबंध, मृत्युपत्र, उत्तराधिकार, प्रभार, अभिहस्तांतरण, विकास करार, कायद्याच्या न्यायालयाचा हुकूम किंवा कोणताही अन्य आदेश, निधन, प्रवृत्ती, वहिवाट, बोजा, देवाणघेवाण, कौटुंबिक किंवा अन्य इतर व्यवस्था/समझोता/तडजोड, भेट, मंजुरी, हमी, हायपोथिकेशन, वारसा, मनाई, संयुक्त उपक्रम, भाडेपट्टी/उप-भाडेपट्टी, परवाना, धारणाधिकार, *प्रलंबित कायदेशीर कारवाई*, आरक्षण, एफएसआय वापर, प्रथम नकाराचा अधिकार, कर्जे, देखभाल, गहाणवट (न्याय्य किंवा अन्यथा), नकारात्मक किंवा इतर करार, भोगवटा, कोणत्याही न्यायाधिकरण, महसूल किंवा वैधानिक प्राधिकरण किंवा लवादाद्वारे पारित आदेश, विभागणी, भागिदारी, तारण, ताबा, मुखत्यार पत्र, सर्वप्रथम खरेदी, जुनी वहिवाट, प्रतिबंध, मागणी, विक्री, प्रतिभुती हितसंबंध, हिस्सा, भाडेकरू/पोट-भाडेकरू, मृत्युविषयक संलेख, हस्तांतरण किंवा न्यास, किंवा कोणत्याही करारपत्राअंतर्गत, सहयोग किंवा करारनामा, दस्तऐवज, कोणत्याही कारणास्तव हमीपत्र किंवा लिखित या मार्गे किंवा अन्यथा कशाही प्रकारे कोणताही हक्क, शीर्षक, हितसंबंध, हिस्सा, लाभ, दावा, मागणी किंवा कोणत्याही स्वरुपाचा विवाद असणाऱ्या **कोणत्याही किंवा सर्व व्यक्तींना** याद्वारे विनंती करण्यात येते की, येथील दिनांकापासून **१० (दहा) दिवसांच्या** आत त्याबाबत objections@rjdpartners.in येथे आणि याखाली उल्लेखिलेल्या पत्त्यावर सहाय्यक कागदोपत्री पुराव्यांसह आम्हाला लेखी सूचित करावे, असे न केल्यास अशा व्यक्ती किंवा व्यक्तींचे दावा किंवा दावे, जर असल्यास, सर्व हेतू आणि कारणांकरिता जाणुनबुजून सोडून दिले आणि/किंवा त्याग केले असे समजण्यात येईल आणि कोणत्याही पद्धतीने बंधनकारक नसतील.

**वरील उल्लेखित पहिली अनुसूची**
(पहिल्या मालमत्तेचे वर्णन)

गाव जांभुळपाडा, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे स्थित, वसलेल्या आणि असलेल्या गट क्र. ६७, हिस्सा क्र. १ धारण केलेल्या मोजमाप ६५.५ आर्स जमिनीचे सर्व खंड आणि तुकडे आणि चतु:सीमा खालीलप्रमाणे:

उत्तरेस किंवा त्या दिशेने: गट क्र. ६७ हिस्सा क्र. २;
पूर्वेस किंवा त्या दिशेने: गट क्र. ६७ हिस्सा क्र. २;
दक्षिणेस किंवा त्या दिशेने: गट क्र. ९०; आणि
पश्चिमेस किंवा त्या दिशेने: गट क्र. ५६ आणि गट क्र. ६८.

**वरील उल्लेखित दुसरी अनुसूची**
(दुसऱ्या मालमत्तेचे वर्णन)

गाव जांभुळपाडा, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे स्थित, वसलेल्या आणि असलेल्या गट क्र. ६७, हिस्सा क्र. २ धारण केलेल्या मोजमाप ५७.७ आर्स जमिनीचे सर्व खंड आणि तुकडे आणि चतु:सीमा खालीलप्रमाणे:

उत्तरेस किंवा त्या दिशेने: गट क्र. ५७, गट क्र. ६५ आणि गट क्र. ६६;
पूर्वेस किंवा त्या दिशेने: गट क्र. ६३;
दक्षिणेस किंवा त्या दिशेने: गट क्र. ९०, गट क्र. ९२ आणि गट क्र. ९३; आणि
पश्चिमेस किंवा त्या दिशेने: गट क्र. ५६ आणि गट क्र. ६७ हिस्सा क्र. १.

**दिनांक: १४ सप्टेंबर, २०२५**


**RJD & Partners** करिता
ॲडव्होकेट्स ॲण्ड सॉलिसिटर्स
सही/-
**विनीत नालावाल्ला**
भागीदार
objections@rjdpartners.in
ओव्हल हाऊस, ४ था मजला, ब्रिटीश हॉटेल लेन, काळा घोडा, फोर्ट, मुंबई - ४००००१.

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५




## राशीभविष्य

- **मेष** : आर्थिक व्यवहारात फसवणूक संभवते. मुलांच्या प्रश्नांचा ताण वाढेल. प्रकृतीच्या तक्रारी संभवतात.
- **वृषभ** : चैनीवर अधिक खर्च होईल. भागीदारी व्यवसायात काळजी घ्यावी. मनाजोग्या घटना घडतील.
- **मिथुन** : महत्त्वाचे करार मार्गी लागतील. जुनी येणी सहजगत्या वसूल होतील. कलाकुसरीला वाव मिळेल.
- **कर्क** : महत्त्वाच्या भेटी लांबणीवर पडतील. उत्पन्नाच्या नव्या मार्गाचा विचार होईल. बाकी चिता नसावी.
- **सिंह** : नोकरीत नव्या जबाबदाऱ्या येतील. यंत्र, वाहनाचा वापर काळजीपूर्वक करावा. विचारानं रहावं.
- **कन्या** : आजचा दिवस महत्त्वाचा राहील, अपेक्षित ध्येय साध्य करू शकाल. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.
- **तूळ** : मनाविरूध्द घटना संभवतात. पूर्वीचे वाद पुन्हा उद्‍भवण्याची शक्यता आहे. पुरेसा संयम बाळगावा.
- **वृश्चिक** : व्यवसायात नव्या संधी चालून येतील. आत्मविश्वास वाढीस लागेल. कौटुंबिक समाधान लाभेल.
- **धनु** : वरिष्ठांची नाराजी संभवते. नोकरीत सहकाऱ्यांशी जमवून घ्यावं. प्रेम प्रकरणात अनुकूलता राहील.
- **मकर** : कार्यात अपेक्षित प्रगती होईल. जुन्या स्मृतींना उजाळा मिळेल. यांत्रिक क्षेत्रात संधी लाभतील.
- **कुंभ** : व्यवसायात पुरेशी जागरूकता बाळगावी. सार्वजनिक क्षेत्रात संधी लाभतील. बाकी चिंता करू नये.
- **मीन** : अकारण ताण-तणाव निर्माण होईल. ज्येष्ठांच्या प्रकृतीची काळजी घ्यावी. प्रवास शक्यतो टाळावा.

इझी ट्रिक्स

## करून तर पाहा

**माशा जातील पळून:** पावसाळ्यात घरमाश्यांचा त्रास जाणवतो. या त्रासापासून सुटका हवी असल्यास कापराची मदत घ्या. कापूर जाळून धूर केल्यास त्या वासाने माशा आपोआप पळून जातात. **काळजी वुडन फ्लोअरिंगची:** आजकाल घरामध्ये वुडन फ्लोअरिंग करून घेण्याकडे अनेकांचा कल असतो. पण या फ्लोअरिंगची काळजी घेणंही गरजेचं असतं. तीन ते पाच वर्षांमधून एकदा पॉलिश करवून घेणंही गरजेचं आहे. या फ्लोअरिंगवर फर्निचर ठेवताना त्याखाली प्रोटेक्टिव्ह पॅड्स ठेवणं महत्त्वाचं आहे. फ्लोअरिंग हार्ड क्लीनरचा वापर करू नये. कोरडया मॉपनी स्वच्छता करावी. **से नो टू सल्फेट:** शांपू किंवा इतर हेअर प्रोडक्ट्समध्ये वापरलं जाणारं केमिकल म्हणजे सल्फेट. या सल्फेटमुळे केस खराब होऊ शकतात. त्यामुळे सल्फेटफ्री शांपू वापरावा. या शांपूमुळे केस आणि स्काल्पवरील कोरडेपणा नाहीसा होतो. याशिवाय केस तुटण्याची समस्या नाहीशी होते. स्काल्प संवेदनशील असल्यास सल्फेट फ्री शांपू हा सर्वोत्तम पर्याय आहे. याशिवाय कलरिंग, आयर्निंग किंवा पर्मिंग केलेल्या केसांसाठी देखील सल्फेटफ्री शांपू हा उत्तम पर्याय आहे.

## १४ सप्टेंबर

दिनविशेष

**२०१३ :** किरिबाटी, नौरु आणि टोंगाचा संयुक्त राष्ट्रांमध्ये प्रवेश.
**२००० :** मायक्रोसॉफ्टने एम. एस. डॉस या संगणकप्रणालीची शेवटची आवृत्ती ८.० प्रकाशित केली.
**२०११ :** प्रसिद्ध पैलवान हरिश्चंद्र माधव बिराजदार यांचं निधन.
**२०१७ :** अहमदाबाद ते मुंबई दरम्यानच्या भारताच्या पहिल्या बुलेट ट्रेनचं भूमिपूजन नरेंद्र मोदी आणि शिंजो अॅबे यांच्या हस्ते संपन्न.

स्टडी टिप्स

## ऐकायला हवं

मुलामुलींनो, वाचण्या आणि बोलण्यासोबतच ऐकण्याची कलाही आपल्याकडे असायला हवी. कान उघडे ठेवले की ऐकू येतं. हे खरं असलं तरी लक्ष देऊन ऐकणं गरजेचं असतं. ऐकण्याच्या कलेचे खूप फायदे आहेत. लक्ष देऊन ऐकल्यामुळे तुम्ही एखादी गोष्ट नीट समजून घेऊ शकता. तुमची प्रश्न विचारण्याची क्षमता वाढते. एखाद्या विषयावर तुम्ही नेमकी प्रतिक्रिया देऊ शकता. एखाद्या मुद्यावर फक्त टिका करण्याऐवजी तर्क लढवून योग्य ते मुद्दे मांडता येतात. त्यामुळे शाळेत किंवा क्लासमध्ये शिकताना नीट लक्ष देऊन ऐकायला हवं. आपलं सगळं लक्ष शिक्षकांकडे केंद्रित व्हायला हवं.

एका अभ्यासानुसार आपण जे ऐकतो त्यातलं २५ ते ५० टक्के आपल्या लक्षात राहतं. त्यामुळे ऐकताना महत्त्वाची माहिती आपल्या डोक्यात साठून रहावी असं आपल्याला वाटतं. त्यामुळे तुम्ही ऐकण्याची क्षमता वाढवायला हवी. आपण हे का ऐकत आहोत, असा प्रश्न स्वत:ला विचारायला हवा. ऐकण्याचा उद्देश माहीत असला की आपण चांगल्या प्रकारे लक्ष देऊ शकतो.

आरोग्यमंत्र

## आरोग्यासाठी हळद ...

बहुतेक लोक सकाळी उठल्या उठल्या गरम पाणी आणि लिंबू सेवन करतात. यामुळं त्यांचं पोट साफ राहतं आणि पोटातील मळ बाहेर पडतो. लिंबू टाकून गरम पाणी पिण्याचे फायदे तर आपणा सर्वांनाच माहिती आहेत. परंतु जर याच मिश्रणामध्ये थोडीशी हळद मिक्स केली तर याचे गुण अजूनच वाढतील. एक ग्लास गरम पाण्यात अर्धा लिंबू पिळून त्यामध्ये हळद आणि गरम पाणी मिसळा. यानंतर त्यामध्ये चवीनुसार मध मिसळा. हे मिश्रण हलवत राहा. यामुळे हळद खाली बसणार नाही. हळदीचं पाणी शरीराची सूज कमी करतं.



शरीरावर कितीही सूज आलेली असेल तर हळदीचे पाणी घेतल्यावर सूज कमी होऊन जाईल. यामध्ये करक्यूमिन नामक एक रसायन असते. जे औषधाच्या रुपात काम करते. नियमित हळदीचं पाणी डिमेंशिया आणि अल्जाइमरसाठी लाभदायक ठरतं. हळद मेंदूसाठी लाभदायक असते. हळदीमध्ये करक्यूमिन असल्यामुळे हळद एक हे एक चांगलं अँटीऑक्सीडेंट आहे. हे कॅन्सर निर्माण करणा-या कोशिकांसोबत लढतं. एका संशोधनाप्रमाणे नियमित हळद खाल्ल्याने पित्तरस तयार होतो यामुळे अन्नाचे सहज पचन होते. हळदीच्या पाण्यामुळं धमन्यांमध्ये रक्त साचत नाही. त्यात असलेलं करक्यूमिन हे जॉइंट पेन आणि सूज दूर करण्यासाठी फायदेशीर असतं. नियमित हळदीचे पाणी प्यायलं तर फ्री रॅडिकल्ससोबत लढण्यासाठी मदत मिळते ज्यामुळं शरीरावर होणारा वयाचा परिणाम धीम्या गतीने होतो.

### पंचांग

**रविवार, १४ सप्टेंबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
भाद्रपद कृ. ८, नक्षत्र : रोहिणी
चंद्रराशी : वृषभ, योग : वज्र/सिद्धी,
सूर्योदय : ६.२८, सूर्यास्त : ६.४०

### फॉरवर्डस

रिश्तों क़ी भीं इक़ अपनीं
उम्र होतीं हैं ज़नाब...

कुछ मरनें तक़ चलतें हैं कुछ
जिते जी मर जातें हैं...!

### वेगळ्या वाटा

विद्यार्थी वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षा देत असतात. या परीक्षांमध्ये यश मिळवण्यासाठी विद्यार्थी कोचिंग क्लासमध्ये नावनोंदणी करण्यास प्राधान्य देतात. पण बऱ्याच विद्यार्थ्यांना क्लासची फी परवडत नाही. कोणताही क्लास न लावता तुम्ही स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवू शकता. यासाठी नेमकं काय करायला हवं हे जाणून घेऊ या.

※ जेईई, युपीएससीसारख्या मोठ्या स्पर्धा परीक्षांच्या प्रणालीबद्दल ऑनलाईन संशोधन करा. या परीक्षांच्या पद्धतीबद्दल जाणून घ्या. परीक्षेचे नियम, अटी, अभ्यासक्रम याविषयी सविस्तर माहिती मिळवा. शिक्षक आणि मित्रमंडळींची मदत घेऊ शकता. या परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांशी संपर्क साधू शकता. **(क्रमशः)**

## हॉस्पिटल मॅनेजमेंटच्या विश्वात...

करिअरवाटा

विविध व्याधींचं प्राबल्य वाढत असताना आणि आबालवृद्धांना तब्येतीच्या तक्रारी सतावत असताना अद्ययावत रुग्णालयांची संख्या वाढणं आणि त्यायोगे 'हॉस्पिटल मॅनेजमेंट' चं विश्व व्यापक होणं स्वाभाविक अहे. या वाढत्या व्याप्तीमुळंच या क्षेत्रात कुशल मनुष्यबळाला वाढती मागणी आहे. मोठ्या हॉस्पिटलचा कर्मचारीवर्ग मुख्यत्वे तीन विभागात विभागलेला असतो. एक म्हणजे डॉक्टर्स आणि परिचारकवर्ग, इतर दैनंदिन कामकाज बघणारा कर्मचारीवर्ग आणि तिसरा गट म्हणजे हॉस्पिटलचं ऑफिस वर्क करणारा कर्मचारीवर्ग. रूग्णाला हॉस्पिटलमध्ये दाखल करून घेणं, त्याला योग्य त्या डॉक्टरांपर्यंत पोहोचवणं, तपासण्यांसाठी मार्गदर्शन करणं, त्याबाबतचे खर्चाचे तपशील पुरवणं, मेडिक्लेमच्या प्रक्रिया पूर्ण करणं, रुग्णालयात दाखल करावं लागलं, तर त्याच्या निवासापासून खाण्यापर्यंतची सोय करणं हे सगळं पहाणारा एक कर्मचारीवर्ग असतो. त्याचा रूग्णाच्या उपचारांशी काही संबंध नसतो; मात्र रूग्णाची हॉस्पिटलमध्ये गैरसोय होऊ न देणं हे यांचं काम असतं. व्यवस्थापनाच्या क्षेत्रातील ही झपाट्यानं विकसित होणारी शाखा आहे. त्यामुळं या क्षेत्रात कारकीर्दीच्या विविध संधी उपलब्ध होऊ शकतात.



खेचाखेची

## मतिमंद कुठली

तुझं ते मंद हसणं...
तुझं ते मंद लाजणं...
तुझं ते मंद आवाजात बोलणं...
तुझं ते मंद चालणं...

मतिमंद कुठली!

### वेगळं काही

चीनमध्ये हाँगकाँगमधली२१ वर्षांची एक मुलगी वेडिंग प्लानरचं प्रशिक्षण घेत होती. त्याचवेळी तिला मॉक वेडिंगमध्ये सहभागी होण्याबाबत सांगण्यात आलं. पण तिचं खरं लग्न लावून देण्यात आलं. लग्नानंतर तिच्याकडून सह्या घेण्यात आल्या. या मुलीला मेकअप आर्टिस्ट बनायचं होतं. पण वेडिंग प्लानर बनल्यानंतर भरपूर पैसे कमावता येतील अशा भूलथापांना तिला बळी पाडण्यात आलं. तिने कायदेशीर मदत घेतली. हाँगहाँगमध्ये राहण्याची परवानगी मिळावी यासाठी अशा प्रकारे हाँगकाँगच्या मुलींना फसवण्यात येत असल्याचं बोललं जातं. हाँगकाँगची नागरिक असलेल्या पत्नीच्या पतीला तिथे राहण्याची परवानगी मिळते. त्यामुळे अशाप्रकारे फसवणूक होत आहे.

## मुलांना वळवा योगाकडं

संगोपन

सध्याच्या तणावग्रस्त जीवनशैलीच्या विळख्यातून लहानग्यांचीदेखील सुटका झालेली नाही. विविध प्रकारचं प्रदूषण, जंक फूडचं अतिसेवन, अभ्यास, वाढती स्पर्धा, गॅझेट्सचा वापर, व्यायामाचा अभाव, बैठी जीवनशैली यामुळे लहानग्यांचं आरोग्यदेखील धोक्यात आलं आहे. वजन वाढण्यासोबतच चिडचिड होणं, मन एकाग्र न होणं अशा समस्या त्यांना भेडसावतात. योगासनांच्या माध्यमातून या समस्या सोडवता येतील. त्यासाठी तुम्ही मुलांना योगासनं करायला प्रोत्साहन देऊ शकता. त्यांच्याकडून योगासनं करून घेऊ शकता. नियमित योगासनांमुळं मुलं तंदुरुस्त राहतील. त्यासाठी मुलांच्या आणि तुमच्या वेळेनुसार योगासनांची निश्चित वेळ ठरवा. सकाळी किंवा संध्याकाळी मुलांकडून सोपी योगासनं करून घ्या. त्यांना योगाचे फायदे सांगा. मुलांना योगाच्या क्लासलाही घालता येईल. मुलांकडून ओढून ताणून योगा करून घेऊ नका. योगा करताना घरात आनंदी वातावरण असू द्या. संध्याकाळी मुलांना मैदानी खेळही खेळायचे असतात. त्यामुळे थोडा वेळ योगा करून मुलांना खेळू द्या. योगा करताना मुलांच्या आवडीचं संगीत लावता येईल.



## सुडोकू ४


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ३ | ४ | २ | | ७ | | | |
| | | | | ६ | | २ | | |
| | | | ९ | | ८ | | ७ | |
| | | ६ | १ | | | | | ७ |
| २ | ७ | ३ | | | | ५ | १ | ८ |
| १ | | | | | २ | ४ | | |
| | २ | | ८ | | ३ | | | |
| | | ५ | | २ | | | | |
| | | | ५ | | ९ | ७ | ३ | २ |

टीप -
※ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
※ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
※ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ३ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | ३ | ७ | ९ | २ | १ | ५ | ४ | ६ |
| १ | ६ | ४ | ७ | ८ | ५ | ३ | ९ | २ |
| ९ | २ | ५ | ४ | ६ | ३ | १ | ८ | ७ |
| २ | १ | ६ | ८ | ९ | ७ | ४ | ५ | ३ |
| ४ | ७ | ३ | ५ | १ | २ | ९ | ६ | ८ |
| ५ | ८ | ९ | ६ | ३ | ४ | २ | ७ | १ |
| ७ | ९ | २ | ३ | ४ | ६ | ८ | १ | ५ |
| ६ | ४ | १ | २ | ५ | ८ | ७ | ३ | ९ |
| ३ | ५ | ८ | १ | ७ | ९ | ६ | २ | ४ |

## शब्दकोडे क्रमांक ४



**आडवे शब्द :-**
१) आभारदर्शक एक शब्द
४) कापसाची बी
७) झाडाला नवीन पाने येणे
११) व्याजातील द. सा. द. शे. पद्धतीचे विस्तारित नाव
१४) अफवा,वावडी
१५) जमीन
१६) पंकज
१८) आकाश
१९) खोगिराखालची गादी
२०) लहान वस्ती
२२) दात
२३) काळजी
२४) लबाडी,कारस्थान
२६) ममता,धन
२७) उषा,प्रभात
२९) त्वरा,घाई
३१) वृक्ष
३२) चुलता
३४) बाण
३५) घोड्यावरुन मारलेली चक्कर
३७) नर्तक (चे)
३८) देऊळ
४०) दुसऱ्याच्या शरीरात आत्म्याचा शिरकाव
४५) दाखला, नमुना, (गणितात) सोडविण्याचा प्रश्न
४६) अरण्यवास
४७) उत्सवाचे दिवस
४९) मोरावळ्यातील फळ
५०) वारा घेण्याचे एक साधन
५१) मध्यम प्रतीचा
५४) नशीब,काम
५५) पुष्परस
५६) वाहून नेणारा
५७) होम,यज्ञात आहुति टाकणे
५८) श्रेष्ठ पुरुष
६०) किरकोळ सामान
६१) हुशार,चाणाक्ष
६३) सापाची एक जात
६५) गेरू,कुंड्यांना लावण्याची रंगीत माती
६७) धाक,वचक
६८) वर्ष,साल
६९) खरगोश
७१) मीठ
७३) ठाणवई
७४) सोवळ्याचे रेशमी धोतर
७५) जिनसांची यादी
७८) टेकडीच्या उंचवट्यावरील खडकाळ जागा
८०) कायद्याप्रमाणे
८१) चरबी
८३) क्वचित,एखादे प्रसंगी
८४) संपणे
८५) स्तुती

**उभे शब्द:-**
१) चांगले कार्य करताना स्वत:वर एखादे संकट उद्भवणे (वा.प्र.)
२) तुफान
३) किंमत,प्रत्येक
४) अखंडपणे
५) सुळे
६) पोपट
७) पुष्पदल
८) बोकड,एडका
९) स्त्रियांचा एक खेळ
१०) गाडीचे छत
१२) समुद्रकिनारा
१३) समाप्ती,अखेर,नाश
१७) सहाय्य
२०) व्यर्थ
२१) श्रीयुत
२५) किरकोळ गोष्ट अति करुन सांगणे
२६) एक सुगंधी वनस्पती
२८) बाण
३०) कोवळा अंकुरा
३३) बासरी
३६) कागद उडू नये म्हणून ठेवण्याचे वजनी साधन
३७) बाई
३८) राष्ट्र
३९) पाकळ्यांचा औषधी कंद
४१) अंतराळात फिरणारे वाहन
४२) प्रवास करणारा
४३) गावाची हद्द
४४) गाढव
४७) जीवलग मित्र
४८) बातमीदार
४९) टेकू,आश्रय,प्रमाण
५०) पक्ष,दोन आठवडे
५२) सवय,राबता,उत्तर दिशा
५३) गुरांना गावाबाहेर कुरणात चरण्याबाबत द्यावे लागणारे द्रव्य
५५) जुगाराचा एक प्रकार
५६) मार्गक्रमण
५८) बोटाच्या टोकावरील कडक आवरण
५९) उलटी,वांती
६२) ※※ दत्ता एक अभिनेत्री
६६) कर्ज
६७) दमदाटी
६८) अंगरखा
७०) वस्तू,माल
७२) निरर्थक कष्ट करत फिरणे
७४) छोटी घागर
७६) ओझे घालणे
७७) कबूतर
७८) आईचा भाऊ
७९) धमनी
८२) जल,जीवन

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## आगरी नेते दि. बा. पाटील आणि समतेच्या तत्त्वावरील वर्तमान


# ओबीसी विरुद्ध मराठा आरक्षण आंदोलन

ॲड. राकेश पाटील

आज महाराष्ट्रात ओबीसी आरक्षणाचे आंदोलन पेटले आहे. यात आगरी समाज जो महाराष्ट्रात माजी खासदार दि.बा. पाटील यांच्या नेतृत्वात राष्ट्रीयस्तरावर मंडळ आयोगाचं नेतृत्व करीत होता, म्हणूनच शेतकरी कामगार पक्षाचे नेते महाराष्ट्राच्या विधिमंडळात विरोधी पक्ष म्हणून नेतृत्व करीत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेल्या भारताच्या लोकशाहीच्या तत्त्वात विरोधी पक्ष आणि विरोधी पक्षनेता हा पंतप्रधान आणि मुख्यमंत्री यांच्याइतकाच महत्त्वाचा असतो. आजचा विरोधी पक्षनेता हा, उद्याचा मुख्यमंत्री किंवा पंतप्रधान असतो. विरोधी पक्ष कमकुवत करणारे सध्याचे भाजपचे राजकीय तत्त्व हे देश हुकूमशाहीकडे वाटचाल करत असल्याचे आमच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक आजाराचे सुरुवातीचे लक्षण आहे. महाराष्ट्राच्या सर्वच राजकीय पक्षात खूप मोठा इतिहास असलेला शेतकरी कामगार पक्ष समजून घ्यायचा असेल, तर लोकनेते दि.बा. पाटील यांना समजून घेतल्याशिवाय कोणताच पर्याय राहिलेला नाही.

महाराष्ट्र आणि देशाच्या सुदृढ लोकशाहीसाठी लोकनेते दि.बा. पाटील यांचा लढवय्या आगरी आणि शेतकरी कामगार पक्ष वाचविणे म्हणजे लोकशाही वाचविणे होय. शेतकरी कामगार पक्षाच्या सर्वसामान्य आगरी कार्यकर्त्यांची आणि एकूणच महाराष्ट्रातील ओबीसी जातीतील साडेचारशेहून अधिक जातींच्या अस्तित्वाची ही ओबीसी लढाई आहे. आज महाराष्ट्राच्या सर्वात जास्त आमदार, खासदार, सरपंच, नगरसेवक म्हणजेच राजकीय सत्तेत मराठा समाज आहे. पोलीस, जिल्हाधिकारी, तह-सीलदार, म्हणजेच प्रशासनात मराठा समाजाचे वर्चस्व आहे. आतापर्यंत सोळा मुख्यमंत्री महाराष्ट्राचे मराठा लोक झाले. शिक्षण, सहकार, बँकिंगसह सर्वच क्षेत्रात मराठा समाजाचे वर्चस्व आहे. त्यांना सर्वत्र प्रतिनिधित्व मिळाले आहे. तरीही मराठा लोक ओबीसी आरक्षणातून आम्हाला कुणबी दाखले देऊन आरक्षण हवे, अशी मागणी करतात.

यासाठी आगरी, कोळी, भंडारी, कराडी, ईस्ट इंडियन, आदिवासी यांच्या मुंबई शहरास वेठीस धरतात. पनवेलचे नगराध्यक्ष, पनवेलचे चार वेळा आमदार, दोन वेळा खासदार असलेल्या लोकनेते दि.बा. पाटील यांनी निश्चितपणे आज ओबीसींची बाजू मांडली असती. ओबीसींची लढाई प्रतिनिधीत्व नाकारले ते मनुस्मृतीच्या तत्त्वाने नाकारले. म्हणूनच ही प्रतिनिधित्वाची संविधानाची ओबीसी लढाई आहे. मराठा हे सामाजिकदृष्ट्या मागास नाहीत. शोषित नाहीत. मग त्यांना सामाजिकदृष्ट्या मागास नसताना ओबीसीतून आरक्षण मिळणारच नाही. लोकनेते दि.बा. पाटील यांनी सर्वांना पटवून दिले असते. आजच्या ओबीसी नेतृत्वास आदर्श असे काम आगरी समाजातील ॲड. जनार्दन पाटील, मा. जनार्दन कोठेकर यांनी आणि लोकनेते दि.बा. पाटील यांनी मुंबईतून केले आहे. जरांगे पाटील यांचा मोर्चा खरोखर कुणबी ओबीसी शूद्र मानसिकतेचा असता तर पनवेल येथील लोकनेते दि.बा. पाटील यांच्या घराला भेट दिल्याशिवाय पुढे गेलाच नसता. तेथेच मराठ्यांना एकेकाळी राष्ट्रीय स्तरावर लढलेल्या ओबीसी नेत्याचे विचार म्हणजे बुद्ध, चार्वाक, फुले, शाहू, आंबेडकर यांचे विचार आहेत, हे समजले असते. आज तत्त्वहीन मराठा आरक्षण आंदोलन, महाराष्ट्रात मागास वर्गीय जातींच्या मनात आरक्षण संपतेय की काय? अशी भीती निर्माण करणारे आंदोलन ठरले आहे. म्हणूनच पद्मश्री लक्ष्मण माने यांच्यासारखे नेतृत्व मुंबई येथे आंदोलनास बसले आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक अस्वस्थतेचा आणि नेपाळमध्ये उडालेल्या राजकीय, सामाजिक, आर्थिक उद्रेकाचा, तिथल्या सामान्य जनतेचा आक्रोश जगात दिसत आहे. याची तुलना आणि मूळ, आज मराठा विरुद्ध ओबीसी संघर्षात शोधले जात आहे. महाराष्ट्रात देशात आणि शेजारी राष्ट्रात कोणती विषमता आहे? आर्थिक की जातीय विषमता आहे.






चातुर्वर्ण्य ब्राह्मण क्षत्रिय वैश्य की स्त्री शूद्र-अतिशूद्र यांची धार्मिक विषमता आहे? याची मांडणी करताना महाराष्ट्रातील विचारवंत बोलताना दिसत नाहीत. यासाठी लोकनेते दि.बा. पाटील यांचा विचार लोकांना आजही मार्गदर्शक ठरू शकतो. मागील काळात लोकनेते दि.बा. पाटील यांनी ठाणे, रायगड जिल्ह्यातील आगरी, कोळी, कराडी या ओबीसी जातींसह एससी, एसटी जातींच्या अस्तित्वासाठी सिडकोविरुद्ध मोठा राष्ट्रीय संघर्ष केला. १९८४च्या जासई, पनवेल, उरण येथील कुळ कायद्याने मिळालेले अल्प भूधारक भूमीहीन, शेतमजूर यांच्या आंदोलनात पाच हुतात्मे आणि हजारो प्रकल्पग्रस्तांच्या त्यागातून साडे बारा टक्के विकसित सिडको भूखंडाचे पुनर्वसन तत्त्व देशाला दिले. वर-वर हा आर्थिक न्याय दिसत असला, तरीही मराठा मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी ओबीसी शेतकरी लोकांवर केलेला गोळीबार हेच दर्शवितो.

मराठा राज्यकर्त्यांची भूमिका ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या रयतेची काळजी घेणाऱ्या राजाची नाही. आरक्षणाची सुरुवात आपल्या कोल्हापुरातील राजर्षी शाहू महाराजांची तर नाहीच नाही. कुणबी हे आगरी, कोळी, भंडारी यांच्यासोबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आगरी नेते नारायण नागू पाटील यांच्या अलिबाग चरी येथील विश्वविक्रमी शेतकरी संपात सहभागी ओबीसी जातींचे कष्टकरी लोक होते. तर, मराठा, ब्राह्मण, वैश्य, जमीनदार, खोत, सावकार होते. कोकणातील उच्चवर्णीय खोत विरुद्ध स्त्री शूद्र-अतिशूद्र जातींचा संघर्ष आज मराठा हे कुणबी नाहीत, हे सत्य सांगतो. म्हणून त्यांना कुणबी ओबीसी दाखले देण्याचा महाराष्ट्र शासनाचा निर्णय हा आगरी, कोळी, कराडी, कुणबी भंडारी या कोकण, महाराष्ट्र आणि एकूणच भारतातील ओबीसी, एससी, एसटी यांचे आरक्षण संपविण्याचा भयंकर निर्णय आहे. महाराष्ट्रात ओबीसींवर झालेल्या अन्यायाला वाचा फोडणारे मंत्री महोदय छगनराव भुजबळ हे मुंबई येथील आगरी नेते जनार्दन कोठेकर, ॲड. जनार्दन पाटील. दि.बा. पाटील यांच्या आंदोलनाचा अभिमानाने उल्लेख करतात. अर्थात, ओबीसी जातीत आगरी बांधव नेतृत्व करत होता. त्यांचा राजकीय पक्ष शेतकरी कामगार पक्ष होता. आज माळी समाजातील मा. भुजबळ, तरुण माळी नेते ॲड. मंगेश ससाणे, धनगर नेते प्रा. लक्ष्मण हाके हे महाराष्ट्राचे नेतृत्व करीत आहेत. यात लोकनेते दि.बा. पाटील यांना आदर्श मानणारे एखादे आगरी-कोळी तरूण नेतृत्व असले पाहिजे. शब्दांच्या मर्यादा असल्यामुळे फार लिहिता येत नाही. परंतु, डावी चळवळ असताना मुंबईचे त्यावेळचे आगरी नेते कॉम्रेड जी.एल. पाटील यांनी अखिल आगरी समाज परिषदेची स्थापना केली. यात सर्व काही येते. ओबीसी लढाई लढण्यासाठी ओबीसींची छोट्यातली छोटी जात पुढे असली पाहिजे. म्हणूनच 'मुक्ती कोण पथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर' हा या संदर्भातील महत्त्वाचा ग्रंथ आगरी, कोळी, समस्त ओबीसी जातींसाठी, प्रत्येक कार्यकर्त्यांसाठी वाचनीय आहे, असे मत ज्यांनी महाराष्ट्राची विधानसभा विरोधी पक्षनेता म्हणून गाजविली ते लोकनेते ॲड. दत्ता पाटील यांनी व्यक्त केले आहे. आज मराठा विरुद्ध ओबीसी या संघर्षात महाराष्ट्रात लोकशाही टिकविणे गरजेचे आहे. कायदा सुव्यवस्था टिकविणे गरजेचे झाले आहे. म्हणूनच लोकनेते दि.बा. पाटील यांनी ज्या फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारांना आदर्श मानले, ती गोष्ट निसर्ग न्याय म्हणजे भारताचे संविधान मानणाऱ्या मराठा, ब्राह्मण, वैश्य या जमीनदार जातींना आणि ओबीसी जातींच्या सर्वच लोकांना हा समतेचा विचार समजून घ्यावा लागेल. मनुस्मृतीचे विषमतेचे तत्त्व संपविणे हे आपले कर्तव्य आहे. त्या जागी समता आणली पाहिजे. ओबीसी आरक्षण हे समतेच्या तत्त्वानुसार संविधानात आहे. म्हणून ओबीसी आरक्षण लढाऊ आगरी लोकांनी लढवायचे आहे. अर्थात, समता प्रस्थापित करताना बुद्ध की कार्ल मार्क्स हा ३२ पानांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ग्रंथ आम्ही वाचलाच पाहिजे. त्यात ते म्हणतात, 'सर्व आश्चर्यातील आश्चर्य म्हणजे बुद्धाने संघामध्ये हुकूमशाहीशिवाय साम्यवाद प्रस्थापित केला. तो अतिशय छोट्या प्रमाणातील साम्यवाद असेलही; परंतु हुकूमशाहीशिवाय असलेला साम्यवाद होता व हे आश्चर्य लेनीनलासुद्धा करता आले नाही. समता प्रस्थापित करताना समाजाला सहभाव किंवा स्वातंत्र्याचा बळी देता येणार नाही. बुद्धाचा मार्ग अनुसरला तरच या तिन्ही गोष्टी एकत्र राहू शकतील. आज मराठा व ओबीसी हे संविधानिक भाऊ आहेत. तरीही ओबीसींचे आरक्षण त्यांना मिळू शकत नाही. हे अनेक राज्य मागास आयोग, मा. सुप्रीम कोर्ट यांनी सांगूनही मराठा नेते समजून घेत नसतील? तर रस्त्यावरचा लोकशाही टिकविण्याचा संघर्ष अटळ आहे. तो वैचारिक असावा. लोकशाही मार्गाचा असावा, यासाठी लेख आहे. बाकी संसद, विधानसभा, प्रशासन, न्यायालये, मीडिया येथे आम्ही ओबीसीनी लढले पाहिजे. त्यातही दि.बा. पाटील यांचा वैचारिक वारसदार आगरी, कोळी, कराडी ओबीसी बांधवांनी आपली लढाऊ वृत्ती कायम ठेवून इथल्या सागर आणि आगराशी बेईमानी करणाऱ्यांना आम्ही बुडवितो, हाच वारसा येणाऱ्या पिढीसमोर ठेवला पाहिजे. विकासाच्या नावाखाली येथील भूमीपुत्रांच्या जमिनी कवडीमोल भावाने सरकारने घेतल्या, ठाणे, पालघरबरोबरच आत्ता रायगडमध्येही तीच स्थिती आहे. भूमीपुत्रांच्या त्यागावर उद्योग उभे राहतात, पण इथल्या भूमीपुत्राचे नाव ज्यावेळी एखाद्या प्रकल्पला द्यायची वेळ येते, त्यावेळी जातीची समीकरणं मांडून डावललं जाते. आज नवी मुंबई विमानतळाच्या नामांतराचा प्रश्न तसाच झुलवत ठेवला आहे. कारण, तेथे नाव हे एका लढवय्या भूमीपुत्र असणाऱ्या आगरी, ओबीसी समाजातील लोकमान्य ॲड. दि.बा. पाटील यांचं नाव देण्याची आग्रही मागणी करण्यात येत आहे. पण, जातीय वादाच्या भोवऱ्यात कुठंतरी अडकवण्याचं प्रयत्न जाणीवपूर्वक केला जातोय. याच्या मागची कूटनीती इथल्या ओबीसीनी ओळखणे, ही काळाची गरज आहे. लोकनेते ॲड. दि.बा. पाटील यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन. **

९२७२६२०००५



# 'मालवणी माणूस आणि सुकट'

धनंजय शेटये

मालवणी माणूस आणि 'सुकाट' मासा यांचे अतुट नाते असते. चाकरमानी रजेनिमित्त गावी आले तरी आठवडा बाजारात 'सुकटं' शोधत फिरणार. मे महिन्याच्या मुलांच्या सुट्टीच्या काळात तळकोकणातील आठवडा मच्छी बाजार हे सुक्या व ओल्या माशांच्या समृद्धीने नटलेले असतात. 'दोड्या' 'शेंगाडा' 'बांगडा' अशा विविध जातीच्या सुक्या माशांना विशेष प्राधान्य दिले जाते. मालवणी माणसाच्या मनावर सुकटाच्या वास जणू मोहिनीच घालतो असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. जेवणात सुकटं असेल तर चार घास अधिक घशाखाली उतरतात असे जुना जाणता कोकणी माणूस आवर्जून म्हणताना ऐकता येईल. गावी घरामध्ये देवघर, आकार देव, देवाची ओवरी (खोली) अशा पावित्र्यमय ठिकाणी मांसाहारी जेवण घेण्यास आणि बनविण्यासाठी निषिद्ध असायचं. आजही ही परंपरा काही घरंदाज घरामध्ये आवर्जून पाळली जाते, शाबूत आहे. धार्मिक आध्यात्मिक रीतिरिवाजामुळे मांसाहार शिजविण्यासाठी मागल्यादारी वेगळीच चूल असायची. साधं सुकटं भाजायचं असलं तरीही मागल्यादारी. मासे शिजवायचे असतील तर तेही मागच्यादारी शिजवले जायचे. सणासुदीला देवाचा नैवेद्य ज्या चूलीवर केला जातो तिथे त्या चूलीवर मांसाहार शिजवणे म्हणजे आपण काहीतरी पातकं करत असल्याचे सर्वांनाच वाटायचे. अर्थात अशा परंपरामुळे धार्मिक जेवनाचे पावित्र्य आजही टिकून राहिले आहे.

सुकटं जेवणात असेल तर हे सर्व भाज्यांची कमतरता भरुन काढते. सुकट आणि कुळथाची पिठी हे जेवण म्हणजे स्वादिष्टतेची परिसीमा होय. कुळथाच्या पिठीला फारसा खर्चही नसतो आणि रेसीपी पण मॅगीलाही मागे टाकेल अशी सहज साध्य. कोकणी माणसांच्या आहाराची विलक्षण जीवनशैली ही काटकसर करणारी वाटली तरी याचक प्रवृत्ती नसते. फक्त उकड्या तांदळाच्या पेज हा सर्वोच्च पौष्टिक नाष्टा म्हणता येईल. पेजेची चव ही जगातल्या कुठल्याच नाष्ट्याला गाठता येणार नाही. बरं पेज खाताना चमचा वगैरे काही गरज नसायची. फणसाच्या पानांचा 'खोलपा' म्हणजे चमचा केला जायचा आणि मनसोक्त पेज प्यायची.

पावसाळ्यात मासेमारी तीन महिने बंद असते मग मांसाहारी खवय्ये दुधाची तहान ताकावर भागविण्याच्या वृत्तीसारखा कोकणी माणसांच्या मदतीला आहारात जणू सुकटंच मदतीला धावून येते.

मालवण आणि मालवणी खाद्यसंस्कृती विलक्षण प्रसिद्ध आहे.मालवणी पद्धतीचे मालवणी मसाले, मालवणी जेवण खास प्रसिद्ध.

एक माझ्या वडिलांनी सांगितलेली एक गोष्ट सांगतो. गांधीजींच्या प्रेरक विचारांनी भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर एकदा जागतिक परिषदेत भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी गेले होते. गांधी खादी पुरस्कृत विचाराने वागत होते. जागतिक दर्जाच्या परिषदेत ते धोतरपंचा अशा पेहेरावातच त्या सभेसाठी परदेश वारीला गेले होते. अनेक देशाचे मान्यवर लोक सुटाबुटात आले होते. एक मात्र गांधीजी धोतराचा पंचा नेसून आले होते. उघड्या बरगड्या दिसत होत्या. पाश्चात्य लोक गांधीजींच्या अशा व्यक्तिमत्त्वाकडे पाहुन हसू लागले.गांधीजीनी टिंगलटवाळीकडे फारसे लक्ष दिले नाही. परिषदेत शानदार भाषण केले. शेवटी चहापानाचा कार्यक्रम आता कप आणि बशीतून चहा आला. पाश्चात्य लोकांच्या पद्धतीने तिथले लोक चहाच्या कपालाच तोंड लावून चहा पिऊ लागले. कपाच्या खाली आधारक म्हणून दुसऱ्या हाताने बशी पकडुन चहा घेत होते. पण गांधीजींनी भारतीय बुजुर्गासारखा चहा बशीमध्ये ओतला व फुंकर मारत आरामात चहा पिऊ लागले. आता तिथले पाश्चात्य लोक पुन्हा गांधीजींना हसू लागले. आता गांधीजींना राहावले नाही ते लोकांना उद्देशून गांधीजी म्हणाले,

''आमच्या देशात अशापद्धतीने चहा पिण्याची परंपराच नाही तर संस्कृती सुद्धा आहे यामागे आमच्या देशातील लोकांचा दानशूर स्वभाव अभिप्रेत आहे, आमच्या भारतात 'अतिथी देवो भव' या वृत्तीप्रमाणे दारी आलेल्या सर्वांचेच आदरातिथ्य केले जाते, जेवणाच्या वेळी कोण अपरिचित व्यक्ती आली तर त्या अपरिचितासाठी आग्रहपूर्वक जेवणासाठी पान वाढण्याची आमच्या देशाची परंपरा आहे, आम्ही बशीला तोंड लावून चहा पितो याचं कारण चहा पिताना अपरिचित व्यक्ती आली आणि घरातला चहा संपलेला असेल तर हातातील कपच आम्ही पुढे करतो. कपाला उष्ट केलेले नाही. हीच दानशूरता आमचा देश जगाला शिकवतो. यातच खरी माणुसकी आहे.'

आपल्यामुळे इतरांना नाहक कोणताही त्रास होऊ देणे कोकणी माणसांच्या परंपरेत, तत्वात कधीच बसत नाही. मालवणी माणूस उगाच कोणाच्याही भानगडीत पडत नाही. सहसा भांडणासाठी पेटत नाही परंतु मालवणी माणसांच्या स्वाभिमानाला धक्का लागला तर मग मात्र असा पेटून उठतो समोरच्या व्यक्तीचा मानसन्मानाची जाळून खाक करतो. मालवणी सहसा पेटत नाही आणि पेटला तर लवकर विझत नाही. **

# पोटापाण्यासाठी आले... अन् इकडचेच जाहले

निलेश साठे

भारताच्या कानाकोपऱ्यातून हजारो किलोमीटर दूरवरून येथे मुंबई महाराष्ट्रामध्ये लोक पोटापाण्यासाठी येतात. आणि इकडचेच होऊन जातात. आपण स्वतंत्र भारतात राहत आहोत. संपूर्ण भारतात कुठेही नोकरी व्यवसाय करण्यास आपल्याला मुभा आहे. असे असेल तरी संपूर्ण देशभरातील लोकांचा कल मुंबई महाराष्ट्राकडे जास्त असलेला दिसतो. संपूर्ण देशभरातून येऊन इथे लोकं स्थायिक होऊ लागले आहेत. त्यामुळे स्थानिकांच्या हक्कावर गदा येऊ लागली हे सत्य नाकारून चालणार नाही. एकीकडे नोकरी नाही व्यवसाय नाही म्हणून मराठी तरुण हा-ताश दिसून येतो तर दुसरीकडे मात्र बाहेरून आलेले लोक खोऱ्याने पैसा ओढताना दिसत आहेत. पण हे चित्र असं का निर्माण झालं हे विचार करण्याची वेळ आली आहे. बाहेरून आलेले लोक नेमकं काय करतात याचा जर बारकाईने विचार केला तर असं लक्षात येतं की ते जास्त शिक्षण घेत बसले नाहीत. अंगभूत काहीतरी कला घेऊन आलेले आहेत. त्यामुळे मिळेल त्या जागी मिळेल त्या परिस्थितीत छोटे मोठे व्यवसाय थाटून बसलेले आहेत. त्यांच्याकडून काही शिकायचं असेल तर ती आहे त्यांची जिद्द मेहनत आणि चिकाटी. कोणत्याही क्षेत्रात त्यांनी अगदी स्वतःला झोकून दिलेलं आहे. कोणताही व्यवसाय करताना लाजत नाहीत. भीतीने मागे हटत नाहीत. काहीतरी मिळवल्याशिवाय ते माघारही घेत नाहीत. वर्षातून एकदाच गावी जातील पण सोबत पोतंभर पैसे घेऊन जातील इतकी मेहनत ते करताना दिसून येतात. गावाला गेला की दोन-चार जणांनासोबत घेऊनच येतात. गोड बोलून कमी भाडे असणारी खोली घेतात. प्रसंगी फुटपाथवर संसार थाटतात. पण छोटे मोठा व्यवसाय करूनच राहतात. दुसरीकडे आपला मराठी तरुण गड्या आपला गावच बरा म्हणून मुंबई पुणे शहराकडून गावाकडे स्थलांतर करताना दिसतात.



मग मराठी तरुण कमी कशामध्ये पडतोय. खरंतर मुंबई पुणे मध्ये भरपूर कामे आहेत. कधीही कोणीही उपाशी राहू शकणार नाही इतकी पावर या दोन शहरांमध्ये आहे. आज मुंबई पुण्यामध्ये ज्या टोलेजंग काही इमारती उभ्या राहत आहेत तेथील बहुतेक कामगार हा पर राज्यातून आलेला आहे. मराठी तरुण बोलतात येथे कामे मिळत नाहीत. काम करायचंच असेल तर इथे भरपूर क्षेत्र आहेत. किमान तुम्ही तुमचं घर चालवू शकता इतका तर पैसा इथे मिळूच शकतो. इच्छाशक्ती पाहिजे.

मराठी तरुणांनीही आता जास्त शिक्षण घेण्याच्या फंदात न पडता काहीतरी कला शिकून छोट्या-मोठ्या व्यवसायाकडे लक्ष दिले पाहिजे. मेहनतीची तयारी ठेवली पाहिजे. काहीतरी मिळवायचं आहे जिद्द अंगी बाणवली पाहिजे. यश मिळत नाही तोपर्यंतची चिकाटीनं टिकून राहिले पाहिजे. डिग्री वाले नोकरी शोधत आहेत. बिना डिग्री वाले काहीतरी स्किल शिकून आलेले खोऱ्याने पैसा ओढत आहेत. केवळ नोकरीवर आता विसंबून नाही राहिलं पाहिजे. भरपूर सुविधा जगामध्ये आलेल्या आहेत. स्वतःला अपग्रेड करा. इंटरनेटच्या माध्यमातून पैसे कमवण्याचे अनेक मार्ग निर्माण झालेले आहेत. फक्त नोकरीच हे खुळ डोक्यातून काढून टाका. कोण कुठून आलेत ज्यांना आपली भाषा ही नीट बोलता येत नाही ते इथे कायमस्वरूपी स्थायिक झालेत. आणि आपण मात्र आपल्याच मातीत परके होत चाललो आहोत. मराठी तरुणांनी आता विचार करण्याची वेळ आली आहे. बाकीचे लोक इथे येऊन पैसा कमवू शकतात तर आपण आपल्या मध्ये काय कमी आहे याचा शोध घेण्याची वेळ आलेले आहे. आपण का नाही करू शकत. ज्या ईर्षेने ने आपण आंदोलन मोर्चा मध्ये सहभाग घेतो त्याच ईर्षाने एखाद्या नोकरीं व्यवसायामध्ये उतरा वर्षा दोन वर्षातच मुंबईमध्ये मराठी टक्का नक्की वाढलेला दिसेल. या मुंबईमध्ये आणि पुन्हा करा मुंबई काबीज. मुंबई आपली आहे इथं नोकरी व्यवसायही आपणच केला पाहिजे. आपल्या हाताने मुंबई घडताना आपण पाहिली पाहिजे. मिळेल त्या क्षेत्रात लागा कामाला. पडेल ते काम करा चिकाटी ठेवा. परक्यांची इथे गरज लागू नये एवढी तर मेहनत आपण करूच शकतो. दुसऱ्यांना नावे ठेवण्यापेक्षा आहे ती परिस्थिती सत्य स्वीकारून मराठी तरुणाने आता बाह्या सरसावल्या पाहिजेत. झाडून कामाला लागलं पाहिजे. मुंबई पुण्याला आलाच तर इथे काहीतरी कमवून दाखवेन मगच गावचा तोंड पाहीन ही शपथ घेऊनच बाहेर पडा. चला तर मग लागा कामाला. **



# लालबागच्या राजाच्या विसर्जनाला झालेल्या विलंबात तर्क वितर्कांचा पाऊस!



**जगन घाणेकर**


कोट्यवधी गणेश भक्तांचे श्रद्धास्थान असणाऱ्या लालबागच्या राजाचे तब्बल तेहतीस तासानंतर शाही विसर्जन पार पडले. विसर्जन ग्रहणस्पर्श होण्याअगोदर संपन्न झाल्याने गणेशभक्तांना हायसे वाटले. लालबागच्या राजाच्या ९२ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच विसर्जनास एव्हढा विलंब झाल्याने दरम्यानच्या काळात गणेशभक्तांमध्ये नानाविध तर्क वितर्कांचा अक्षरशः पाऊस पडत होता. ज्यामध्ये गणेशोत्सव काळात चरणस्पर्श करण्यास येणाऱ्या गणेशभक्तांना कार्यकर्त्यांकडून दिली गेलेली हीन वागणूक, उद्योगपती अंबानी कुटुंबीयांचा लालबागचा राजा मंडळावर वाढता प्रभाव, यंदा कोळी बांधवांचा विसर्जनाचा मान हिरावून तराफा बनवणाऱ्या कंपनीला दिलेले कॉन्ट्रॅक्ट असे अनेक मुद्दे दिवसभर चवीने चर्चिले गेले. प्रत्यक्षात भरती ओहोटीचे चुकलेले गणित, लालबागच्या मंडळाचे कार्यकर्ते तसेच भर पावसात दिवसभर समुद्रात उभे राहून तराफा आणि राजाचा पाट जुळवण्यास धडपड करणारे कोळी बांधव यांविषयी कोणीच काही बोलत नव्हते.

गणेशोत्सव काळात लालबागच्या राजाच्या दर्शनाला दरवर्षी देश विदेशातून दीड कोटीहून अधिक भाविक येतात. एवढ्या मोठ्या संख्येने येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी मंडळ विविध सुविधा पुरवत असते. यंदा तर महाप्रसादाचीही सोय करण्यात आली होती. तरीही मंडळाचे कार्यकर्ते, सुरक्षा रक्षक आणि भाविक यांच्यामध्ये प्रतिदिन वादाचे प्रसंग दरवर्षी घडत असतात. गणेशभक्तांना अधिक वेळ रांगेत ताटकळत उभे राहावे लागू नये यासाठी दर्शन अधिकाधिक जलद होणे अनिवार्य आहे. गणेशभक्तांनी अधिक वेळ चरणाजवळ घालवू नये यासाठी, त्यांना पुढे नेण्यासाठी राजाच्या चरणाजवळ स्त्री आणि पुरुष कार्यकर्ते नियुक्त केलेले असतात. या कार्यकर्त्यांमध्ये मात्र गणेशोत्सव काळात भलतेच बळ संचारलेले असते. या बळाचा वापर करून भक्तांचे मस्तक चरणावर टेकताच क्षणी कार्यकर्त्यांकडून त्यांच्या बकोटीला धरून खेचले जाते आणि बाहेर पडणाऱ्यांच्या रांगेत त्यांना ढकलले जाते. त्यामुळे १०-१२ तास रांगेत उभे राहून आलेल्या गणेशभक्ताला नजर वर करून बाप्पाचे मुख पाहण्याचीही संधी मिळत नाही. यामागे रांगेत ताटकळत राहणाऱ्यांचा विचार करण्यात येत असला तरी कार्यकर्त्यांचे असे मुजोरीने वागणे नक्कीच अशोभनीय आहे. आजमितीला राज्यासह देशभरात अनेक पुरातन आणि जागृत मंदिरे आहेत ज्या ठिकाणी प्रतिदिन हजारो भक्त दर्शनासाठी येतात. या ठिकाणीही भक्तांना भरभर पुढे जाण्यासाठी सुरक्षा रक्षक नेमलेले असतात; मात्र त्यापैकी कुणीच भक्तांच्या बकोटीला धरून ढकलत नाहीत त्यामुळे या गोष्टीकडे मंडळाने गांभीर्याने लक्ष द्यायला हवे. एकीकडे भक्तांना अशी हीन वागणूक दिली जाते तर दुसरीकडे सेलिब्रिटी, राजकीय मंडळी, युट्युबर, शासकीय अधिकारी यांना रांग न लावता थेट राजाच्या चरणापर्यंत जाण्याची व्यवस्था केली जाते. त्यांना राजासोबत छायाचित्र काढण्याची मुभा दिली जाते, मंडळाकडून त्यांचा सत्कार केला जातो. राजाचे डावे चरण खास या विशेष अतिथींसाठी राखीव ठेवण्यात आलेले असते. राजाच्या दरबारात कार्यकर्त्यांकडून केला जाणारा हा भेदभाव गणेशभक्तांना अधिक खटकतो. अतिमहत्वाच्या व्यक्तीच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनात प्रत्येक प्रसिद्ध मंदिरात विशेष व्यवस्था केली जाते त्यामुळे तशी व्यवस्था याठिकाणीही केली जाणे स्वाभाविक आहे. मात्र त्यांच्यासाठी राजाचे एक चरण राखीव ठेवणे मनाला खटकते. राजाची दोन्ही चरणे भक्तंसाठी उपलब्ध असतील तर दर्शन अधिक जलद होऊ शकते, भक्तांचा कितीतरी वेळ वाचू शकतो. अर्थात बाप्पाच्या समीप अधिक वेळ घालवल्याने बाप्पाची कृपा होते असे नाही. बाप्पाच्या दर्शनासाठी तुम्ही किती कष्ट घेता आणि किती खचता खाता यावरच बाप्पाची कृपा अवलंबून आहे. देव अवडंबराचा नव्हे तर भावाचा भुकेला आहे. त्यामुळे दरवर्षी अवहेलना सहन करूनही बाप्पाचा भक्त दरवर्षी पुन्हा त्याच रांगेत उभा राहून दर्शनाला येत असतो. आज सर्व वाहतूक साधने उपलब्ध असतानाही लाखो भाविक दरवर्षी आषाढी-कार्तिकी एकादशीनिमित्त शेकडो किलोमीटर चालत पंढरपूरला जातात. महिनाभर प्रवास करून अनेकांना विठूमाऊलीच्या चरणावर डोके ठेवण्याचीही संधी मिळत नाही. मुकदर्शन करून परतावे लागते; मात्र या मुकदर्शनात त्याला साक्षात विठूमाउलीची भेट झाल्याचा आनंद होतो. ऊन, वारा आणि पाऊस कशाचीही पर्वा न करता घरदार भगवंताच्या हवाली करून येणारा वारकरी माउलीला अधिक प्रिय आहे. त्यामुळे राजाच्या दरबारात गणेश भक्तांचे होणारे हाल राजालाही ठाऊक आहेत. अशा भक्तांवर राजा कृपा करणार नाही का? यंदा कधी नव्हे ते लालबागच्या राजा मंडळाचे चौपाटीवर येण्याचे गणित चुकले. समुद्रात भरती सुरु झाल्याने राजाचा पाट आणि नवीन तराफा यांची जोडणी करण्यास अडथळे येऊ लागले. तराफ्यावर असलेले तंत्रज्ञ, समुद्रात उतरलेले कोळी बांधव आणि मंडळाचे कार्यकर्ते यांनी शर्थीचे प्रयत्न केले; मात्र निसर्गाच्या हट्टापुढे सर्व व्यर्थ होते. भरतीचे पाणी वाढत गेल्याने मूर्ती समुद्रात शिरू लागली आणि तराफा आणि मूर्ती यामधील अंतर वाढू लागले. यादरम्यान मूर्ती अधिक पुढे जाऊ नये यासाठी कित्येक कोळी बांधवांनी भर पावसात १३ तास समुद्रात उभे राहून मूर्तीला धरून ठेवले. त्यांची ही जिद्द नक्कीच वाखाणण्याजोगी होती. मूर्ती तराफ्याला जोडण्यात येणाऱ्या तांत्रिक अडचणी लक्षात न घेता अनेकांनी तर्क वितर्काला सुरुवात केली. ज्यामध्ये लालबागच्या राजा मंडळातील अंबानी कुटुंबाचा वाढता सहभाग बाप्पाला आवडलेला नसल्याने त्याची तराफ्यावर जाण्याची इच्छा नाही असे तारे काहीजण तोडत होते तर काही जणांच्या मते नवीन तराफा गुजरातहून मागवून कोळी बांधवांचा नेहमीच तराफा न वापरल्याने असा प्रसंग ओढवला होता. मुळात लालबागचा बाप्पा केवळ महाराष्ट्राचा किंवा कोळी बांधवांचाच आहे का? खास लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी दरवर्षी हजारो भाविक गुजरातहून येत असतात. त्यांच्यावर बाप्पा कृपा करत नाही का? समस्त भक्तांची काळजी वाहणाऱ्या बाप्पाला असे राज्यांच्या सीमेत वाटणे नक्कीच योग्य नाही. मंडळातील अंबानी कुटुंबाचा सहभाग खटकणाऱ्या लोकांना अंबानी उद्योग समूहाने देशातील लाखो युवकांना दिलेला रोजगार का दिसत नाही? देवाच्या चरणी केलेल्या दानाचे महत्व त्यांना ज्ञात असल्यानेच ते प्रत्येक ठिकाणी देवस्थानांना भरभरून दान देत असतात. भगवंताच्या कृपेमुळेच एका भारतीय उद्योगपतींचे नाव जगातील सर्वांत श्रीमंत उद्योगपतींमध्ये घेतले जाते. अंबानी यांच्याप्रमाणेच अनेक उद्योगपतींनी राज्यात मोठमोठी मंदिरे बांधली आहेत, पुरातन मंदिरांचा जीर्णोद्धार केला आहे अशा मंदिरांत आपण रांगा लावून जातोच ना! राजाचे विसर्जन होण्यामागे झालेल्या विलंबाबद्दल मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी क्षमा मागितली आहे. नेमका उशीर कशामुळे झाला, समुद्राच्या भरतीचा अंदाज का आला नाही. नवीन तराफा आणण्यात आला होता तर विसर्जनाची सिद्धता करण्यासाठी राजाला अगोदरच समुद्रावर का आणले नाही असे अनेक प्रश्न यानिमित्ताने निर्माण होतात.

अर्थात यावर सखोल चिंतन करून लालबागचा राजा मंडळ पुढील वर्षासाठी योग्य ती उपाययोजना नक्कीच काढेल. बाप्पाची मूर्ती पुढे जावू नये यासाठी स्वतःचा जीव धोक्यात घालून ज्यांनी दिवसभर समुद्राच्या खाऱ्या पाण्यात उभे राहून निस्वार्थ भावनेने बाप्पाची सेवा केली त्यांच्यावर बाप्पाची कृपा होणारच आहे. लालबागच्या राजाचे शाही विसर्जन पाहण्याची उत्सुकता लक्षावधी गणेश भक्तांना असते. उशिरा का होईना ते नेहमीप्रमाणे शाही पद्धतीने आणि ग्रहण स्पर्शाच्या आधी पार पडले ही अत्यंत महत्वाची बाब आहे. **

## पालकांचे यथार्थ प्रबोधन..

# मुलांना घडवताना




**पुस्तक परीक्षण**
**प्रा. शाम जोगळेकर**
मो. ९२७३३४३१७७

'मुलांना घडवताना' हे डॉ. विजया फडणीसलिखितपुस्तक,पुण्याच्या रोहन प्रकाशनने देखण्या रूपात प्रकाशित केले आहे. सुरुवातीला 'मनोगत'मध्ये नवीन आणि सुधारित अशी पाचवी आवृत्ती, रोहन प्रकाशन या नामांकित प्रकाशन संस्थेतर्फे प्रकाशित होत असल्याचा आनंद लेखिकेने व्यक्त केला आहे. त्यांच्या मते, 'मुलांना वाढवणं ही हल्लीच्या काळात आव्हानात्मक गोष्ट समजली जाते. घडवणं ही आणखी पलीकडची गोष्ट आहे!' या पुस्तकातील विविध लेख पालकांना उपयुक्त ठरतील अशी आशा त्यांनी शेवटी व्यक्त केली आहे. या पुस्तकाचे आशयघन, रंगीत मुखपृष्ठ राजू देशपांडे आणि शेखर गोडबोले यांचे आहे. या पुस्तकात लहान-मोठे एकूण वीस लेख समाविष्ट करण्यात आले आहेत. १९९९ ते २००४ या कालावधीत, विविध नियतकालिकांतून आणि वृत्तपत्रांतून प्रकाशित झालेल्या विविध लेखांचा हा संग्रह आहे. काही नवीन लेखही या पुस्तकात समाविष्ट केले गेले आहेत.

समुपदेशन : काळाची गरज, या पहिल्या, अन्य लेखांच्या तुलनेने, सर्वांत मोठ्या, चौदा पृष्ठांच्या लेखात कोणत्या समस्यांच्यावेळी समुपदेशन आवश्यक ठरते, हे सविस्तरपणे, सोदाहरण स्पष्ट केले आहे. सुरुवातीला सल्ला आणि मार्गदर्शन त्यातील फरक स्पष्ट केला आहे. मार्गदर्शन म्हणजे योग्य निवड करण्यासाठी आणि जीवनातील विविध समायोजन साधण्यासाठी व्यक्तीला केलेली मदत. मात्र समुपदेशनाद्वारे व्यक्तीला तिच्या तात्कालिक समस्येतून बाहेर येण्यास मदत केली जातेच, पण भविष्यात जर कोणती समस्या आली तर स्वबळावर त्या समस्येतून बाहेर पडता येईल, यावर भर दिला जातो. आपल्या मनाची मदत घेऊनच आपण आपली समस्या सोडवू शकू इतका विश्वास समुपदेशक समस्याग्रस्त व्यक्तीला मिळवून देतो. व्यक्तिगत, व्यावसायिक, शैक्षणिक आणि वैवाहिक समस्या, ही समुपदेशनाची महत्त्वाची क्षेत्रे आहेत. समुपदेशनासाठी आलेल्या व्यक्तीबरोबर परस्परविश्वासाचे संबंध प्रस्थापित करण्यासाठी समुपदेशकाचे कौशल्य महत्त्वाचे ठरते. आपल्या प्रदीर्घ अनुभवाच्या आधारे लेखिकेने विविध, मानसिक समस्याग्रस्त व्यक्तींना, समुपदेशन कसे केले, हे सोदाहरण स्पष्ट केले आहे. मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी वेळेचे भान आणि नियोजन कसे महत्त्वाचे असते हे स्पष्ट केले आहे. रिकाम्या वेळेचा आणि सुट्टीचा उपयोग कसा करावा हेही सविस्तरपणे मांडले आहे. मुलांचे प्रश्न : पालकांच्या समस्या, या प्रकरणात शालेय जीवनात मुलांबद्दल शाळेतून प्रश्न किंवा समस्या निर्माण झाल्यावरच पालक त्याबाबत विचार करतात. अनेकवेळा मुलांकडे लक्ष द्यायला पालकांना वेळच नसतो. त्यामुळे मुलांच्या मानसिक गरजा, भावना त्यांना कळतच नाहीत. त्यामुळे पालक आणि मुलांमध्ये विश्वासाचे, प्रेमाचे, निर्भयतेचे बंध निर्माणच होत नाहीत. १३ ते १९ हे वय मुलांच्या दृष्टीने 'वादळी वय' असते. कारण त्यांच्यामध्ये विविध शारीरिक आणि भावनिक बदल होत असतात. यामुळे पालक आणि पाल्य दोघांच्याहीबाबत विविध समस्या निर्माण होतात. त्याबाबत उत्तम चर्चा केली आहे. मुलांचे भावविश्व कसे सुधारता येईल याची चर्चा नंतरच्या प्रकरणात आहे. निंदकाचे घर, या प्रकरणात मुलांशी वागताना, त्यांच्यावर टीका करताना पालकांनी कोणती काळजी घ्यावी हे सोदाहरण सुचविले आहे. भावनिक बुद्धिमत्ता आणि सत्त्वाचे भान ही दोन्ही प्रकरणे सर्वच प्रौढांसाठी मार्गदर्शक आहेत.

मुलांमध्ये आत्मविश्वास, महत्त्वाकांक्षा निर्माण करण्यासाठी काय करता येईल, हेही अन्य स्वतंत्र प्रकरणांद्वारे स्पष्ट केले आहे. या प्रकरणात बुद्धिगुणांकाची चर्चा केली आहे.आपल्या पाल्यांचा बुद्धिगुणांक समजून घेतल्यास त्यांच्या विविध समस्या सोडविणे पालकांना सोपे जाईल. अभिक्षमता म्हणजे काय, हे एका स्वतंत्र प्रकरणात उत्तम प्रकारे स्पष्ट केले आहे. मुलांची अभिक्षमता जाणून घेतल्यास, त्यामुळे त्यांच्या शिक्षणाला आणि जीवनाला निश्चित दिशा प्राप्त होऊ शकते. निर्णयशक्ती, सवय, आळसाशी दोन हात ही प्रकरणे सर्वांसाठीच नितांत मार्गदर्शक आहेत. पालकांनी त्यांचा नीट अभ्यास केल्यास त्यामुळे मुलांना घडवताना, या मार्गदर्शनाचा निश्चितच उपयोग होऊ शकतो. ज्याचे बालपण कठीण आणि मरणछाया भिवविती ह्रदया, या दोन प्रकरणात लेखिकेने अनुभवांच्या आधारे, पालकांनी कोणती काळजी घ्यावी हे सांगितले आहे. अनेक वेळेला पालक, आपल्या इच्छा आणि आकांक्षा पूर्ण करण्याचे साधन म्हणून आपल्या मुलांकडे पाहतात. त्यामुळे मुलांच्या भावी जीवनावर विपरीत परिणाम होऊ शकतो, 'हे पालक कसले!' या प्रकरणात हे स्पष्ट केले आहे. ' थ्री इडियट्स' हे प्रकरण तीन व्यसनांविषयी सविस्तरपणे चर्चा करते. टीव्ही, संगणक आणि इंटरनेट, मोबाईल यांचा अनिर्बंध वापर केल्याने मुले आणि प्रौढ यांच्यावर कसे विपरीत परिणाम होतात, भावनिक जीवनावर दुष्परिणाम कसे होतात, याची अत्यंत सविस्तर आणि उद्‌बोधक चर्चा केली आहे.

विद्यार्थी- पालक- शिक्षक : एक समन्वय, हा लेख वाचनीय आणि अंतर्मुख करणारा आहे. पालकांनी मुलांना कसे वाढवावे? शिक्षकांची भूमिका कोणती? या गोष्टींची सविस्तर केली आहे. वाढत्या वयातील मुलांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी पुष्पौषधी कशी उपयुक्त ठरते, हेही परिशिष्टात स्पष्ट केले आहे. शेवटी संदर्भसूची दिली आहे.

मुलांना घडवताना, हे डॉ. विजया फडणीस यांचे पुस्तक पालकांना आणि सर्वसामान्य सजग नागरिकांना उपयुक्त ठरणारे असे आहे. काही प्रकरणे वारंवार वाचून समजून घेण्यासारखी आहेत. मानसिक प्रश्नांच्या क्षेत्रात काम करणाऱ्या विविध अनुभवी व्यक्तींनी अशा प्रकारे लेखन केल्यास, समाजातील अनेक गैरसमजुती, अंधश्रद्धा दूर होऊन समाजाचे सर्वांगीण प्रबोधन होऊ शकेल, असे वाटते. यादृष्टीने डॉ. विजया फडणीस यांचे लेखन खूपच महत्त्वाचे आणि मोलाचे आहे. पुस्तकाचे शेवटी मलपृष्ठावर लेखिकेचा रंगीत छायाचित्रातून परिचय होतो. त्यांच्या जीवनकार्याची सविस्तर माहिती, पुस्तकात दिली आहे. **

**पुस्तकाचे नाव : मुलांना घडवताना लेखिका : डॉ. विजया फडणीस**
**प्रकाशक : रोहन प्रकाशन, पुणे- ३०.**
**०२०-२४४८०६८६**
**सुधारित आवृत्ती : ऑगस्ट २०१६ पुनर्मुद्रण : २०१७, २०१९ पृष्ठे : १७९ मूल्य : रु. १७५/-**

# ग्रंथालय शास्त्र आणि चळवळ



**ज्योती म्हात्रे**

ग्रंथालय शास्त्र (Library Science) हे एक शास्त्रीय आणि सामाजिक क्षेत्र आहे, ज्याचा मुख्य उद्देश ज्ञान, माहिती व साहित्य यांचे संगोपन, वर्गीकरण व प्रभावीपणे प्रसारण करणे हा आहे. पुस्तकालये ही फक्त पुस्तके साठवण्याची ठिकाणे नसून समाजातील प्रत्येक घटकाला ज्ञानाचा समान व मुक्त प्रवेश मिळवून देण्याचे महत्त्वाचे साधन आहेत. त्यामुळे ग्रंथालय शास्त्र हे सतत बदलणाऱ्या समाजासोबत नवनव्या चळवळींनी समृद्ध झाले आहे.

**१. प्रारंभीची चळवळ**

मानव इतिहासात सुरुवातीच्या काळात मंदिर, राजदरबार व विद्यापीठांमध्ये ग्रंथालये अस्तित्वात होती. पण ती निवडक वर्गापुरती मर्यादित होती. १९व्या शतकानंतर युरोप व अमेरिकेत 'सार्वजनिक ग्रंथालय चळवळ' सुरू झाली. या चळवळीचा उद्देश समाजातील सर्व स्तरातील लोकांना ज्ञान व वाचनसामग्रीचा मोफत व समान प्रवेश मिळावा हा होता. भारतातसुद्धा १९व्या शतकात वाचनालये आणि सार्वजनिक ग्रंथालयांची पायाभरणी झाली. महाराष्ट्रात वाचनसंस्कृती वाढविण्यात प्रबोधनकार ठाकरे, लोकमान्य टिळक यांसारख्या नेत्यांनी पुढाकार घेतला.

२. व्यावसायिकरण व शिक्षणाची चळवळ

२० व्या शतकात ग्रंथालय शास्त्र हे स्वतंत्र शैक्षणिक शाखा म्हणून विकसित झाले. अमेरिकेत मेलव्हिल ड्यूईने (Melvil Dewey) वर्गीकरण प्रणाली विकसित केली व व्यावसायिक ग्रंथपाल प्रशिक्षण सुरू केले.

भारतात सुद्धा डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी ग्रंथालय विज्ञानाचा पाया घातला. त्यांच्या 'पाच नियमां'नी (Five Laws of Library Science) जागतिक पातळीवर ग्रंथालय चळवळीला वैज्ञानिक दिशा दिली. यामुळे ग्रंथालये केवळ पुस्तके ठेवणारी संस्था न राहता, 'ज्ञानसंपादन केंद्रे' बनली.

**३. सामाजिक व सांस्कृतिक चळवळी**

स्वातंत्र्यानंतर भारतात शिक्षणाचा प्रसार, निरक्षरता निर्मूलन व ग्रामीण भागात वाचनसंस्कृती निर्माण करण्यासाठी अनेक ग्रंथालय चळवळी उभ्या राहिल्या. महाराष्ट्रात 'ग्रंथालय चळवळ' ही एक सांस्कृतिक उभारणी होती. जिल्हा वाचनालये, चलत वाचनालये (mobile libraries), तसेच लोकसहभागातून चालणारी वाचनसंस्था यांचा या काळात मोठा प्रसार झाला.

४. आधुनिक डिजिटल चळवळ

२१ व्या शतकात माहिती तंत्रज्ञानामुळे ग्रंथालय शास्त्रात प्रचंड बदल घडले. डिजिटल लायब्ररी चळवळ उदयास आली. ई-पुस्तके, ऑनलाइन डेटाबेस, ओपन ॲक्सेस जर्नल्स यामुळे ज्ञानसीमा भौगोलिक चौकटीबाहेर गेल्या. ओपन ॲक्सेस चळवळ ही जागतिक पातळीवरील एक मोठी चळवळ असून संशोधन व माहिती सर्वांना मोफत उपलब्ध करून देण्याचा तिचा उद्देश आहे. तसेच माहितीचा लोकशाहीकरण (Democratization of Information) हे या चळवळीचे मुख्य वैशिष्ट्य आहे.

निष्कर्ष- ग्रंथालय शास्त्र हे केवळ माहिती व्यवस्थापनाचे शास्त्र नसून एक सामाजिक व सांस्कृतिक चळवळ आहे. सार्वजनिक ग्रंथालय चळवळ, व्यावसायिकरण, ग्रामीण वाचनसंस्कृती प्रसार, आणि आजची डिजिटल/ओपन ॲक्सेस चळवळया साऱ्यांनी मिळून ग्रंथालयांना 'ज्ञानलोकशाहीचे स्तंभ' बनवले आहे. बदलत्या तंत्रज्ञानामुळे भविष्यातही ग्रंथालय शास्त्र नवनव्या चळवळींनी अधिक समृद्ध होत राहील.

समाजातील प्रत्येक घटकाला ज्ञानाचा समान व मुक्त प्रवेश मिळवून देण्याचे महत्त्वाचे साधन म्हणजेच ग्रंथालयाकडे पाहिले जाते. वाचाल तर वाचाल असे अनेक तज्ज्ञ मंडळींनी सांगितले आहे. वाचना-तून माणसाची बौद्धिक क्षमता वाढीला चालना मिळते. ग्रंथालय हे वाचनालयाचे खऱ्या अर्थाने विद्यापीठच असल्याचे बोलणे वावगे ठरणार नाही. मोबाईलच्या जगतामध्ये रमणाऱ्या पिढीने वाचनाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. ग्रंथालयाची चळवळ दिवसेंदिवस वृद्धिंगत होत आहे. वेगवेगळ्या विषयांवरील पुस्तके सहज सोप्या पद्धतीने उपलब्ध होत आहेत. तरूणांनी वाचनाकडे विशेष लक्ष देऊन आपली प्रगती साधण्याकडे लक्ष देणे ही काळाची गरज आहे. **

# येता आनंदे मोहविसी जाता आनंदे सुखलिसी!

**बाळ सिंगासने**

'मोहाने मोहित ते अज्ञाने गूढ होती. 'श्री गणेशाचे एकूणच स्वरुप हे अनंत गणेश भक्ताना आनंद देणारे आहे. क्षणिक, आसक्ती, उत्कट भावना, लोभ या गोष्टी आपल्या जीवनांत क्लेशदायक ठरतात. मोहामुळे बाह्यरुप वेडे बनते तर प्रेमभाव अंतरंगाचे सुखनिधान ठरते. श्री गणेशाने हे तत्व समाजापुढे ठेवलेले आहे. संपूर्ण जगभर श्रीगणेश हे आराध्य दैवत म्हणून हिंदु संस्कृतीला प्रेरणा देत आहे. प्राचीन काळापासून श्री गजानन ही एक बुद्धी प्रदान करणारी प्रकाशमय शक्ती आहे हे मानण्यांत आलेले आहे. मनाच्या नकारात्मतेला सकारात्मक अशा विनयी, विवेकी आणि वीरतेचे अंकुर फुलवितो. भावनांत आजही श्रीगणेश व माता महालक्ष्मी ही दैवते म्हणजे आपल्या संस्कृतीचा मंगलमय फुलोरा आहे. जीवनांत आनंद देणारी कला नृत्यकला संगीत इत्यादी गुणवत्तेने संपन्न असलेले गणराज प्रत्येक गणेशभक्तांच्या ह्दयात एखाद्या कलात्मक शिष्यासारखे कोरले गेलेले आहे. श्री गणेशाची अनेक रुपे कालप्रवाहाबरोबर पहावयास मिळतात. असुरांचा संहार करणारा ज्ञानियांचा राजा, प्रजाहितदक्ष म्हणून श्री गणेशाची पुजा होते. तो सुखकर्ता आहे. दु:ख हर्ता आहे. विघ्नविनाशक आहे. म्हणूनच तर त्याच्या आगमनाप्रसंगी आपण अढळ भावनेने ढोल-ताशांच्या गजरात ओठावर हास्य फुलवीत नाचत वाजत, गाजत पुष्पवृष्टी उधळत घरी आणतो. अथवा सार्वजनिक ठिकाणी त्याची मंगल प्रतिष्ठापना करतो. महाराष्ट्रात श्री गणेशोत्सव सर्वाधिक प्रमाणात आसाधिस्टीत होतात. आकाशांत गुलाल उधळीत मोठ्याने आरोळी ठोकत आपण म्हणतो, 'गणपती बाप्पा मोरयाऽऽ'

पण आज हेच आपले परमपुज्य दैवत काही दिवसाच्या मुक्कामानंतर आपला निरोप घेत आहेत. क्षणभर हा वियोग विरह वाटला तरीही त्यात विसलतेचे विभोर वलय आहे. म्हणूनच तर आपण गणपती बाप्पाला म्हणतो 'पुढच्या वर्षी लवकर याऽऽऽ'

पण आज मात्र आम्ही या विनायकाला विघ्नेशाला विश्वचालकाला कळकळीची विनंती करीत आहोत, की 'हे गणराया गौरीनंदना तू या महाराष्ट्राला पुन:श्च महाविकासाकडे घेऊन ये. आज महाराष्ट्रभूमी अस्वस्थ आहे. प्रज्ञा संभ्रमीत आहे. तरुणाई बेरोजगारीत घुसमटलेली आहे. शिक्षणक्षेत्रात सावळा गोंधळ माजला आहे. शेतकरी निराशजनक अवस्थेमुळे आत्महत्या करीत आहे. महागाईचा आक्राळ-विक्राळ राक्षस थैमान सारखा थयथय नाचत आहे. उद्योगक्षेत्रांत मंदी आणि आम्ही ज्यांना अन्य प्रेरणास्थाने समजतो असे श्री छत्रपती शिवाजीराजे, अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले, शाहूराजे अशा महान विभुतींची विटंबना होत आहे.



याचबरोबर निसर्ग सृष्टीचा प्रकोप, अतिवृष्टीमुळे होणारी जीवित हानी, कष्टांतून उभारलेल्या धनधान्यांची नाशवंत अवस्था यामुळे सर्व दिशानी जनता हतबल झालेली आहे. मुळ महाराष्ट्र संस्कृतीला पाश्चात्य संस्कृतीच्या अंधानुकरणामुळे वाळवी लागत असल्याचे भासत आहे. मोबाईलचे आक्रमण बुद्धीनाशाकडे झुकत चाललेले आहे. सण, समारंभ, उत्सवांत श्रद्धेएवजी भंपकपणाच दिसून येतो. सामाजिक जातियता, धर्म परायणांत भेदाभेदाची कांदळवने वाढत आहेत, 'हे श्री गजानन हे सत्य की संभ्रम हाच प्रश्न आम्हाला सतावित आहे. या साठीच श्री गजमुखा आम्ही तुला विनय भावनेने प्रार्थना करीत आहोत, आज तुला निरोप देत आहोत आमच्या मनोमन भावना तवचरणी अपर्ण करीत आहोत की या सह्याद्रीच्या दारगिरींतून तुझा मंगल हुंकार दशादिशानी पसरु दे. महाराष्ट्र माता गोदा, कृष्णा, कोयना, कावेरी, नर्मदा या नद्यांच्या जलप्रवाहाचे पावित्र्य अबाधित राहू दे, प्रदूषणांत घुसमटणाऱ्या जनतेला निर्भेळ श्वास घेण्याचे वातावरण निर्माण होऊ दे शेतकरी राजा सुखाऊदे वृक्ष वल्लरींची आमची सोयरिक अभंग टिकू दे' महाराष्ट्राचं वैभव वाढू दे.' **'हे सर्वेशा तूयेता आनंदे मोहविसी जाता आनंदे सुखविसी'**

बस्स! एवढीच इच्छा! **

# ..हीच मीनाक्षी पाटील यांना आदरांजली

## शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांचे प्रतिपादन

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या मीनाक्षी पाटील यांचा पक्षाच्या जडणघडणीत मोलाचा वाटा होता. त्या एक उत्तम वक्त्या होत्या. राजकारणात त्यांनी स्वतः एक वेगळी पक्कड निर्माण केली होती. अभ्यास शिबिरातून तयार झालेल्या त्या नेत्या होत्या. पक्षाबाबत त्यांची एक वेगळी निष्ठा होती. पक्षाची निष्ठा व झेंडा पुढे नेणे, हीच खरी मीनाक्षी पाटील यांना आदरांजली ठरेल, असे प्रतिपादन शेकाप राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी केले.

माजी राज्यमंत्री स्व. मीनाक्षी पाटील यांच्या जयंतीनिमित्त शनिवारी (दि.१३) शेतकरी कामगार पक्ष पुरोगामी विद्यार्थी संघटना अलिबाग, पुरोगामी युवक संघटना अलिबाग व शेकाप सांस्कृतिक सेल अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने मा. राज्यमंत्री स्व. मीनाक्षीताई वक्तृत्व करंडक २०२५ जिल्हास्तरीय खुल्या वक्तृत्व स्पर्धा शेतकरी भवनमध्ये आयोजित करण्यात आल्या होत्या. यावेळी त्या बोलत होत्या.

याप्रसंगी चित्रलेखा पाटील म्हणाल्या की, मीनाक्षी पाटील यांची वक्तृत्व ही ओळख होती. मीनाक्षी पाटील यांनी राजकीय, सामाजिक अशा सर्वच क्षेत्रात आपल्या अभ्यासपूर्ण वक्तृत्वाने एक वेगळी पक्कड निर्माण केली होती. राज्यात त्यांचा एक दबदबा होता. त्यांच्या जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धा ठेवून एक संकल्पना अंमलात आणली आहे. त्यांच्या विचारांचा वारसा असाच पुढे नेण्याचे काम आपण सर्वांनी करूया, हीच खरी त्यांना आदरांजली असणार आहे, असे चित्रलेखा पाटील यांनी सांगितले.







## स्पर्धेचा बोलबाला राज्यात पोहोचवा : ॲड. म्हात्रे



शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या मीनाक्षी पाटील यांनी पुरोगामी विचार जपला आणि तो रुजविण्याचे काम केले. त्या शेतकरी कामगार पक्षासाठी समर्पित आयुष्य जगल्या. शेकापच्या नेत्या स्व. मीनाक्षी पाटील या प्रभावी वक्त्या होत्या. पाटील घराण्याला लाभलेले एक रत्न होते. वक्तृत्व आणि त्यातून साधलेले नेतृत्व म्हणजे मीनाक्षी पाटील होय. त्यांच्या जयंतीनिमित्त अलिबागमध्ये जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा भरविण्यात आल्या आहेत. दिग्गज स्पर्धक या स्पर्धेमध्ये सहभागी झाले. त्यामुळे या स्पर्धेचा बोलबाला राज्यात पोहोचला पाहिजे. तसेच, या स्पर्धेला उंची देण्याचा प्रयत्न करण्यात यावा आणि आगामी काळात राज्यस्तरिय स्पर्धा घेण्यात याव्यात, असे प्रतिपादन शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे यांनी केले.

## मीनाक्षीताईंचा आदर्श कायम ठेवा : प्रदीप नाईक



शेकापच्या नेत्या स्व. मीनाक्षी पाटील यांच्या जयंतीनिमित्त जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली. त्याचे योग्य नियोजन व व्यवस्थापन आयोजकांनी केले.

या स्पर्धेच्या माध्यमातून स्पर्धकांना चांगली संधी उपलब्ध झाली. शेकापचे नेते जयंत पाटील यांनी पक्षाच्या वेगवेगळ्या आघाड्या निर्माण केल्या. प्रत्येक सेलने चांगले काम करावे, ही जयंत पाटील यांची इच्छा आहे. त्या पद्धतीने पुरोगामी विद्यार्थी संघटनेसह पुरोगामी युवक आणि सांस्कृतिक सेलने काम करण्यास सुरुवात केली आहे. शेकापच्या नेत्या मीनाक्षी पाटील यांचा आदर्श कायम घेण्यासारखा होता. आपल्या वक्तृत्वाने एक वेगळी छाप टाकण्याची कला त्यांच्यामध्ये होती. राजकीय व सामाजिक क्षेत्रात त्यांची एक वेगळी पक्कड होती. शेकापच्या जडणघडणीत त्यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. वक्तृत्व हा त्यांचा आवडता विषय होता. त्यांचे भाषण एक पर्वणी व मेजवानीच होती. त्यांचा आदर्श घेऊन प्रत्येकाने काम करावे, असे शेकाप राज्य कामगार आघाडीचे प्रमुख प्रदीप नाईक म्हणाले.

## विजेत्यांचा गौरव

2



3



4



5



● **विजेत्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप...** मा. राज्यमंत्री स्व. मीनाक्षीताई वक्तृत्व करंडक २०२५ जिल्हास्तरीय खुल्या वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक प्रार्थना बेटकर, द्वितीय क्रमांक पंकज पाडूळे, तृतीय क्रमांक लक्ष्मण कचरे, चतुर्थ क्रमांक ध्रुव राऊत तर पाचवा क्रमांक संयोगी नाईक यांनी पटकवला. या सर्व विजेत्यांचे कौतुक करून मान्यवरांनी शाबासकीची थाप पाठीवर दिली. यावेळी विजेत्या स्पर्धकांना रोख रक्कम व चषक देऊन गौरविण्यात आले. (सर्व छायाचित्र : समीर मालोदे)

## उत्तेजनार्थ विजेते

1



2



3



4



5



● **या स्पर्धेत वैशाली शेखर पाटील, रोहित राजेश पाटील, अमोल रामचंद्र गोळे, श्रवण वामन कदम, आदित्य गणेश शिर्के यांना प्रत्येकी १ हजार ५०० रुपये व चषक अशी पाच उत्तेजनार्थ बक्षिसे देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.**

पान १ वरुन

## प्रार्थना बेटकर ठरल्या मानकरी

अलिबागचे प्रमुख राजन पांचाळ, वेगवेगळ्या आघाडीचे पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्ते व स्पर्धक उपस्थित होते.

ही स्पर्धा 'स्थानिक प्रश्नांचे राज्यस्तरीय नेतृत्व मीनाक्षीताई पाटील', 'येवा कोकण आपलोच असा-पण विकासाचं काय?', 'सावित्रीच्या लेकी चालल्या पुढे', 'संघर्षातून आत्मनिर्भरतेकडे', 'नफरत के बाजार मे मोहोब्बत बेच रहा हूं मै', 'सकारात्मक बदलाची सुरुवात-व्यक्तीच्या प्रयत्नातून समाजापर्यंत' व 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' या विषयांवर घेण्यात आली. प्रत्येक स्पर्धकाने आपल्या शैलेतून वक्तृत्व करून प्रेक्षकांची मने जिंकली. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रसिद्ध वक्ते डॉ. पंकज पवार, संदीप जगे, मिलिंद घाडगे यांनी काम पाहिले.

या स्पर्धेत प्रथम क्रमांक प्रार्थना प्रसन्न बेटकर यांनी मिळविला असून, त्यांना रोख ११ हजार, पाच हजार, एक हजार व पाचशे रुपये असे एकूण सोळा हजार पाचशे रुपये व चषक दिले. पनवेल येथील पंकज पाडूळे यांना द्वितीय क्रमांकाचे रोख ८ हजार व ५०० रुपये असे एकूण साडेआठ हजार रुपये व चषक देण्यात आले. महाडमधील लक्ष्मण विठ्ठल कचरे यांना तृतीय क्रमांकाचे रोख ५ हजार व ५०० रुपये असे एकूण साडेपाच हजार रुपये व चषक देण्यात आले. तळामधील ध्रुव जितेंद्र राऊत यांना चतुर्थ क्रमांकाचे रोख ३ हजार ५०० रुपये व चषक, तर अलिबागमधील संयोगी राजेंद्र नाईक यांना पाचव्या क्रमांकाचे रोख २ हजार ५०० रुपये व चषक देऊन गौरविण्यात आले. तसेच, वैशाली शेखर पाटील, रोहित राजेश पाटील, अमोल रामचंद्र गोळे, श्रवण वामन कदम, आदित्य गणेश शिर्के यांना प्रत्येकी १ हजार ५०० रुपये व चषक अशी पाच उत्तेजनार्थ बक्षिसे यांना देऊन सन्मानित केले. प्रत्येक सहभागी स्पर्धकाला प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.



## मीनाक्षी पाटील यांना आगळीवेगळी आदरांजली

शेकापच्या माजी राज्यमंत्री दिवंगत मीनाक्षी पाटील यांच्या जयंतीनिमित्त शेतकरी कामगार पक्ष पुरोगामी विद्यार्थी संघटना अलिबाग, पुरोगामी युवक संघटना अलिबाग, शेकाप सांस्कृतिक सेल अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने मा. राज्यमंत्री स्व. मीनाक्षीताई वक्तृत्व करंडक २०२५ स्पर्धा घेण्यात आली. मीनाक्षी पाटील या चांगल्या वक्त्या होत्या. त्यांच्या कार्याची माहिती जनतेला मिळावी म्हणून वक्तृत्व स्पर्धा आयोजित केल्या. ही स्पर्धा घेऊन मीनाक्षी पाटील यांना आगळीवेगळी श्रद्धांजली अर्पण केली. सुरुवातीला स्व. मीनाक्षी पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून त्यांना अभिवादन करण्यात आले. त्यांच्या कार्याची माहिती उपस्थितीत मान्यवरांनी दिली.

## वक्तृत्वामध्ये चांगली प्रगती करता येते : ॲड. गौतम पाटील



शेकापच्या नेत्या स्व. मीनाक्षी पाटील यांचे पक्षासाठी मोलाचे योगदान राहिले आहे. वक्तृत्व कसे असावे, हे त्यांच्याकडून शिकलो. त्यांची आठवण ही कायमच स्मरणात राहण्यासारखी आहे. वक्तृत्व स्पर्धा घेऊन मोबाईलच्या जगतामध्ये वावरणाऱ्या पिढीसाठी शेकापने एक चांगली संधी उपलब्ध करून दिली आहे. मोबाईल फोन खाली ठेवून प्रत्येकाने उत्स्फूर्तपणे वक्तृत्व स्पर्धेत सहभाग घेतला पाहिजे. वक्तृत्व करताना सुरुवातीला चुका होतात. या चुका सुधारून वक्तृत्वामध्ये चांगली प्रगती करता येते, असे शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील यांनी सांगितले.

## वक्तृत्व स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या, माजी राज्यमंत्री स्व. मीनाक्षी पाटील यांच्या जयंतीनिमित्त शनिवारी (दि.१३) अलिबागमध्ये शेतकरी भवन येथे मा. राज्यमंत्री स्व. मीनाक्षीताई वक्तृत्व करंडक २०२५ जिल्हास्तरीय खुल्या वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन शेकाप राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी शेकाप ज्येष्ठ नेते द्वारकानाथ नाईक, शंकरराव म्हात्रे, रायगड जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, शेकाप राज्य कामगार आघाडी प्रमुख प्रदीप नाईक, शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, शेकाप तालुका माजी चिटणीस अनिल शांताराम पाटील, अलिबाग पंचायत समितीचे माजी उपसभापती अनिल गोमा पाटील, शेतकरी कामगार पक्ष पुरोगामी विद्यार्थी संघटना अलिबाग, पुरोगामी युवक संघटना अलिबाग, शेकाप सांस्कृतिक सेलचे पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्ते व स्पर्धक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)